# सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. ०८ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १४४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## सरकारविरोधात राज्यातील कंत्राटदारांचे 32 जिल्ह्यांत आंदोलन

### 86 हजार कोटींची देयके थकली

**मुंबई :** शासकीय कंत्राटदारांनी प्रलंबित बिलांसह विविध मागण्यांसाठी सोमवारी राज्यभरात आंदोलनाची हाक दिली. महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना आणि महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या वतीने राज्यातील तब्बल ३२ जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर निदर्शने करण्यात आली आणि जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करण्यात आले.

संघटनेच्या प्रमुख मागण्यांमध्ये राज्यातील कंत्राटदारांच्या दुर्दैवी आत्महत्येस जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करून चौकशी समिती नेमणे आणि मृत कंत्राटदारांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देणे, याचा समावेश आहे. तसेच, राज्यातील सर्व विभागांकडील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली तब्बल ८६ हजार कोटी रुपयांची देयके तातडीने वितरीत करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, राज्यातील छोट्या कामांचे एकत्रीकरण करून मोठ्या निविदा प्रक्रिया राबवू नयेत, कारण यामुळे तीन लाखांहून अधिक लहान कंत्राटदारांची उपजीविका धोक्यात आली असल्याचे सांगण्यात आले. बिलांच्या अगोदरच जीएसटी भरण्याच्या अटीमुळे कंत्राटदारांची आर्थिक कुचंबणा होत असून हा नियम बदलण्याची मागणी करण्यात आली आहे. गेल्या दोन वर्षांत नवीन कामे मंजूर न झाल्याने राज्याचा विकास ठप्प झाल्याचा आरोप करत, ई-निविदा प्रक्रियेतील राजकीय दबाव आणि मनमानी तातडीने थांबवावी, अशी भूमिका राज्यभरातील कंत्राटदारांनी घेतली आहे. हे प्रश्न तातडीने न सोडवल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

## ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करणार

### मंत्री राधाकृष्ण विखे पाटील; वंशावळ आणि कायदेशीर नियमांचे पालन करूनच प्रमाणपत्रे देणार



**मुंबई :** निवृत्त न्यायमूर्ती शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. त्यासाठी १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रत्येक जिल्ह्यात शिबिरे आयोजित करावीत; तसेच सर्व जिल्ह्यांमधील अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय ठेवून आरक्षणातील प्रत्येक प्रश्नाबाबत गांभीर्याने कार्यवाही करावी, अशा सूचना मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी विभागीय आयुक्तांसह सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना सोमवारी दिल्या.

मंत्री विखे पाटील यांनी मराठवाड्यातील धाराशिव, बीड, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, लातूर, जालना या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी व प्रांताधिकारी यांच्याशी दूरदृश्यप्रणालीद्वारे बैठक घेऊन झालेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. या बैठकीमध्ये मंत्री विखे पाटील यांनी जिल्हानिहाय देण्यात आलेली जात पडताळणी प्रमाणपत्रांची संख्या, कुणबी नोंदी तसेच प्राप्त झालेल्या अर्जांचा सविस्तर आढावा घेतला. प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याने आजपर्यंत केलेल्या कार्यवाहीची तसेच अंमलबजावणीची सविस्तर माहिती बैठकीमध्ये सादर केली. यामध्ये प्रामुख्याने परभणी जिल्हाधिकारी कार्यालयाने सापडलेल्या नोंदी वेबसाईटच्या माध्यमातून जाहीर केल्या आहेत. त्याच पद्धतीने इतर जिल्ह्यांनीही अशाच प्रकारची कार्यवाही करावी आणि १० ते १७ सप्टेंबर दरम्यान प्रमाणपत्रांच्या पूर्ततेसाठी शिबिरे आयोजित करून अधिक चांगल्या पद्धतीचे नियोजन करावे, अशा सूचना मंत्री विखे पाटील यांनी बैठकीमध्ये दिल्या.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मंत्री विखे पाटील म्हणाले, "कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. वंशावळ आणि कायदेशीर नियमांचे पालन करूनच प्रमाणपत्रे दिली जातील. मराठवाड्यात आतापर्यंत साडेतीन लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वाटप झाली आहेत. पात्र लाभार्थ्यांना प्रमाणपत्रे देताना नियमांची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल. मनोज जरांगे पाटील हे समाजासाठी आंदोलन करीत असून, त्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांबाबत सरकार त्यांच्याशी चर्चा करणारच आहे. काही लोकांना त्या पायघड्या वाटत असतील, पण हे सर्व आरोप बिनबुडाचे आहेत. कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाच्या आरक्षणासाठी सरकार पुढाकार घेत आहे; परंतु काही लोक मराठा आरक्षणाला विरोध करण्यासाठी मुद्दाम आंदोलनाची भाषा करीत असतील तर ते चुकीचे असून, याद्वारे विनाकारण सामाजिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. सरकारने काहीही चुकीचे केलेले नाही व तशी भूमिकाही नाही. मराठा आरक्षणाचा प्रश्न कायदेशीर चौकटीत आणि सर्व समाजांच्या हिताचा विचार करून सोडविण्याची सरकारची भूमिका असून, पात्र लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे प्रमाणपत्र मिळावे यासाठी प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत", असेही विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.

जरांगेंशी चर्चेची सरकारची तयारी

मराठा आरक्षणाबाबत सरकार फक्त आश्वासने देत असल्याच्या मनोज जरांगे पाटील यांच्या आरोपावर बोलताना मंत्री विखे पाटील म्हणाले की, मागील आंदोलनातील बहुतांश मागण्यांवर सरकारने कार्यवाही केली असून, उर्वरित मागण्यांवरही मार्ग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची सरकारची भूमिका असून, आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांच्याशी चर्चा करण्याची सरकारची कधीही तयारी आहे.

## कुपोषित बालकांमधील टीबी तपासणीला मिळणार गती; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये 90 टक्क्यांहून अधिक तपासणी; प्रतिबंधात्मक उपचार व डिजिटल नोंदणीवर भर

**मुंबई :** कुपोषित बालकांमध्ये क्षयरोगाचे (टीबी) वेळीच निदान होऊन त्यांना योग्य उपचार मिळावेत, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशांनुसार सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये (NRC) टीबी तपासणीची कार्यपद्धती अधिक बळकट करण्यात आली आहे. कुपोषणामागील एक महत्त्वाचा घटक असलेल्या बाल टीबीचे निदान, उपचार आणि प्रतिबंध यासाठी राज्यात विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत.

मुख्यमंत्री सचिवालयाच्या २ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या निर्देशांनुसार आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनात आरोग्य विभाग महिला आणि बालकांच्या आरोग्याची विविध उपक्रमाद्वारे काळजी घेत आहे. पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये दाखल होणाऱ्या बालकांची टीबी तपासणी, निदान व उपचारासाठी मानक कार्यपद्धती, प्रशिक्षण, निदान सुविधा आणि औषधांचा पुरवठा सुनिश्चित करण्यात आला आहे. या कार्यपद्धतीनुसार बालकांची लक्षणे व टीबी रुग्णाच्या संपर्काचा इतिहास तपासला जातो. आवश्यकतेनुसार नमुना संकलन, सीबी-नॅट/ट्रूनॅट तपासणी आणि छातीचा एक्स-रे यांसारख्या निदान सुविधांशी बालकांना जोडण्यात आले आहे.



जुलै २०२६ पर्यंत २,८३५ बालकांची टीबी तपासणी

२०२१ ते जुलै २०२६ या कालावधीत पोषण पुनर्वसन केंद्रांमध्ये दाखल २९,८७५ बालकांपैकी २६,८५७ बालकांची टीबी तपासणी करण्यात आली आहे. म्हणजेच एकूण तपासणीचे प्रमाण ८९.९ टक्के आहे. २०२६ मध्ये जुलैपर्यंत दाखल ३,०१७ बालकांपैकी २,८३५ बालकांची तपासणी करण्यात आली असून, हे प्रमाण ९४ टक्के आहे. तपासणीचे प्रमाण सातत्याने उच्च राहिले असून, २०२२ मधील २३ रुग्णांवरून २०२५ मध्ये ७ आणि जुलै २०२६ पर्यंत ३ बालकांवर उपचार सुरू करण्यात आले आहेत. तपासणीचे प्रमाण उच्च राहतानाही निदान झालेल्या रुग्णांची संख्या कमी होत असल्याचे दिसून येते. संपर्क तपासणी व निक्षय नोंदींच्या आधारे त्याचे सातत्याने परीक्षण करण्यात येत आहे.

बाल टीबी प्रतिबंधासाठी नवीन उपक्रम

टीबीच्या संपर्कात आलेल्या मात्र लक्षणे नसलेल्या बालकांना टीबी प्रतिबंधात्मक उपचार (TPT) देण्यासाठी घरगुती व एनआरसी संपर्क तपासणी बळकट करण्यात आली आहे. तसेच, जटिल, औषध-प्रतिरोधक आणि निदानास आव्हानात्मक बालरुग्णांसाठी बाल टीबी उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्याची कार्यवाही सुरू आहे. पोषण पुनर्वसन केंद्रांमधील टीबी तपासणी व निदानाची माहिती निक्षय पोर्टलशी जोडण्याचे काम सुरू असून, रुग्णांची नोंदणी, उपचारांचा मागोवा आणि परिणामांचे परीक्षण अधिक प्रभावी होणार आहे. टीबी निदान झालेल्या बालकांना निक्षय पोषण योजना व निक्षय मित्र उपक्रमांतर्गत पोषण सहाय्याशी जोडण्यात येत आहे.

## "नागपुरातील 99% अंडरवर्ल्ड माझे समर्थक, पण..."

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे खळबळजनक विधान

**नागपूर :** केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी आपल्या रोखठोक आणि थेट वक्तव्यांसाठी ओळखले जातात. नागपूरमध्ये आयोजित 'मिडिया कॉन्क्लेव्ह २०२६' या कार्यक्रमात बोलताना त्यांनी स्वतःच्या मतदार संघातील मतदानाच्या आकडेवारीवर आणि पाठींब्यावर एक अत्यंत खळबळजनक विधान केले आहे. "मी माझ्या विचारांशी ठाम आहे, पण नागपुरातील ९९ टक्के अंडरवर्ल्ड आणि गुन्हेगारी जगतातील लोक माझे समर्थक आहेत; मात्र याचा अर्थ असा मुळीच होत नाही की मी त्यांच्या अवैध कामांना पाठिंबा देतो," असे गडकरी म्हणाले.



सुशिक्षित आणि गुन्हेगारी भागातील मतदानात मोठा फरक

आपल्या निवडणूक निकालांचे विश्लेषण करताना नितीन गडकरी यांनी मतदानामधील फरक स्पष्ट केला. ते म्हणाले की, नागपूरमधील सुशिक्षित आणि श्रीमंत वस्त्यांमध्ये त्यांना साधारण ७० ते ७५ टक्के मते मिळाली. मात्र, ज्या भागांची ओळख गुन्हेगारी क्षेत्र, अंडरवर्ल्ड किंवा 'रेड-लाईट एरिया' म्हणून आहे, तिथून त्यांना तब्बल ९२ टक्के मते मिळाली आहेत.

विकासाच्या कामांमुळे जनतेचा पाठिंबा

वेगवेगळ्या सामाजिक घटकांकडून मिळालेल्या या मोठ्या पाठिंब्याचे स्पष्टीकरण देताना त्यांनी सांगितले की, हा पाठिंबा पक्षाच्या किंवा व्यक्तीच्या विचारांपेक्षा तिथल्या विकासकामांचा परिणाम आहे. "आम्ही कोणत्याही भेदभावाशिवाय नागपूरच्या प्रत्येक कोपऱ्यात रस्ते, पायाभूत सुविधा आणि सामाजिक सोयी-सुविधा पोहोचवल्या आहेत. लोकांनी आमच्या कामावर विश्वास ठेवून मतदान केले आहे. प्रत्येकाशी वैयक्तिक संबंध ठेवणे वेगळे आणि त्यांच्या चुकीच्या कामांचे समर्थन करणे वेगळे," असे गडकरी यांनी स्पष्ट केले.

## डॉक्टरांसोबत केलेलं गैरवर्तन खपवून घेणार नाही; एकनाथ शिंदेंचा कठोर निर्णय, राहुल घरत निलंबित



**पणजी (गोवा)/मुंबई :** शिवसेना प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पालघरमधील एका खासगी रुग्णालयात डॉक्टरांसोबत होणाऱ्या गैरवर्तनाची गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणात, त्यांनी शिवसेना पालघर शहर प्रमुख राहुल घरत यांना पक्षातून निलंबित करण्याची घोषणा केली आहे. गोव्यात झालेल्या पश्चिम विभागीय परिषदेच्या बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी ही माहिती दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, पालघरमधील घटना अत्यंत दुर्दैवी आहे. डॉक्टर किंवा इतर रुग्णालय कर्मचाऱ्यांवर हल्ला करणे कोणत्याही परिस्थितीत समर्थनीय नाही. शिवसेना अशा घटनांना कधीही पाठिंबा देणार नाही. ते म्हणाले की, जर रुग्णासोबत कोणताही निष्काळजीपणा किंवा गैरवर्तन झाले असेल, तर कायदेशीर तक्रार दाखल करायला हवी होती. कोणीही कायदा हातात घेणे योग्य नाही आणि शिवसेना त्याला पाठिंबा देणार नाही. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, डॉक्टरवर हल्ला केल्याबद्दल शिवसेनेचे पालघर शहर प्रमुख राहुल घरत यांना पक्षातून निलंबित करून काढून टाकण्यात येईल. त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांना स्पष्ट इशारा दिला की, डॉक्टरांवरील हल्ला कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही आणि शिवसेना अशा कोणत्याही घटनेला पाठिंबा देणार नाही.

## साईबाबांची शिकवण सर्वदूर पोहोचवण्याचा गाडीलकरांचा संकल्प

शिर्डी ( प्रतिनिधी) साईबाबांची शिकवण केवळ साई सच्चरित्राच्या पानांपुरती मर्यादित न राहता ती प्रत्येक साईभक्ताच्या मनात रुजली पाहिजे, त्यांच्या आचरणात उतरली पाहिजे आणि घराघरात पोहोचली पाहिजे, या व्यापक उद्देशाने संस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर हे विविध अभिनव उपक्रमांना चालना देत असून त्यांच्या या सेवाभावी उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक केले जात आहे.

रवींद्र जोशी यांच्या माध्यमातून साई सच्चरित्र पारायण परीक्षेची सुरुवात हा याच दिशेने झालेला महत्त्वपूर्ण उपक्रम आहे. साई सच्चरित्र केवळ वाचण्याऐवजी त्यातील प्रसंग, बाबांचे विचार, तत्त्वज्ञान आणि मानवतेची शिकवण समजून घेऊन ती साईभक्तांच्या जीवनात उतरावी, हा या उपक्रमामागील उद्देश आहे.

साईबाबांच्या जीवनकार्याची आणि साई सच्चरित्राची चांगली माहिती असलेल्या कर्मचाऱ्यांनी विविध ठिकाणी प्रवचने द्यावीत, साई पालख्यांमध्ये सहभागी व्हावे आणि भक्तांना साईबाबांचे जीवन, विचार व मानवतेची शिकवण समजावून सांगावी, अशी भूमिका गाडीलकर यांनी घेतली आहे.

त्यांच्या या प्रेरणेतून अनेक कर्मचारी साई सच्चरित्राचा बारकाईने अभ्यास करून बाबांची शिकवण आत्मसात करीत असून, प्रवचनाच्या माध्यमातून ती थेट साईभक्तांपर्यंत पोहोचविण्यासाठी पुढे येत आहेत. साईंचे विचार अधिक व्यापक आणि प्रभावीपणे समाजात पोहोचले पाहिजेत, हा त्यांच्या भूमिकेचा केंद्रबिंदू आहे.

साईभक्तांशी संस्थेतील प्रत्येक कर्मचाऱ्याने प्रेमाने, नम्रतेने, संवेदनशीलतेने आणि सेवाभावी वृत्तीने वागावे, यासाठी संस्थेच्या विविध विभागांतील सुमारे ८ ते १० हजार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प गाडीलकर यांनी पुढे आणला आहे. भक्तांमध्ये साईंचे रूप पाहून त्यांची सेवा केली पाहिजे, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या पाहिजेत आणि प्रत्येक सेवेत साईसेवेचा भाव असला पाहिजे, हा या प्रशिक्षणाचा मुख्य विचार आहे.

साई सच्चरित्र पारायण परीक्षा, कर्मचाऱ्यांनी प्रवचन करण्याची संकल्पना आणि हजारो कर्मचाऱ्यांना सेवाभावी प्रशिक्षण या तिन्ही उपक्रमांमागे साईबाबांची शिकवण सर्वदूर पोहोचविण्याचा एकच व्यापक ध्यास त्यांनी घेतला आहे.

साई सच्चरित्र हा केवळ वाचण्याचा ग्रंथ नाही; तो जगण्याचा ग्रंथ आहे, आणि त्यातील मानवतेची, संवेदनशीलतेची, प्रेमाची, श्रद्धेची व सबुरीची शिकवण प्रत्येक साईभक्ताच्या मनात रुजली पाहिजे, या विचारातून गाडीलकर साहेबांची ही वाटचाल सुरू आहे.

त्यांच्या या सेवाभावी आणि दूरदृष्टीपूर्ण भूमिकेचे सर्व स्तरांतून स्वागत होत असून, या उपक्रमांचे दूरगामी परिणाम होतील आणि साईबाबांचा मानवतेचा संदेश अधिक व्यापकपणे समाजापर्यंत पोहोचेल, अशी भावना अनेकांना व्यक्त केली जात आहे.

## ग्रामीण भागातील LPG बुकिंगचा 45 दिवसांचा नियम रद्द; आता 25 दिवसांनी सिलेंडर बुक करता येणार

**मुंबई :** जागतिक बाजारातील घडामोडी आणि पुरवठा साखळीतील बदलांचा परिणाम देशातील गॅस वितरण आणि दरांवर होत असतो. ग्राहकांच्या गरजा तसेच बाजारातील परिस्थितीचा विचार करत सरकारने याबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.

आता ग्रामीण भागातील ग्राहकांनाही अवघ्या २५ दिवसांच्या अंतराने घरगुती LPG सिलेंडरचे रिफिल बुक करता येणार आहे. केंद्र सरकारने ग्रामीण भागातील ग्राहकांसाठी लागू असलेली ४५ दिवसांची बुकिंगची अट हटवली आहे. त्यामुळे आता ग्रामीण आणि शहरी भागातील सिलेंडर बुकिंगसाठी २५ दिवसांचे अंतर समान राहणार आहे.

केंद्रीय पेट्रोलियम राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी सोमवारी याबाबत माहिती देताना सांगितले की, हा बदल तातडीने लागू करण्याचे निर्देश देशातील सर्व ऑइल मार्केटिंग कंपन्यांना देण्यात आले आहेत.

इराण युद्धादरम्यान निर्बंध लागू करण्यात आले

अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धादरम्यान LPG पुरवठ्यावर दबाव निर्माण झाला होता. त्यामुळे ९ मार्च २०२६ रोजी शहरी भागात रिफिल बुकिंगमधील अंतर २५ दिवस, तर १२ मार्च रोजी ग्रामीण भागात हे अंतर ४५ दिवस करण्यात आले होते.

LPG पुरवठ्याची स्थिती सुधारल्यानंतर निर्णय

सध्या LPG पुरवठ्याच्या स्थितीत सुधारणा झाली आहे आणि प्रलंबित बुकिंगची संख्याही कमी झाली आहे. त्यामुळे केंद्र सरकारने ग्रामीण भागातील ग्राहकांवर लागू असलेले हे निर्बंध हटवण्याचा निर्णय घेतला आहे.

## श्रावणाच्या चौथ्या सोमवारी घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगचे दर्शनासाठी प्रचंड गर्दी



तभा वृत्तसेवा

**खुलताबाद प्रतिनिधी दि ७ :** वेरूळ श्रावण महिन्याच्या चौथ्या सोमवारी वेरूळ येथील श्री घृष्णेश्वर ज्योतिर्लिंगाच्य दर्शनासाठी लाखो भाविकांची प्रचंड गर्दी पायी दिंडी व कावड यात्रा. मोठ्या प्रमाणात रविवारी मध्यरात्रीपासून सुरुवात झाली होती भाविकांनी 'हर हर महादेव', 'बम बम भोले'चा जयघोष करत घृष्णेश्वरा १२ वे ज्योतिर्लिंग भगवंताचे दर्शन घेतले.

घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिरासह. वेरूळ लेणी पाहण्यासाठीही पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती. मंदिरापासून जोडरस्त्यापर्यंत बॅरिकेड्स लावून दर्शनासाठी रांगेची व्यवस्था मंदिर प्रशासनाच्या वतीने करण्यात आली होती.

गाभाऱ्यातील अभिषेक श्रावण मध्ये महिनाभर बंद करण्यात आलेली आहे. मंदिर परिसरातील मागील गेट हे दर्शन करून भाविकांना व्यवस्थित बाहेर पडण्यासाठी केलेले आहे त्यासाठी या वर्षी प्रथमच महाराष्ट्र सिक्युरिटी फोर्सच्या जवानांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. रविवारी रात्री दर्शनासाठी मोठ्या संख्येने आलेले भाविक रात्री दहा वाजेपासूनच दर्शन रांगेत लागले होते घृष्णेश्वर मंदिर ट्रस्ट चे अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टीची जिल्हा परिषद सदस्य कुणाल भाऊ दांडगे यांच्या नियोजनाखाली आलेल्या भाविक भक्तांना मंदिराच्या वतीने सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत होत तसेच भाविकांच्या सुरक्षेसाठी मंदिर परिसरात सीसीटीव्ही, छुपे कॅमेरे, खासगी सुरक्षारक्षक तसेच पोलिस कर्मचारी स्वयंसेवक प्रामाणिकपणे आपले कर्तव्य निभवत

## सोयगाव येथील प्रणय कुलकर्णी 'समर्थ कार्य गौरव पुरस्काराने सन्मानित



**सोयगाव,दि.७ सप्टेंबर :** येथील कै.बाबुरावजी काळे स्कूलचे तंत्रस्नेही शिक्षक प्रणय प्रमोद कुलकर्णी यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची, तंत्रज्ञानाचा प्रभावी व सर्जनशील वापर करून विद्यार्थ्यांच्या ज्ञाननिर्मितीला दिलेल्या विधायक दिशेची तसेच आपल्या कर्तव्याप्रती असलेल्या निष्ठा, समर्पण आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन समर्थ बहुउद्देशीय प्रतिष्ठान, चिखली, जिल्हा बुलढाणा यांच्या वतीने "समर्थ कार्य गौरव पुरस्कार - २०२६" अंतर्गत "आदर्श युवा तंत्रस्नेही शिक्षक" हा सन्मान दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी कृतज्ञतापूर्वक व गौरवपूर्वक प्रदान करण्यात आला.ज्ञान, तंत्रज्ञान आणि संस्कार यांचा समन्वय साधत नव्या पिढीला सक्षम, सुसंस्कृत व भविष्यांभिमुख घडविण्याच्या त्यांच्या कार्यास मनःपूर्व्क अभिवादन त्यांच्या या यशाबद्दल शिवज्योती शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा ज्योतीताई रंगनाथ काळे,सचिव देविना काळे - भटकर, संचालक शिवदीप काळे, कोषाध्यक्षा सुनयना काळे, ज्ञानज्योती बीएड महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेश यादव, बाबुरावजी काळे मराठी स्कूलचे मुख्याध्यापक निलेश पाटील, उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलीस व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

## तीर्थकुंड ते गंजेश्वर महादेव पायी कावड यात्रा संपन्न



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी संतोष करपे .श्री क्षेत्र वेरूळ अहिल्याबाई होळकर तीर्थकुंड या ठिकाणाहून निघणाऱ्या हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत पायी कावड यात्रा दरवर्षी प्रमाणे याही वर्षी श्रावण महिन्या त मोठ्या उत्साहात भक्तिमय वातावरणात हर हर महादेव च्या गजरात पायी कावड यात्रेचे आयोजन दि ७ सप्टेंबर रोजी सोमवारी सकाळी १० वाजेच्या दरम्यान आयोजन करण्यात आले होते कावड यात्रेचा भव्य शुभारंभ हजारो भाविक भक्त च्या उपस्थितीत अभिषेक जल पूजन करून कावड यात्रा प्रमुख चंदाताई राजपूत. व श्री क्षेत्र वेरूळ नाथ आश्रम प्रमुख साध्वी आक्काताई महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीफळ फोडून सुरुवात करण्यात आली

यावेळी भव्य सजवलेला रथ भजनी मंडळ टाळमृदुंगाच्या गजरात पावली खेळत हर हर महादेव चा गजर करत कावड यात्रा घृष्णेश्वर मंदिर बारावे ज्योतिर्लिंग . वेरूळ लेणी खुलताबाद भद्रा मारुती मंदिर व लहाने आळी मारुती मंदिर बाजार गल्ली चुलीभांजन या ठिकाणाहून मोठ्या संख्येने पायी चालत आलेले भाविक भक्ता कावड यात्रा गंजेश्वर महादेव मंदिर या जागृत देवस्थानाच्या ठिकाणी भाविकांचे उपस्थितीत महाप्रसादाने समारोप करण्यात आला या जागृत देवस्थानाच्या ठिकाणी हजारो भाविक भक्तां व मान्यवरांच्या उपस्थितीत महाआरती करून महाप्रसादाने समारोप करण्यात खुलताबाद पोलीस स्टेशनच्या वतीने पोलीस निरीक्षक प्रशांत महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवण्यात आला होता

# ‘आरक्षण द्या, अन्यथा गप्प बसणार नाही’; माजलगावात धनगर समाजाचा एल्गार

## तहसील कार्यालयासमोर सकल धनगर समाजाचे जोरदार निदर्शने; सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणला

**माजलगाव, दि. ७ (प्रतिनिधी) :** धनगर समाजाच्या एसटी आरक्षणाची तातडीने अंमलबजावणी करावी, तसेच समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सकल धनगर समाजाच्या वतीने सोमवार (दि. ७) तहसील कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली. आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील सर्व तहसील कार्यालयांसमोर करण्यात येत असलेल्या आंदोलनाचा हा एक भाग होता.

यावेळी धनगर समाजाच्या मागण्यांसाठी कार्यकर्ते मोठ्या संख्येने एकवटले होते. सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत ‘धनगर समाजाला न्याय मिळालाच पाहिजे’, ‘एसटी आरक्षणाची अंमलबजावणी करा’ अशा घोषणांनी तहसील कार्यालयाचा परिसर दणाणून गेला.

धनगर आरक्षणासंदर्भातील सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणात राज्य शासनाने पूर्ण ताकदीने



बाजू मांडावी, दि. ८ सप्टेंबरपूर्वी ठोस प्रतिज्ञापत्र दाखल करावे आणि या प्रकरणासाठी सक्षम वकिलांची नियुक्ती करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच न्यायालयाचा निर्णय प्रतिकूल आल्यास धनगर समाजाला एसटी प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासनाने पर्यायी ‘प्लॅन बी’ तयार ठेवावा, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. याशिवाय श्री संत बाळूमामा देवस्थानासाठी स्वतंत्र कायदा करावा, देवस्थानच्या विश्वस्त मंडळावर किमान २१ सदस्यांची नियुक्ती करावी आणि अध्यक्षपद धनगर समाजातील व्यक्तीला द्यावे, अशी मागणी करण्यात आली. मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील ‘मिसिंग लिंक’ला स्वातंत्र्यवीर सिंगोबा धनगर यांचे नाव देण्याची तसेच चंचगोट रेल्वे स्थानकाचे नामकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने करण्याची मागणीही यावेळी करण्यात आली.

शासनाने धनगर समाजाच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा सकल धनगर समाजाच्या वतीने देण्यात आला.

‘आरक्षण आमचा हक्क आहे, आश्वासन नको; अंमलबजावणी हवी’, या भूमिकेतून आंदोलनकर्त्यांनी शासनाविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

# अधुनिक क्षेत्रांमध्ये कौशल्य विकसित करण्याची गरज - देवदत्त चौसाळकर




**अंबाजोगाई:** विद्यार्थ्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात आर्टीफिशियल इंटलेजंसी डाटा सायन्स, रोबोटिक्स यांसारख्या आधुनिक क्षेत्रांमध्ये कौशल्य विकसित करण्याची गरज असल्याचे मत देवदत्त चौसाळकर यांनी व्यक्त केले. योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित, कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक मध्ये शिक्षक दिनानिमित्त ऑटोमोबाईल व मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांच्या करिअर मार्गदर्शन विशेष सेमिनार मध्ये ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष गणपत व्यास उपस्थित होते. चौसाळकर यांनी पॉलिटेक्निक शिक्षणानंतर विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध विविध संधींबद्दल,विशेषतः डिग्री इंजिनिअरिंग, उद्योग क्षेत्रातील नोकरीच्या संधी, उद्योजकतेच्या संधी व करिअर नियोजन याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना पॉलिटेक्निकनंतरच्या विविध शिक्षण व करिअर संधींबाबत महत्त्वपूर्ण माहिती त्यांनी सांगितली. कार्यक्रमाचे प्रास्तविक प्राचार्य डॉ.रमण यांनी केले. सूत्रसंचलन ऑटोमोबाईल विभाग प्रमुख प्रा.बप्पासाहेब सोनवणे यांनी केले. यावेळी यंत्र अभियांत्रिकी विभागप्रमुख प्रा.शाम गडदे व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# अंबाजोगाईतील 'फॉलोवर्स क्वार्टर' ZP प्राथमिक शाळेची,छावणी दुर्दशा

## जि. प. शिक्षण विभागाचे दुर्लक्ष, जनावरांचा विळखा आणि खराब भिंतींमुळे शाळा संकटात



**अंबाजोगाई :** येथील फॉलोवर्स क्वार्टर परिसरातील पहिली ते सातवीपर्यंत असणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (छावणी) सध्या प्रशासनाच्या कमालीच्या दुर्लक्षामुळे बिकट अवस्थेत सापडली आहे. शाळेच्या भिंती पूर्णपणे खराब झाल्या असून परिसरात जनावरांचा मोठा विळखा वाढला आहे. त्यामुळे या शाळेतील विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि शिक्षण धोक्यात आले आहे.

शाळेची दैनावस्था अन् जनावरांचा अड्डा

इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतचे वर्ग चालणाऱ्या या शाळेत परिसरातील अनेक गोरगरीब कुटुंबातील मुले शिक्षणासाठी येतात. परंतु, योग्य देखभाल आणि डागडुजीअभावी शाळेच्या भिंती पूर्णपणे खराब आणि जीर्ण झाल्या आहेत. त्यातच शाळा परिसरात मोकाट जनावरांचा वावर वाढल्याने शाळेला जनावरांच्या विळख्याचे स्वरूप आले आहे. या अस्वच्छ आणि भीतीदायक वातावरणात चिमुकल्या विद्यार्थ्यांना आपले धडे गिरवावे लागत आहेत. हि शोकांतिका आहे.

प्रशासकीय उदासीनतेमुळे विद्यार्थ्यांची हेळसांड

शिक्षण विभागाच्या या उदासीन कारभारावर पालक व स्थानिक नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला आहे. गटशिक्षणाधिकारी (BEO) आणि गटविकास अधिकारी (BDO) या जबाबदार अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष न दिल्यामुळे या शाळेची अशी वाईट अवस्था झाली आहे.

अधिकाऱ्यांनी लक्ष दिल्यास कायापालट शक्य

जर गटशिक्षणाधिकारी आणि गटविकास अधिकारी यांनी या शाळेकडे गांभीर्याने लक्ष दिले, शाळेची डागडुजी करून स्वच्छता व सुरक्षेच्या उपाययोजना केल्या, तर ही शाळा एक सुंदर आणि सुशिक्षित शाळा म्हणून नावारूपाला येऊ शकते. प्रशासकीय पाठबळ आणि चांगल्या सुविधा मिळाल्यास पालकांचा जिल्हा परिषद शाळेवरील विश्वास पुनरुज्जीवित होऊन शाळेतील विद्यार्थी संख्येत (पटसंख्येत) मोठी वाढ होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# बीड जिल्हा युवा महोत्सवात तुलसी महाविद्यालयाचे यश; तीन प्रमुख कला प्रकारांत पटकावली पारितोषिके

**बीड (प्रतिनिधी) :** अभ्यासासोबतच विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देणाऱ्या तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी बीड जिल्हा युवा महोत्सवात उल्लेखनीय कामगिरी करत तीन प्रमुख कला प्रकारांत पारितोषिके पटकावली. या यशामुळे महाविद्यालयाच्या यशस्वी परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने शिरसाळा येथील पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालयात दि. ४ व ५ सप्टेंबर रोजी बीड जिल्हा युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. दोन दिवस रंगलेल्या या महोत्सवात जिल्ह्यातील विविध महाविद्यालयांतील युवा कलावंतांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे सादरीकरण केले.

महोत्सवातील विविध चुरशीच्या स्पर्धांमध्ये तुलसी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या उत्कृष्ट कामगिरीने विशेष छाप पाडली. मूक अभिनय स्पर्धेत महाविद्यालयाच्या संघाने प्रभावी अभिनयाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावला. मिमिक्री स्पर्धेत रोहित गव्हाणे याने आपल्या उत्कृष्ट सादरीकरणाने द्वितीय क्रमांक मिळवला. तर वाद-विवाद स्पर्धेत आदित्य ठोंबरे आणि रोहित गव्हाणे यांनी अभ्यासपूर्ण व मुद्देसूद मांडणी करत तृतीय क्रमांक पटकावला.

विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डी. जी. निकाळजे आणि सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. विवेक जोगदंड यांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे तसेच मार्गदर्शक प्राध्यापकांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# वरद दत्तप्रसाद इंदाणी यांची KEM मुंबई येथे MBBS साठी निवडी बद्दल माहेश्वरी सभेच्या वतीने सत्कार



**माजलगाव प्रतिनिधी :** माजलगाव येथील वरद दत्तप्रसाद इंदाणी यांनी NEET परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत मुंबई येथील प्रतिष्ठित सेठ जी.एस. मेडिकल कॉलेजचे KEM रुग्णालयात MBBS अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळविला आहे. त्यांच्या या यशाबद्दल माहेश्वरी सभेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच माजलगाव शहरासह सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. वरद इंदाणी यांनी NEET परीक्षेत 624 गुण मिळवत अखिल भारतीय क्रमांक (AIR) 4429, तर महाराष्ट्र राज्य क्रमांक 304 प्राप्त केला. त्यांच्या या यशामागे सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत, जिद्द आणि योग्य मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे.

NEET परीक्षेच्या तयारीसाठी पुण्यातील प्रसिद्ध झा शिक्षण सेवा संस्था येथे त्यांनी तयारी केली. इयत्ता दहावीपर्यंत सिंदफणा पब्लिक स्कूल येथे शिक्षण घेतले.शालेय जीवनापासूनच अभ्यासात सातत्य ठेवत होता त्यांनी वैद्यकीय क्षेत्रात करिअर करण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. वरद दत्तप्रसाद इंदाणी यांला भविष्यात उत्कृष्ट डॉक्टर बनून समाजाची सेवा करावी अशा शुभेच्छा माहेश्वरी सभेच्या वतीने देण्यात आल्या.

# दुष्काळी परिस्थित न.प.च्या माध्यमातून ग्रामीण भागात पाणी टॅंकर सुरु

## दुष्काळात ग्रामीण भागाला न.प. पाणी कमी पडू देणार नाही- बाळराजे पवार

गेवराई - पावसाळ्यात बीड जिल्ह्यात पाऊस न झाल्याने अनेक गावाला पिण्याचे पाणी सुध्दा मिळेना अशा परिस्थितीत प्रशासनाच्या वतीने गेवराई तालुक्यातील टंचाईग्रस्त अनेक गावाला पाणी टॅंकर सूरू केले आहे याविषयी माहिती अशी की गेवराई तालुक्यातील अनेक गावाला दुष्काळी परिस्थिती पाणी टंचाई निर्माण झाली आहे अशा परिस्थितीत प्रशासनाच्या वतीने ग्रामीण भागात पाणी टॅंकर सूरू करण्यात येत आहे तरी येऊ घातलेल्या पाणी टंचाईग्रस्त गावांना नगरपालिकेच्या माध्यमातून ग्रामीण भागाला पाणी कमी पडू देणार नाही असे मत लोकनेते बाळराजे पवार यांनी व्यक्त केले आहे ते म्हणाले की गेवराई तालुक्यात ज्या ज्या वेळी पाणी संकट निर्माण झाले होते त्यावेळी मा.लक्ष्मण आण्णा पवार यांनी



शेकडो टॅंकर पाणी ग्रामीण भागाला दिले होते यावेळी सुध्दा तसी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे अशा वेळी शासनाच्या वतीने जे काही टॅंकर सूरू केले जातील त्यास पाणी उपलब्ध करून देण्यात येईल असे बाळराजे पवार यांनी सांगितले आहे

पाऊस न पडल्याने गेवराई तालुका सध्या दुष्काळी परिस्थितीचा सामना करत आहे तरी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तालुक्यातील मादळमोही,कुभेजळगाव,

पौळाचीवाडी, माटेगाव, चव्हाणवाडी,बुधनेरवाडी, सुशी कवडगाव, आदि गावाला टॅंकर सुरू केले आहे ते टॅंकर प्रत्येक्षात सुरू झाले आहेत यावेळी मुख्याधिकारी विक्रम माडुरके मा.नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, उपनगराध्यक्ष भगवान घुबार्डे, राजेंद्र राक्षसभुवनकर, कापसे आदि न.प. कर्मचारी अधिकारी उपस्थित होते

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या नंदिनी गर्गेचे युवा महोत्सवात यश

## मृदमूर्ती, पोस्टर आणि रांगोळी स्पर्धेत पटकावले पारितोषिके



**माजलगाव :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर यांच्यासंयुक्त विद्यमाने आयोजित बीड जिल्हा युवा महोत्सव २०२६ सिरसळा येथील श्री. पंडित गुरुपारडीकर महाविद्यालय येथे उत्साहात संपन्न झाला. या महोत्सवात सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगावची गुणवंत विद्यार्थिनी कुमारी नंदिनी गर्गे हिने विविध कलाप्रकारांत उल्लेखनीय यश संपादन केले.

नंदिनी गर्गे हिने मृदमूर्ती कला प्रकारात प्रथम क्रमांक, पोस्टर स्पर्धेत द्वितीय क्रमांक तर रांगोळी स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावत आपल्या कलागुणांची चमक दाखवली. एकाच युवा महोत्सवात तीन पारितोषिके मिळवून तिने महाविद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या केंद्रीय युवक महोत्सवात सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करणार आहे.नंदिनी गर्गे हिला प्रा. डॉ. के .बी .गंगणे ,डॉ.बी. आर. नळे , डॉ. अरुण पेंटावा,र,डॉ. अर्चना कचरे डॉ. पी. ए. देशपांडे यांचे मार्गदर्शन लाभले. नंदिनी गर्गे हिच्या यशाबद्दल प्रभारी प्राचार्य डॉ एन के मुळे, उपप्राचार्य डॉ.एम. ए कव्हळे ,उपप्राचार्य प्रकाश गवते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते

# उद्योजक व युवक-युवतींनी क्युआर कोडद्वारे नाव नोंदणी करावी - जिल्हाधिकारी

**बीड, दि. 7 (जिमाका) :-** बीड जिल्ह्यातील तरुण-तरुणींना रोजगाराभिमुख आणि तंत्रज्ञानयुक्त शिक्षण मिळण्यासाठी एक मोठी सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. टाटा टेक्नॉलॉजीज आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरातील औद्योगिक वसाहतीमध्ये एका अद्ययावत व तंत्रज्ञानयुक्त कौशल्यवर्धन प्रशिक्षण केंद्राचे अंतिम टप्प्यात आले आहे. तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक-युवतींनी आणि उद्योजकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन आपल्या कौशल्याचा विकास करावा आणि रोजगाराच्या नवीन संधी प्राप्त कराव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

कौशल्यवर्धन केंद्रामध्ये रोजगाराभिमुख एकूण 18 विविध अभ्यासक्रम चालविले जाणार असून पहिल्या वर्षासाठी हे सर्व कोर्सेस विद्यार्थ्यांना पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.या अभ्यासक्रमांची सविस्तर माहिती आणि मार्गदर्शन विद्यार्थ्यांना मिळावे, या उद्देशाने बीड जिल्ह्यातील पाच प्रमुख ठिकाणी विशेष माहिती सत्र आयोजित करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील आयटीआय, पॉलिटेक्निक आणि अभियांत्रिकी पदवीच्या विद्यार्थ्यांनी तसेच स्थानिक उद्योजकांनी या सेमिनारला उपस्थित राहावे.

विद्यार्थ्यांपर्यंत या कोर्सेसची इत्यंभूत माहिती पोहोचवण्यासाठी जिल्ह्यातील पाच वेगवेगळ्या ठिकाणी सेमिनार आयोजित केले जाणार आहेत. इच्छुकांनी आपल्या जवळच्या केंद्रावर उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घ्यावा. या प्रशिक्षण केंद्रात प्रवेश मिळविण्यासाठी आणि नाव नोंदणी करण्यासाठी प्रशासनातर्फे एक विशेष क्यूआर कोड जारी करण्यात आला आहे. विद्यार्थी हा क्यूआर कोड स्कॅन करून आपली नोंदणी अत्यंत सुलभरीतीने करू शकतात.

जिल्ह्यात माहिती सत्राचे दि.8 सप्टेंबर 2026 रोजी सकाळी 11 ते 12 या वेळेत बीड येथील शासकीय तंत्रनिकेतन तर दुपारी 3 ते 4 यावेळेत आदित्य तंत्रनिकेतन होणार आहे. दि.9 सप्टेंबर रोजी सकाळी 11 ते 12 या वेळेत अंबाजोगाई येथील टी.बी.गिरवलकर तंत्रनकितनमध्ये तर दुपारी 3 ते 4 यावेळेत माजलगाव येथील इगलवुड तंत्रनिकेतनमध्ये होणार आहे. दि.10 सप्टेंबर रोजी सकाळी 11 ते 12 या वेळेत आष्टी येथील आंनद चॅरिटेबल ट्रस्ट डिप्लोमा इन इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी येथे आयोजन करण्यात आले आहे. तरी आपल्या जवळच्या सेमिनारला उपस्थित राहून सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.

# दागिने लुटून पसार; काही तासांतच महिला-पुरुष आरोपी पोलिसांच्या ताब्यात

## "त्या"जोडप्याला बीड शहर पोलिसांनी दाखवला हिसका.बार्शी रोडवरील घटनेचा झटपट छडा

**बीड (प्रतिनिधी) :** बार्शी रोड परिसरातील मोरया मल्टी सर्विसेस दुकानात घुसून फिर्यादीला जबरदस्तीने दुकानाबाहेर नेले आणि अंदाजे ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लुटून पसार झालेल्या महिला-पुरुष आरोपींच्या मुसक्या बीड शहर पोलिसांनी काही तासांतच आवळल्या. गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत आरोपींपर्यंत धडक मारल्याने शहर पोलिसांच्या कार्यतत्परतेचे पुन्हा एकदा दर्शन घडले.

दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजी बार्शी रोड परिसरातील मोरया मल्टी सर्विसेस येथे अनोळखी महिला व पुरुषाने प्रवेश केला. त्यांनी फिर्यादीला जबरदस्तीने



दुकानाबाहेर नेऊन त्याच्याकडील अंदाजे ५० हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने घेऊन पोबारा केला. याप्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेत बीड शहर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी समीर खान याच्यासह एका महिला आरोपीला काही वेळातच ताब्यात घेतले. त्यामुळे गुन्हा करून पसार होणाऱ्या आरोपींना बीड शहर पोलिसांनी स्पष्ट इशारा दिला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि पोलीस निरीक्षक विनोद घोळवे यांच्या दर्शनाखाली PSI गणेश कुमावत, पोहेकॉ शहेंशाह सय्यद, गोवर्धन सोनवणे, राजेंद्र मुंडे, सचिन अलगट, पोलीस अंमलदार इलियास शेख, मंगेश शिंदे, दराडे, बापू गायकवाड आणि सचिन वाघमारे यांनी सहभाग घेतला. गुन्हा दाखल होताच अवघ्या काही वेळात आरोपींचा माग काढून त्यांना ताब्यात घेण्याची कामगिरी बीड शहर पोलिसांनी बजावली. या कारवाईमुळे शहरात गुन्हेगारांमध्ये धडकी आणि नागरिकांमध्ये पोलिसांबद्दलचा विश्वास वाढला आहे. गुन्हा कितीही गंभीर असो आरोपी कितीही दूर पळो; बीड शहर पोलिसांचा तपास त्याच्यापर्यंत पोहोचणारच असा संदेश देण्यात आला.

# जिल्हास्तरीय युवक महोत्सवात खोलेश्वर महाविद्यालयाचे घवघवीत यश

**अंबाजोगाई :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर व पंडित गुरू पार्डीकर महाविद्यालय, सिरसाळा यांच्या संयुक्त विद्यमाने सिरसाळा येथे नुकत्याच शुक्रवार, दिनांक ४ व शनिवार, दिनांक ५ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित जिल्हास्तरीय युवक महोत्सवात खोलेश्वर महाविद्यालयास चार पारितोषिके प्राप्त झाली.



महोत्सवामध्ये वैयक्तिक कलाप्रकार नाट्यसंगीत प्रकारामध्ये कु.नंदिनी कुलकर्णी यांना द्वितीय पारितोषिक तर भारतीय शास्त्रीय गायन प्रकारामध्ये तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे. पाश्चात्य समूह गायन स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांकाचे तर भारतीय समूह गायन या स्पर्धेत महाविद्यालयायास तृतीय पारितोषिक मिळालेले आहे. दोन्हीही स्पर्धेत कु.क्रांती एडके, कु.नंदिनी कुलकर्णी, कु.रेणुका चव्हाण, कु.ज्ञानेश्वरी आदाटे आणि चि.श्रीनाथ पांचाळ या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. पाश्चात्य समूह गायन यशस्वी होण्यासाठी विजय यादव यांनी सहकार्य केलं तसेच ग्रुपचे श्री.लोंढे यांनी ड्रम सेट साथसंगत केली. तर इतर कलाप्रकारासाठी प्रा.शैलेश पुराणिक व महादेव माने यांचे मार्गदर्शन लाभले. जिल्हास्तरीय युवक महोत्सवामध्ये खोलेश्वर महाविद्यालयाला पारितोषिक मिळाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर, संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, महाविद्यालयीन विकास समितीचे अध्यक्ष रामभाऊ कुलकर्णी, खोलेश्वर संकुलाचे अध्यक्ष डॉ.अतुलराव देशपांडे, कार्यवाह किरणदादा कोदरकर तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकारी यांनी कौतुक केलं. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दीपक फुलारी, उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड, डॉ.बिभीषण फड, डॉ.रवींद्र कुंबेफळकर, उपप्राचार्य आनंद पाठक यांनी जिल्हास्तरीय युवक महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान केला. या जिल्हास्तरीय युवक महोत्सवामध्ये डॉ.देविदास खोडेवाड, डॉ.रोहिणी अंकुश, प्रा.शैलेश पुराणिक, प्रा.महादेव माने आदींचे सहकार्य लाभले.

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक

# गणेशोत्सव शांततेत साजरा करावा- जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

**बीड, (जिमाका) :-** आपला गणेशोत्सव हा एकात्मतेचे प्रतीक आहे. या उत्सवामध्ये आपण सर्वांनी सर्वधर्मसमभाव राखत समाजातील सर्व घटकांना सहभागी करून घेतले पाहिजे. तसेच उत्सवादरम्यान कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवणार नाही याची सर्वांनी काटेकोर दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या बैठकीस जिल्ह्यातील श्रीगणेश मंडळाचे पदाधिकारी, शांतता समितीच्या सदस्यांसह पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपविभागीय अधिकारी, पोलिस उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मुख्याधिकारी यांची उपस्थिती होती. गणेशोत्सव काळात शहरात तसेच जिल्ह्यात शांतता व सलोख्याचे वातावरण राहावे, यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना केल्या जात आहेत.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# तालुकास्तरीय बॅडमिंटन व बुद्धिबळ स्पर्धांना उत्साहात प्रारंभ

## शुभदा, सई, वेदिका, व्यंकटेश, राज व ऋषिकेश ठरले सुवर्णपदकाचे मानकरी; बॅडमिंटनमध्ये 232 खेळाडूंचा सहभाग

तभा वृत्तसेवा

**कन्नड :** दि.०७ सप्टेंबर - राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आयोजित तालुकास्तरीय बॅडमिंटन व बुद्धिबळ स्पर्धांना शिवाजी महाविद्यालयातील बाबुरावजी औराळकर क्रीडा संकुलात उत्साहात प्रारंभ झाला. बॅडमिंटन स्पर्धेत तालुक्यातील विविध शाळा व महाविद्यालयांमधील तब्बल २३२ खेळाडूंनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी बाबुरावजी औराळकर यांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर मेजर ध्यानचंद व बाळासाहेब पवार यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून स्पर्धेला सुरुवात करण्यात आली. स्पर्धेचे उद्घाटन शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भोसले यांच्या हस्ते झाले.

यावेळी उपप्राचार्य डॉ. बी. के. मगर, लेफ्टनंट डॉ. विजय मातकर, बाबुलाल काळे,



बाळासाहेब पवार सार्वजनिक वाचनालयाचे सचिव रामकृष्ण पवार, क्रीडा विभागप्रमुख डॉ. उदय डोंगरे, तालुका संयोजक मुक्तानंद गोस्वामी, श्याम खोसरे, प्रवीण शिंदे, राकेश निकम, राहुल दणके, कधुबा चव्हाण, अजित खंबाट, विकेश कामठीकर, सतीश गडकरी, अमोल कदम आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाचा आदर्श प्राचार्य पुरस्कार मिळाल्याबद्दल क्रीडा शिक्षकांच्या वतीने प्राचार्य डॉ. विजय भोसले यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच शिवाजी महाविद्यालयाचे माजी खेळाडू राहुल दणके यांची रयत शिक्षण संस्थेत क्रीडा शिक्षक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचाही सत्कार करण्यात आला.

स्पर्धेत देवगिरी इंग्लिश स्कूल, फातिमा कॉन्व्हेंट स्कूल, साने गुरुजी माध्यमिक शाळा, जवाहर नवोदय विद्यालय, मदर गंगा इंग्लिश स्कूल, गौताळा व्हॅली स्कूल, ॲनी स्मार्ट स्कूल, जिल्हा परिषद प्रशाला बहिरगाव आदी शाळा व महाविद्यालयांतील खेळाडूंनी सहभाग घेतला.

# एमजीएम विद्यापीठाच्या सातव्या वर्धापन दिनाचे बुधवारी आयोजन

## कुलगुरू प्रा. बद्री नारायण तिवारी प्रमुख पाहुणे

**छत्रपती संभाजीनगर, दि.७ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाचा सातवा वर्धापन दिन सोहळा बुधवार, दिनांक ९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसचे कुलगुरू प्रा.बद्री नारायण तिवारी हे या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी असणार असून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवार हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ.पी. एम.जाधव, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, सर्व अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत वर्धापन दिन सोहळा संपन्न होणार आहे. एमजीएम विद्यापीठाच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठासमवेत यावेळी सामंजस्य करार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सेल्सफोर्स सेंटर ऑफ एक्सलन्स आणि फिनिशिंग स्कूल यांचे उद्घाटन होणार आहे. तसेच विद्यापीठातील प्राध्यापकांनी लिहिलेल्या पुस्तकांचे प्रकाशन आणि विद्यापीठातील उत्तम काम केलेल्या सर्वांचा यावेळी सन्मान करण्यात येणार आहे.

# रेंज रोव्हर इलेक्ट्रिक: ओरिजिनल लक्झरी एसयूव्ही च्या नव्या पर्वाचा प्रारंभ

**मुंबई :** ओरिजिनल लक्झरी एसयूव्हीअसलेली रेंज रोव्हर आता इलेक्ट्रिक प्रोपल्शनसह दाखल झाली असून त्यातून अधिक परिष्कृतता आणि क्षमतेच्या नव्या पर्वाची नांदी झाली आहे. 1970 पासून रेंज रोव्हरचे माहेरघर असलेल्या सोलिहल येथे तयार झालेली ही पहिली-वहिली इलेक्ट्रिक रेंज रोव्हर ब्रँडसाठी मैलाचा दगड ठरली आहे.आजवरच्या कोणत्याही रेंज रोव्हरपेक्षा अधिक शांत, अधिक सहजसुंदर, अधिक प्रतिसादक्षम आणि अधिक टॉर्क देणारी रेंज रोव्हर इलेक्ट्रिक अतुलनीय डिझाइन, अपवादात्मक परिष्कृतता आणि थक्क करणाऱ्या आधुनिकतेचा संगम घडवते. इलेक्ट्रिक प्रोपल्शनमुळे केबिनमधील आवाज कमी होतानाच रेंज रोव्हरची सहजसुंदर कामगिरी, कालातीत लक्झरी आणि तडजोडविरहित क्षमता ही मूळ वैशिष्ट्ये आणखी उजळून निघतात.इलेक्ट्रिक प्रोपल्शन डोळ्यांसमोर ठेवूनच सुरुवातीपासून उभारलेल्या लवचिक आर्किटेक्चरमध्ये ते बेमालूमपणे सामावून घेत रेंज रोव्हर इलेक्ट्रिकमध्ये दोन पर्मनंट मॅग्नेट 260 किलोवॅटइलेक्ट्रिक मोटर्स देण्यात आल्या आहेत, ज्या 405 किलोवॅट पर्यंत पॉवर आणि 850 एनएम टॉर्क निर्माण करतात. 600 किमीपर्यंतच्या रेंजमुळे1 आणि 535 किमीपर्यंतच्या रिअल-वर्ल्ड रेंजमुळे4 बहुतांश रेंज रोव्हर ग्राहकांना त्यांचा नेहमीचा दैनंदिन प्रवास पुन्हा चार्ज न करता पूर्ण करता येईल.

## जीतो प्रीमियर लीगचा दिमाखदार आंतरराष्ट्रीय शुभारंभ

**मुंबई:** : जीतो प्रीमियर लीग (जेपीएल) 2026 चा कोलंबोमध्ये दिमाखदार आणि भव्य शुभारंभ झाला. जैन समाजाच्या क्रिकेटविश्वातील प्रवासाला नवी दिशा देणारा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा मानला जात आहे. उद्घाटन सोहळ्याला क्रिकेट विश्वातील दिग्गज, नामवंत व्यक्तिमत्त्वे, जीतोचे वरिष्ठ पदाधिकारी, फ्रँचायझी मालक आणि खेळाडू मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्याने जैन इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन (जीतो) च्या वाटचालीतील एका नव्या आणि महत्त्वाकांक्षी पर्वाची सुरुवात केली.या तारांकित सोहळ्याचे प्रमुख आकर्षण भारताच्या टी-20 विश्वचषक विजेत्या संघाचा कर्णधार आणि जेपीएलचा ब्रँड ॲम्बेसेडर सूर्यकुमार यादव तसेच श्रीलंकेचा दिग्गज क्रिकेटपटू सनथ जयसूर्या हे होते. मिस वर्ल्ड 2017 मानुषी छिल्लर हिने कार्यक्रमाची शोभा वाढवली, तर लोकप्रिय श्रीलंकन गायिका योहानी हिने आपल्या बहारदार संगीत सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली.

## ग्लोबल आयकॉन किया सोरेंटो भारतात लाँच

**नवी दिल्ली :** एका जागतिक आयकॉनचा नवीन अध्याय आज भारतात सुरू होत आहे. किया इंडियाने डिझेलसाठी २७.९९ लाख रुपये आणि हायब्रिडसाठी २९.४९ लाख रुपये (एक्स-शोरूम) या सुरुवातीच्या किमतीत* किया सोरेंटो लाँच केली आहे, ज्यासह ब्रँडने भारतातील प्रीमियम थ्री-रो एसयूव्ही विभागात प्रवेश केला आहे. कियाची सर्वाधिक यशस्वी एसयूव्ही नेमप्लेट भारतातील ग्राहकांसाठी आणण्यासोबत हे लाँच भारतातील कियाची पहिली हायब्रिड ऑफर सादर करते. तसेच भारत-विशिष्ट सोरेंटोद्वारे रिअल-टाईम जनरेटिव्ह एआय क्षमता असलेला किया एआय असिस्टंट जागतिक स्तरावर प्रथमच सादर केला जात आहे, ज्यामुळे हे वैशिष्ट्य प्रदान करणारी ही या विभागातील पहिली वेईकल ठरली आहे.

# पक्ष मजबुतीसाठी सर्वांनी एक कुटुंब म्हणून काम करावे : वैशाली नागवडे

तभा वृत्तसेवा

**खुलताबाद :**दि.०७ सप्टेंबर - पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये परस्पर संवाद वाढविणे आवश्यक आहे. वरिष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये थेट संवाद निर्माण करून सर्वांनी एकजुटीने काम करावे. पक्ष मजबुतीसाठी प्रत्येकाने एका कुटुंबाप्रमाणे एकत्र येणे गरजेचे असून, पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करणाऱ्या सामान्य कार्यकर्त्याच्या पाठीशी पक्ष भक्कमपणे उभा राहील, अशी ग्वाही राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा वैशाली नागवडे यांनी दिली.



राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षा वैशाली नागवडे यांच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा दौऱ्यादरम्यान खुलताबाद (रत्नपूर) येथे जिल्हा कार्यकारिणी, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची संवाद बैठक घेण्यात आली.

बैठकीच्या आयोजनासाठी खुलताबाद तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर मातकर, महिला तालुकाध्यक्ष अंजूताई नागे, जिल्हा उपाध्यक्ष अनिल चव्हाण आणि पंचायत समिती सदस्य सुरेश जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी जिल्हाध्यक्षा स्वाती संतोष कोल्हे, प्रदेश सरचिटणीस सुवर्णाताई जाधव, जिल्हा कार्याध्यक्ष वैशालीताई साबळे, जिल्हा उपाध्यक्ष स्वातीताई पवार, तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर मातकर, महिला तालुकाध्यक्ष अंजूताई नागे, जिल्हा उपाध्यक्ष अनिल चव्हाण, सोनाली चव्हाण, कन्नड तालुकाध्यक्ष कैलास आकोलकर, कार्याध्यक्ष गीता अधाने, तालुका उपाध्यक्ष शोभाताई चव्हाण, ज्येष्ठ नेत्या व माजी जिल्हा परिषद सदस्य शोभाताई खोसरे, नगरसेवक कैलास बारगळ, पंचायत समिती सदस्य आजिनाथ साळुंखे व सुरेश जाधव, राज्य फेडरेशनचे संचालक पांडुरंग घुगे, नगरपरिषद कन्नडचे गटनेते संतोष निकम, मजूर फेडरेशनचे संचालक सुरेश डोळस, नगरसेविका विद्याताई काशिनाथ, नगरसेवक युवराज बनकर, महिला व बालकल्याण सभापती मनीषाताई डोळस, नगरसेवक असलम पटेल, उपनगर अध्यक्ष रवींद्र राठोड, बंटी काशिनाथ, स्वच्छता समिती सभापती अल्काताई जाधव यांच्यासह जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थेच्या बिडकीन शाखेतर्फे धारेश्वर महादेव मंदिरात केळी वाटप



**बिडकीन दि ७ सष्टेबर :** श्रावण सोमवारचे औचित्य साधून वर्धमान नागरी सहकारी पतसंस्था, शाखा बिडकीन तर्फे कचनेर येथील प्रसिद्ध धारेश्वर महादेव मंदिर परिसर येथे भाविकांसाठी केळी वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला.आज दि ७ रोजी सकाळी ७:३० ते १० या वेळेत महादेवाच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना पतसंस्थेच्या वतीने फळवाटप (केळी वाटप) करून फराळाची सोय करण्यात आली. श्रावण महिन्यातील पवित्र वातावरणात पतसंस्थेने सामाजिक बांधीलकी जपत हा स्तुत्य उपक्रम आयोजित केल्याबद्दल भाविकांनी समाधान व्यक्त केले.या प्रसंगी वर्धमान नागरी सहकारी पतसंस्थे च्या व्यवस्थापक माधवी पेचफुले , विभागीय व्यवस्थापक दत्ता पवार , बिडकीन शाखेचे अधिकारी, कर्मचारी वर्ग, पिग्मी प्रतिनिधी, तसेच स्थानिक नागरिक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल मंदिर देवस्थान व स्थानिक ग्रामस्थांच्या वतीने पतसंस्थेचे आभार मानण्यात आले.

# सोयगाव तालुक्यात 'लाल्या'सह मावा, तुडतुड्यांचे थैमान; कापूस शेतकरी संकटात

तभा.वृत्तसेवा

**सोयगाव दि.७ सप्टेंबर :** घोसला परिसरात पावसाच्या ओढीनंतर रोगाचा प्रादुर्भाव; तातडीने मार्गदर्शनाची शेतकऱ्यांची मागणी

सोयगाव तालुक्यातील प्रमुख नगदी पीक समजल्या जाणाऱ्या कापसावर यंदा संकटांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. प्रारंभी पावसाच्या लांबलेल्या दडीमुळे बळीराजा चिंतेत सापडला असतानाच, आता कापसावर मावा आणि तुडतुड्यांपाठोपाठ 'लाल्या' रोगाचा तीव्र प्रादुर्भाव झाला आहे. घोसला परिसरासह तालुक्यातील कापूस पिकावर या रोगाने थैमान घातल्याने शेतकरी पार हवालदिल झाले आहेत.



### "संकटातून सावरणे कठीण; कृषी विभागाने मदत करावी!"

"गेल्या वर्षी अतिवृष्टी आणि कापसाला मिळालेला कवडीमोल भाव यातून शेतकरी अजून सावरलेला नाही. यावर्षी पावसाने ओढ दिली असून, त्यातच कापसावर लाल्या रोग व मावा-तुडतुड्यांनी थैमान घातले आहे. यामुळे कापसाचे उत्पादन घटण्याची शक्यता नाकारता येत नाही. कृषी विभागाने लवकरात लवकर शेतात येऊन मार्गदर्शन व मदत करावी."

— लक्ष्मण अर्जुन पाटील (शेतकरी, घोसला)

चालू वर्षात सोयगाव तालुक्यात अंदाजे जवळपास २९ हजार ९०० हेक्टर क्षेत्रावर कापूस पिकाची लागवड झालेली आहे. मात्र, ऐन भरात आलेल्या पिकावर एकापाठोपाठ एक रोगांचे आक्रमण होत असल्याने यंदा कापसाच्या उत्पादनात मोठी घट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

दुष्काळात तेरावा महिना

गेल्या वर्षी अतिवृष्टीच्या सुलतानी संकटाचा सामना करावा लागला होता. त्यातच बाजारात कापसाला अपेक्षित भाव न मिळाल्याने मिळालेल्या कवडीमोल दरामुळे शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत सापडला होता. या सर्व संकटांतून शेतकरी सावरण्याचा प्रयत्न करत असतानाच, यावर्षी पावसाने मारलेली दडी आणि आता पिकावर उद्भवलेला 'लाल्या' व किडींचा प्रादुर्भाव यामुळे शेतकऱ्यांच्या पदरी पुन्हा निराशाच पडण्याची चिन्हे दिसत आहेत.

कृषी विभागाने तातडीने मार्गदर्शन करावे

कापसाची झाडे पिवळी व लाल पडू लागल्याने आणि पानांवर किडींचा मोठा हल्ला झाल्याने पिकाचे रक्षण कसे करावे, याबद्दल शेतकरी चिंतेत आहेत. त्यामुळे कृषी विभागाने घोसला व परिसरातील शेतांमध्ये प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करावी आणि शेतकऱ्यांना योग्य फवारणी व उपायांचे तातडीने मार्गदर्शन करावे, अशी आर्त हाक परिसरातील बळीराजाने दिली आहे.

# संतपिठातील मुलांचे वस्तीग्रह सुरु करण्याची मागणी

**पैठण दि ०७:-** पैठण येथील संत पीठ जागेत गेल्या अनेक वर्षापासून मुलांचे वस्तीगृह इमारत उभी राहिली होती. सदरील इमारत यापूर्वी बांधली होती ती वापरात नसल्यामुळे खराब झाली होती पुन्हा ती इमारत बांधण्यात आलेली आहे असे असतानाही विद्यार्थ्यांसाठी वस्तीगृह राहण्यासाठी अद्याप उपलब्ध करून देण्यात आलेले नाही त्यामुळे नागरिकात संताप व्यक्त करण्यात येत आहे तसेच संतपिठासाठी आवश्यक तेवढी सर्व सुविधायुक्त जागा शासनाच्या ताब्यात आहे संत पिठात सुसंस्कृत पिढी घडविण्यासाठी शिकविले जाणारे सर्व श्रेणीतील अभ्यासक्रम शिकविण्यासाठी आणि पूर्ण क्षमतेने संतपीठ तात्काळ उभा करण्यासाठी पंतप्रधान कार्यालय व मुख्यमंत्री कार्यालय ने लक्ष घालावे असे तरुण वारकऱ्यात बोलले जात आहे. सद्यस्थितीत संत पिठात सहा महिने व एक वर्षासाठीचा संतांचा अभ्यासक्रम शिकविला जात आहे. मराठवाडा विकासाच्या 42 कलमांतर्गत संतपिठ उभारण्याची घोषणा शासनाने सण 1981 मध्ये केली होती 40 वर्षाहून पेक्षा अधिक कालावधी लोटल्यानंतरही संतपिठ रेंगाळत असल्यामुळे नागरिकात व तरुणांत संताप व्यक्त केला जात आहे. त्याच प्रमाणे पैठण शहरातील डीएड कॉलेज मधील शिक्षक आणि ईतर प्रकारांची पदे बऱ्याच वर्षांपासून भरली नसून ती पदी तात्काळ भरती करावी अशी मागणी सुद्धा करण्यात आली आहे.

# कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल येथे शिक्षक दिनी "विद्यार्थी स्वयंशासन दिन" उपक्रमाने साजरा

तभा.वृत्तसेवा


सोयगाव,दि.७ सप्टेंबर

छात्र अध्यापक अध्यापिका यांनी स्वयंशासन दिनानिमित अध्यापन व शालेय कामकाज सांभाळून आपल्या शिक्षक गुरू यांचा केला सन्मान.



कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल सोयगाव येथे भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिनी विद्यार्थी यांनी छात्र अध्यापक व अध्यापिका भूमिका पार पडून साजरा केला. मुख्याध्यापक म्हणून ऋषिकेश पाटील,उपमुख्याध्यापक हेमंत खेडकर,पर्यवेक्षक मनोज उबाळे,साई बोखारे,छात्र अध्यापक प्रांजल पाटील,वेदिका पवार, सानिका महाजन,भावेश खैरनार,सोनम आगे,रिद्धी पाटील,सायली वामने,प्रथमेश मिसाळ,यश बघेल,विराज राऊत,साची वाघ,दीपाली बोडखे,नंदिनी पाटील,जान्हवी कापरे,पल्लवी तरटे,हर्षल मोरे वैष्णवी फुसे,आदि यांनी कामकाज पाहिले.परिपाठ पासून उपक्रमाला डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा प्रतिमा अभिवादन करून उपक्रम सुरू करण्यात आला.दिवसभर सर्व छात्र अध्यापक यांनी अध्यापन केले व सर्व शालेय कामकाज विद्यार्थी अध्यापक यांनी पार पाडले उत्कृष्ट छात्र अध्यापक म्हणून हेमंत खेडकर,वेदिका पवार,सोनम आगे,ऋषिकेश पाटील,यांची निवड करण्यात आली.स्वयंसेवक दुर्गेश जोशी,याने कामकाज पाहिले. यावेळी सर्व छात्र अध्यापक यांनी आपल्या गुरूंचा सत्कार करीत भेट देऊन सन्मान केला या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राध्यापक दादासाहेब पवार,यांची प्रमुख उपस्थित होती.यावेळी विद्यार्थी यांनी आपल्या शिक्षक यांचे प्रति व आज आलेल्या अनुभव कथन केले,सत्कार उत्तर देताना शाळेचे मुख्याध्यापक प्राध्यापक निलेश पाटील,आशा पंडित,भाग्यश्री काळे,सागर घाटे यांनी शिक्षकांचे जीवनातील स्थान तसेच विद्यार्थी अध्यापक यांचे कौतुक प्रमुख पाहुणे यांनी केले यावेळी मुख्याध्यापक निलेश पाटील,उपमुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलीस,योगेश काळे,अंजली कथळकर,रुपाली मानकर,शीतल पवार,मनीषा पाटील,शीतल गावंडे,सागर पाटील,उमेश जाधव,विद्या पाटील,अरुणा भोई,रंजना जाधव,वैशाली खेडकर,शीतल जाधव,प्रणय कुलकर्णी,श्रुती दुसाने,शिक्षक सेवकज्ञानेश्वर पंडित,रमेश कंडारे,संजय डापके,कृष्णा गोतमारे,यांचे सह सर्व छात्र अध्यापक अध्यापिका,विद्यार्थी यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्र समीक्षा ताडे व प्रांजल विसपुते हिने केले तर आभार सानिका महाजन यांनी मानले.

# लायन्स क्लब कडून आदर्श शिक्षकांच्या कार्याचा गौरव



**राहाता ( वार्ताहर) :** शिक्षक दिनाचे औचित्य साधून लायन्स क्लब ऑफ राहाता यांच्या वतीने शिक्षकांचा सन्मान करून त्यांच्या शैक्षणिक कार्याचा गौरव करण्यात आला. लायन्स क्लबचे अध्यक्ष उमेश शेटे यांच्या अध्यक्षतेखाली हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला..

कार्यक्रमास राहाता नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष विजय सदाफळ, गटनेते मुन्नाभाई शहा, सर्जेराव मते , झोन चेअरमन डॉ. संजय उबाळे, प्रकाश जोंधळे, सेक्रेटरी ॲड. दिनेश कार्ले, खिजर शहा, ॲड. संतोष घोडके, अंजली उबाळे, रतन चौधरी, सरला तायडे, श्वेता कार्ले, सविता काळे आदी मान्यवर उपस्थित होते. केंद्रप्रमुख जाधव सर तसेच नारायण जाधव, दत्ता गायकवाड, संजय आग्रे , सर्जेराव घोडके , भास्कर झावरे, मंडलिक शिलेदार, नानासाहेब गाडेकर व सर्व शिक्षक उपस्थित होते

डॉ. शर्वरी कुलकर्णी यांनी कॅन्सर या आजाराबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश सदाफळ, डॉ. संजय गायकवाड, लायन स्मिता मुरादे आणि सोहन उबाळे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सविता काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन लायन सरला तायडे यांनी मानले.


Vision Buldana Educational And Welfare Society's

**VISION COLLEGE OF NURSING YELGAON, BULDANA**

ADDRESS: CHIKHLI ROAD NEAR TOLL NAKA YELGAON, BULDANA-443002
Email: visionnursing2011@gmail.com Website: www.visionnursing.net

**ADMISSION NOTICE FOR A.Y. 2026-27**

Applications are invited from eligible candidates for admission to M.Sc. Nursing Course for the academic year 2026-27 in the prescribed format. Interested candidates can apply to this office as mentioned below.

| | Seat Matrix (M.Sc. Nursing) | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Constitutional reservation category | | | | | | | | | | | |
| Speciality | SC | ST | VJ - A | NT - B | NT - C | NT - D | OBC | SEBC | EWS | OPEN | 15% Inst | Total |
| Obstetrics and Gynaecological Nursing | - | 01 | - | - | - | - | - | 01 | 01 | 02 | 00 | **05** |
| Medical Surgical Nursing | 01 | - | - | - | - | - | 01 | 01 | 01 | 04 | 02 | **10** |

**SCHEDULE CAP-1**

| | |
|---|---|
| Last Date of submission of Application form | 08/09/2026 To 22/09/2026 |
| Publication of Provisional Selection List/Merit List/ Rejected List (Speciality Wise) | 26/09/2026 |
| Cut off Date Admission | 30/09/2026 |

**Note :** 1) Working hrs. 9 am to 5 pm. Contact No. 9623216455
2) Selection of candidates purely on merit basis.
3) If no suitable candidate applied or available in respective category such vacant seat shall be given to another candidate as against category.
4) Visit our website for application form/ speciality wise preference-form/merit list / waiting list /reject list/selection list and also for other information.

Sd/- Principal
Vision College of Nursing
Yelgaon, Buldana


# गणेश महासंघाच्या अध्यक्षपदी राजू बोंबले



**पैठण :-** लोकप्रिय आमदार विलास बापू भुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेना भाजपा सार्वजनिक गणेश महासंघाचे संस्थापक अध्यक्ष योगराज बुंदिले माजी अध्यक्ष राजू गायकवाड पदम खंदारे विलास महाराज मोरे यांच्या उपस्थितीत महासंघ कार्यकारी निवडीची बैठक पार पडली. यात राजूभाऊ बोंबले समितीचे अध्यक्षपदी निवड झाले असून उपाध्यक्षपदी कुणाल पिंपळे स्वागत अध्यक्ष पदी सुनील काकडे यांची बिनविरोध निवड झाली आहे.


**कार्यालय हिमायतनगर नगरपंचायत, हिमायतनगर जि. नांदेड**

**जाहिर सुचना**

**एकल महिलांचे सर्वेक्षण**

हिमायतनगर नगरपंचायत हद्दीतील सर्व संबंधित नागरिकांना याद्वारे कळविण्यात येते की, नगर पंचायत हद्दीतील एकल असलेल्या (विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता व अविवाहित) महिलांचा दिनांक २५/०९/२०२६ पर्यंत सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

सर्वेक्षण अर्ज भरून घेण्यासाठी हिमायतनगर नगरपंचायत कार्यालय येथे DJAYS विभागात मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी नगर पंचायत कार्यालयात संपर्क साधावा.

तरी हिमायतनगर नगरपंचायत हद्दीतील सर्व पात्र महिलांनी आपले अर्ज विहित मुदतीत हिमायतनगर नगरपंचायत कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत जमा करावे. असे आवाहन करण्यात येत आहे.

समाधान मासाळ
मुख्याधिकारी
हिमायतनगर नगरपंचायत



**जाहीर प्रगटन**

**मा. दिवाणी न्यायाधिश, कनिष्ठ स्तर गंगापुर यांचे न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज नं. 562/2026

अर्जदार :-1) जयदीप विष्णु पवार 2) वैभव विष्णु पवार 3) संगिता विष्णु पवार, सर्व रा.डोणगाव, ता. गंगापुर जि.छ. संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट 1827 चे कलम 2 प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज

या व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त अर्जदार यांनी त्यांचे विधीज्ञ ॲड.एस.पी. लबडे, गंगापुर यांचे मार्फत Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत या न्यायालयाकडे अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन विष्णु कारभारी पवार हे मुळचे मौजे डोणगाव, ता. गंगापुर येथील रहिवाशी होते. विष्णु कारभारी पवार यांचा मृत्यु दि. 28/01/2026 रोजी जे.जे. प्लस हॉस्पीटल प्रा.लि. औरंगाबाद येथे वैद्यकीय विलाजादरम्यान झाला आहे. मयत विष्णु कारभारी पवार यांची आई काशाबाई कारभारी पवार यांचा सालसन 1998 मध्ये मौजे डोणगाव, ता.गंगापुर येथे मृत्यु झाला असुन मयत विष्णु कारभारी पवार यांचे वडील नामे कारभारी रघुनाथ पवार यांचा दि.12/12/2025 रोजी मौजे डोणगाव, ता. गंगापुर येथे मृत्यु झाला आहे. मयत विष्णु कारभारी पवार आणि अर्जदार नं. 3 हे आपसात पती पत्नी होते व त्यांचे वैवाहिक संबंधातुन अर्जदार नं. 1 व 2 यांचा जन्म झाला आहे. मयत विष्णु कारभारी पवार यांना अर्जदार एकमेव कायदेशीर वारस असुन त्यांचे शिवाय इतर कोणीही कायदेशीर वारस मयतास नाही.

मयत विष्णु कारभारी पवार हे हयात असताना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धामोरी खुर्द, केंद्र डोणगाव येथे शिक्षक म्हणुन नोकरीस कार्यरत होते व नोकरीवर असताना त्यांचा मृत्यु झाला आहे. अर्जदारांना मयत विष्णु कारभारी पवार यांचे वारस प्रमाणपत्र मयत विष्णु कारभारी पवार यांचे जागी अनुकंपा तत्वावर नोकरी मिळण्यासाठी व तसेच शासकीय, निमशासकीय, न्यायालयीन व कार्यालयीन कामासाठी पाहिजे असल्याने, अर्जदारांनी Bombay Regulation Act VIII 1827 अन्वये वारस प्रमाणपत्र त्यांचे हक्कात देणे बाबत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस या व्दारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास संबंधितांनी त्यांचा आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन 30 दिवसांच्या आत नोंदवावा, मुदतीनंतरचा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करण्यात येईल. करीता हे जाहीर प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक 01/09/2026 रोजी दिले.

कनिष्ठ लिपिक | सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर, गंगापुर

## अग्रलेख

# आशेचा किरण

निबिड अंधारात दूर जंगलात कुठेतरी दिवा लुकलुकावा आणि प्रकाशाचा आशादायी किरण दृष्टिपथास पडावा, अशी थोडीशी सकारात्मक स्थिती सध्याच्या संघर्षांच्या धामधुमीत निर्माण झाली आहे. गेली पावणे पाच वर्षे लष्करीदृष्ट्या बलाढ्य असलेल्या रशिया आणि युक्रेन हा तुलनेने कमजोर देश यांच्यात युद्ध सुरू आहे. कोरोनासारख्या महामारीतून जग सावरत नाही तोच रशिया-युक्रेन यांच्यातील रक्तरंजित संघर्षाला प्रारंभ झाला. महामारीच्या काळात अनेक देशांच्या अर्थव्यवस्था बिकट परिस्थितीतून जात असताना जगाला आणखी एका दीर्घ संघर्षाचा सामना करावा लागत आहे. दोन्ही देशांची कधीही भरून न निघणारी मनुष्यहानी झाली असून, आता अमेरिकेच्या हस्तक्षेपाने हा संघर्ष संपुष्टात येण्याची आशा निर्माण झाली आहे. अमेरिकेचे राजदूत जारेड कुश्नेर आणि स्टीव्ह विटकाफ मॉस्कोत दाखल झाल्यानंतर पुतिन यांनी ७२ तासांची युद्धबंदी जाहीर केली आहे. दोनच दिवसांपूर्वी युक्रेनने ड्रोन हल्ल्यांची मालिका सुरू करण्याची धमकी दिल्यानंतर रशियात प्रचंड खळबळ उडाली होती. अनेक विमानांची उड्डाणे रद्द केली गेली तर काही विमाने अर्ध्यातून परत बोलावली गेली. युक्रेनच्या या धमकीचा परिणाम म्हणजे रशिया चर्चेच्या टेबलावर येण्यास तयार झाला. अमेरिकेच्या राजदूतांची पुतिन यांच्याशी काय चर्चा झाली याचा तपशील बाहेर आला नसला तरी तीन दिवसांच्या युद्धबंदीनंतर युद्ध संपुष्टात येऊन शांतता निर्माण होण्याची आशा निर्माण झाली आहे. खुद्द डोनाल्ड ट्रम्प यांनी पुढाकार घेऊन संघर्ष थांबविण्यासाठी शांतता कराराचा मसुदा घेऊन दोन्ही राजदूतांना मॉस्कोकडे रवाना केले. कराराच्या तपशिलाबाबत मात्र, ट्रम्प यांनी माहिती दिली नाही. करारात काय दडले आहे, हे पुढील आठवड्यात जगाला दिसून येईल, असे त्यांनी त्यांच्या स्वभावाप्रमाणे 'अनिश्चित' स्वरूपाचे उत्तर दिले. या युद्धाचा फटका युक्रेन आणि रशियाला तर बसलाच; शिवाय अमेरिकेचेही या आगीत हात पोळले गेले आहेत. कारण, ट्रम्प यांना युक्रेन आणि इराण, अशा दोन आघाड्यांवर लढावे लागत आहे. खरे, तर युक्रेनला नाटो संघटनेत आणण्याच्या अमेरिकेच्या हट्टामुळेच हे युद्ध सुरू झाले. युक्रेनने तटस्थ राहावे आणि आमच्या उशासी शत्रू उभा नको, अशी भूमिका पुतिन यांनी घेतली होती. मात्र, काहीही झाले तरी नाटोत जाणारच, असा हट्ट धरून झेलेन्स्की यांनी देशाचा विनाश ओढवून घेतला. मॉस्कोनंतर अमेरिकेचे दोन्ही दूत युक्रेनमध्ये असून ते झेलेन्स्की यांच्या गळी शांततेचे महत्त्व उतरविण्याचा प्रयत्न करणार आहेत. पुतिन यांच्यानंतर झेलेन्स्की यांनीही युद्धविरामाचे पालन करणार असल्याचे जाहीर केले आहे. २०२२ पासून सुरू झालेल्या या युद्धात दोन्ही देशांचे प्रचंड मानवी आणि आर्थिक नुकसान झाले आहे. युक्रेनचे तर पार कंबरडे मोडले असून, रशियाची आर्थिक घडी पूर्णपणे विस्कटली. खनिजसंपन्न असलेल्या रशियावर भारताकडून पेट्रोल, डिझेल विकत घेण्याची वेळ आली आहे. कारण, युक्रेनच्या पायाभूत सुविधांची जेवढी हानी झाली नसेल, त्यापेक्षा कितीतरी पटीने रशियाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्पांचे नुकसान झाले. खोलवर शिरून ड्रोनद्वारे रशियाच्या प्रकल्पांचे युक्रेनने अतोनात नुकसान केल्याने तेल आयात करण्याची वेळ पुतिन यांच्यावर ओढवली आहे. या दोन्ही देशांतील संघर्षाचे परिणाम केवळ युरोपपुरते मर्यादित राहिलेले नाहीत तर जागतिक अर्थव्यवस्थेवरही झाले आहेत. युद्धानंतर युक्रेनमधील कृषी उत्पादनही कमालीचे घटले आहे. गहू, मका आणि सूर्यफुलाचा उत्पादक देश असलेल्या युक्रेनची कृषी अर्थव्यवस्था ढेपाळली आहे. त्याची झळ भारतालाही बसली आहे. युद्ध सुरू झाल्यापासून सूर्यफूल तेलाची आयात कमी झाल्याने खाद्यतेलाचे चढलेले भाव अजूनही उतरलेले नाहीत. युरोपियन देश गव्हाची आयात युक्रेनमधून करीत होते. युद्धामुळे पुरवठा साखळी विस्कळीत झाल्याने महागाई वाढली.

विकास आणि वैभवाप्रत जाण्यासाठी शांततेची गरज असते, हे आता अमेरिका आणि रशियाला कळून चुकले आहे. शीतयुद्धाच्या काळात जग रशिया आणि अमेरिका या दोन देशांच्या पारड्यात जाऊन बसले असताना भारताने शांततेचा मार्ग स्वीकारत तटस्थतेचे धोरण स्वीकारले; ज्याचे फायदे आज आपल्याला दिसत आहेत. अमेरिका, चीनसारख्या महाशक्तींसह युरोपातील अनेक विकसित देशांच्या अर्थव्यवस्था गटांगळ्या खात असताना भारताचा विकासदर ७.८ असल्याची आकडेवारी नुकतीच बाहेर आली आहे. हे केवळ शांतता आणि संयमाच्या धोरणामुळेच शक्य झाले आहे. आताची वेळ ही संघर्ष करण्याची नव्हे तर संघर्षस्थळे (फ्लॅशपाईंट) नष्ट करण्याची आहे. आजमितीला जगात काश्मीर, गाझा, तैवान ही धगधगती ज्वालास्थळे आहेत. गाझाचा मुद्दा इस्त्रायलने आपल्या पद्धतीने निकाली काढला असला तरी त्याच्याशी 'मुस्लिम उम्माह' भावना जुळलेल्या असल्याने तो कायमचा धगधगत राहणार आहे. आशियातील सर्वांत धोकादायक संघर्षस्थळ म्हणजे काश्मीर होय. भारत आणि पाकिस्तान यांच्यात या मुद्यावरून तीन मोठी युद्धे आणि कारगिल, 'ऑपरेशन सिंदूर'सारख्या लढायाही झाल्या आहेत. मोदी सरकार आल्यापासून पाकिस्तानला काश्मीरच्या मुद्यावर आक्रमक नव्हे तर बचावात्मक पवित्रा घ्यावा लागत आहे. पूर्वी जम्मू-काश्मीरमध्ये बेधडक कारवाया करीत हल्ले करणाऱ्या पाकिस्तानला आता हजारदा विचार करावा लागत आहे.

चीनच्या पायथ्याशी असलेला तैवानचा मुद्दाही तसाच. चीनची गिधाड नजर या देशावर आहे. तथापि, अमेरिकेचे लष्करी सहकार्य आणि स्वतःची अत्याधुनिक संरक्षण यंत्रणा, यामुळे चीन तैवानवर हल्ला करण्याचे धाडस करणार नाही. जगात सध्या सुरू असलेल्या संघर्षात सतत युद्धाची खुमखुमी बाळगणारे दोन पहेलवान मात्र गार झाले आहेत. जी अमेरिका जगाला आर्थिक आणि लष्करी बळावर धाकात ठेवण्याचा प्रयत्न करीत होती, तिला इराणने घायकुतीला आणले. चार-पाच दिवसांमध्ये इराणला शरण आणू, अशा वल्गना करणारे ट्रम्प यांचे डोळे पांढरे होण्याची वेळ आली आहे. इराण-अमेरिका संघर्ष सातव्या महिन्यांत पोहचला आहे. सध्या दोन्ही देश एकमेकांवर हल्ले करीतच आहेत. दोघांकडील शस्त्रांची भंडारे रिकामी होत असून गेल्या काही दिवसांपासून इराणचा प्रतिकार काही प्रमाणात थंडावला आहे. दुसरीकडे युक्रेन अतोनात नुकसान सहन करूनही मैदानात शड्डू ठोकून उभा आहे. अमेरिकेच्या गर्वाचे हरण केवळ रशियाच करू शकतो, असा जो समज होता, तो युक्रेनने मोडून काढला, असेच म्हणावे लागेल. मध्यपूर्व आणि युरोप-बाल्कन क्षेत्रात सुरू असलेले दोन्ही संघर्ष जेव्हा केव्हा संपुष्टात येतील, त्यानंतरच जगात दीर्घकाळ शांतता नांदण्याची शक्यता आहे. कारण, सध्या रशिया आणि अमेरिका उरलीसुरली इभ्रत वाचविण्यासाठीच धडपडत आहेत. दोन्ही देश संघर्षातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधत असले तरी तो त्यांना अजूनतरी सापडलेला नाही. संघर्ष संपल्यानंतर 'वर्ल्ड ऑर्डर' बदललेली असेल, एवढे मात्र निश्चित. कारण, युद्धामुळे रशिया-अमेरिकेची प्रचंड हानी झाली आहे. त्यातून बाहेर पडण्यासाठी अनेक वर्षे लागतील. या युद्धाचा सर्वाधिक फायदा झाला तो दगाबाज चीनला. त्याला अमेरिका-इराण युद्धाची फारशी झळ बसली नाही. 'बळी तो कानपिळी' या म्हणीप्रमाणे त्याने होर्मुझच्या खाडीतून कच्च्या तेलाचा पुरवठा अखंडित ठेवला. चिनी तेलवाहू जहाजांवर हल्ला करण्याची हिंमत अमेरिकेची झाली नाही. भारताला या मध्यपूर्वेतील युद्धाचा फटका बसला आहे. इंधनाचा पुरवठा काही विस्कळीत झाल्याने किमती वाढवाव्या लागल्या. त्यामुळे अमेरिकेने रशिया-युक्रेनमध्ये विशेष दूत पाठवून शांतता प्रस्थापित करण्याच्या दिशेने जे पाऊल टाकले त्याचे स्वागत करायला हवे. अत्यंत भीषण स्थितीत आशेचा किरण दिसला आहे, एवढाच सध्याचा दिलासा. ■

## दिल्ली दिनांक

**रवींद्र दाणी**

# चर्चा एका अप्रकाशित पुस्तकाची

ऑस्कर वाईल्ड या प्रसिद्ध साहित्यिकाने म्हटले आहे, ''आपल्या स्मृती म्हणजे आपली डायरी, जी सतत आपण आपल्याजवळ बाळगतो''. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी आपल्या स्मृतींची डायरी लिहून काढली असून, ती 'बिलाँगिंग : ए जर्नी ऑफ लव्ह' या नावाने पुस्तकाच्या रूपात प्रसिद्ध होणार आहे. मात्र पुस्तकाच्या प्रकाशनापूर्वीच त्यात आलेल्या अडचणींनी या पुस्तकाची उलटसुलट चर्चा सुरू झाली आहे.

प्रारंभी, सोनिया गांधी यांच्या आठवणीचे संकलन असणारे हे पुस्तक पेंग्विन रॅंडम हाऊस इंडिया या प्रकाशन संस्थेतर्फे प्रसिद्ध होणार होते, पण संस्थेने त्यास नकार दिल्यानंतर पेंग्विन इंटरनॅशनलतर्फे ते प्रसिद्ध होऊ घातले आहे. पेंग्विन इंडियाने पुस्तक प्रकाशनास नकार दिल्यानंतर या पुस्तकात आहे तरी काय याची जोरदार चर्चा राजधानीत केली जात आहे.

**काही भागावर आक्षेप :** सोनिया गांधी यांनी आपल्या पुस्तकाचा मसुदा सर्वप्रथम पेंग्विन रॅंडम हाऊसकडे पाठविला. प्रथम या प्रकाशकाने सोनिया गांधींचे पुस्तक प्रकाशित करण्यास होकार दिला होता. नंतर मात्र प्रकाशकाला पुस्तकातील काही भाग अडचणीचा वाटू लागला. त्याने सोनिया गांधींसोबत सविस्तर चर्चा केली व काही भाग वगळण्याची विनंती केली. सोनिया गांधी त्यास तयार नव्हत्या असे समजते. प्रकाशक व सोनिया गांधी यांच्यात तीन-चार भेटी झाल्याचे समजते.

पुस्तकातील कोणताही भाग गाळला - वगळला जाणार नाही हे सोनिया गांधी यांनी स्पष्ट केल्यानंतर प्रकाशकाने पुस्तक प्रकाशित करण्यास आपली असमर्थतता त्यांना कळविली. यानंतर आता दुसऱ्या एका प्रकाशकाकडे म्हणजे पेंग्विन इंटरनॅशनलकडे हे काम सोपविण्यात आले असून, सध्याच्या वेळापत्रकानुसार १० नोव्हेंबर रोजी हे पुस्तक प्रकाशित केले जाणार आहे.

**कोणता भाग ? :** पेंग्विन इंडियाला नेमक्या कोणत्या भागावर आक्षेप होता हे मात्र समजू शकलेले नाही. याबाबतीत काही तर्क-वितर्क केले जात आहेत. पंतप्रधान मोदींबाबत सोनिया गांधींचे निरीक्षण, भारत-चीन सीमा प्रश्न हाताळताना सरकारची भूमिका हे काही वादाचे मुद्दे असल्याचे सांगितले जाते. पण, बहुतेक निरीक्षकांच्या मते हे मुद्दे तसे किरकोळ आहेत. मग, नेमक्या कोणत्या कारणांसाठी पेंग्विनने पुस्तक प्रकाशित करण्यास नकार दिला? कोणत्या बाबी पुस्तकातून वगळण्याचा सल्ला पेंग्विनने दिला होता व सोनिया गांधींनी तो का मानला नाही याबाबत उलटसुलट चर्चा केली जात आहे.

**२००४ ते २०१४ :** २००४ ते २०१४ या दहा वर्षांत काँग्रेस पक्ष केंद्रात सत्तेत होता. डॉ. मनमोहनसिंग पंतप्रधान असले तरी खरी सत्ता सोनिया गांधी व त्यांचे सल्लागार अहमद पटेल यांच्याच हाती होती. यातील एक योगायोग म्हणजे अहमद पटेल हे गुजरातचे होते. २००४ ते २०१४ या १० वर्षांत देशात बऱ्याच राजकीय घडामोडी घडल्या. त्या सर्वांची कल्पना सोनिया गांधी यांना होती. काही महत्त्वाचे दस्तावेज त्यांच्याजवळ होते. त्याचा वापर त्यांनी पुस्तकात केला आहे काय, असा प्रश्न विचारला जात आहे. केला असल्यास कोणत्या विषयांबाबत ते दस्तावेज आहेत याचीही चर्चा केली जात आहे. पेंग्विनने पुस्तक प्रसिद्ध करण्यास नकार दिला याचा अर्थ कोणते तरी गंभीर विषय असावेत जे प्रसिद्ध करणे पेंग्विनला शक्य नव्हते. अन्यथा एवढे महत्त्वाचे पुस्तक प्रकाशित करण्यास पेंग्विनसारख्या नामांकित प्रकाशक संस्थेने नकार दिला नसता.

**१९९८ ते २००४ :** १९९८ ते २००४ या काळात केंद्रात अटलबिहारी वाजपेयी यांचे सरकार होते. सोनिया गांधी काही व्यक्तिगत कामांसाठी वाजपेयींना भेटल्या होत्या, त्यावेळी वाजपेयींनी त्यांना त्याबाबत निश्चिंत राहण्यास सांगितले होते. सोनिया गांधींच्या उपस्थितीतच त्यांनी आपले मुख्य सचिव ब्रिजेश मिश्रा यांना बोलावून सोनिया गांधींच्या समस्यांकडे स्वतः लक्ष घालण्याचा आदेश मिश्रा यांना दिला होता. मिश्रा यांनी स्वाभाविकच अटलबिहारी वाजपेयींच्या आदेशाचे पालन केले. नंतर काही वर्षांनी जेव्हा ब्रिजेश मिश्रा यांचे निधन झाले, त्यांच्या अन्त्यसंस्कारात सोनिया गांधी स्वतः सामील झाल्या होत्या. यावरून सोनिया गांधी व ब्रिजेश मिश्रा यांच्यात किती जवळीक व विश्वास होता याचा अंदाज बांधला जातो. सोनिया गांधींनी आपल्या पुस्तकात या साऱ्याचा उल्लेख केला आहे काय, असाही प्रश्न विचारला जातो.

**तणावाचे प्रसंग :** वाजपेयींचे सरकार असताना सरकार व विरोधी पक्ष यांच्यात तणावाचे काही प्रसंग निर्माण झाले होते. याचा परिणाम म्हणजे संसदेचे कामकाज प्रभावित होत होते. हा तणाव दूर करण्यासाठी सरकारच्यावतीने काही 'दूत' १०- जनपथला पाठविण्यात आले. त्यांनी सोनिया गांधींशी चर्चा केली आणि नंतर हा तणाव निवळण्यात मदत झाली होती. म्हणजे १९९८ ते २००४ हा वाजपेयी सरकारचा कालखंड, नंतर २००४ ते २०१४ हा मनमोहनसिंह सरकारचा कालावधी व २०१४ पासून मोदी सरकार या तीन कालखंडाची चर्चा सोनिया गांधींनी आपल्या पुस्तकात केलेली असू शकते. मात्र यातील कोणता भाग पेंग्विनला खटकला हे मात्र समोर आलेले नाही. त्यासाठी पुस्तक प्रकाशित होण्याचीच प्रतीक्षा करावी लागेल.

**बोफोर्स प्रकरण :** एकेकाळी गाजलेल्या बोफोर्स दलाली प्रकरणात क्वाट्रोकी या इटालियन व्यापाऱ्याचे नाव बरेच गाजले होते. या व्यापाऱ्याचे सोनिया गांधींशी घरगुती संबंध असल्याचे मानले जात होते. बोफोर्स प्रकरणामुळे १९८९ च्या निवडणुकीत काँग्रेसला सत्ता गमवावी लागली. तेव्हाचे संरक्षण मंत्री व्ही. पी. सिंग यांनी सरकारमधून व काँग्रेसमधून राजीनामा दिला हे तर जगजाहीर आहे. मात्र, संरक्षण राज्यमंत्री व राजीव गांधींचे जिवलग मित्र अरुण सिंग यांनी का राजीनामा दिला व नंतर ते का विजनवासात गेले याचे गूढ आजही कायम आहे. स्वतः अरुण सिंग यांनी याबाबत कोणतीही टिप्पणी केलेली नाही. त्याचप्रमाणे बोफोर्स प्रकरण उघड करण्यात स्व. अरुण नेहरू या मंत्र्यांची भूमिका होती असेही मानले जाते. या साऱ्यावर सोनिया गांधींनी काही प्रकाश टाकला आहे काय याची चर्चा केली जात आहे.

**आणखी एक पुस्तक :** राजधानीत आणखी एका पुस्तकाची चर्चा केली जात आहे. दिवंगत काँग्रेस नेते व कधीकाळी गांधी परिवाराचे विश्वासू सल्लागार कुंवर नटवरसिंग यांनी लिहिलेले हे पुस्तक आहे. या पुस्तकात त्यांनी मनमोहनसिंग यांची पंतप्रधानपदी कशी निवड झाली याचा उल्लेख केला आहे. एका बैठकीत स्वतः नटवरसिंग यांच्या व्यतिरिक्त सोनिया गांधी, मनमोहनसिंग व राहुल गांधी हे चारच लोक उपस्थित होते. सोनिया गांधी पंतप्रधान होण्यास तयार होत्या, पण राहुल गांधी त्यास तयार नव्हते अशी माहिती पुस्तकात देण्यात आली आली आहे.

**डॉ. कलाम यांचा विरोध ? :** तत्कालीन राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांच्या विरोधामुळे सोनिया गांधी पंतप्रधान होऊ शकल्या नाहीत असाही दावा अधूनमधून केला जातो. सोनिया गांधी पंतप्रधान न होण्याचे नेमके कारण कोणते? डॉ. कलाम यांचा विरोध की राहुल गांधींचा नकार? सोनिया गांधी यांनी आपल्या पुस्तकात यावर चर्चा केली असावी असा एक तर्क दिला जात आहे.

**१० नोव्हेंबरचा मुहूर्त ? :** पुस्तक प्रकाशनासाठी १० नोव्हेंबर ही तारीख ठरविण्यात आली आहे. वास्तविक हा सोनिया गांधी, राजीव गांधी यांच्यासाठी तसा खास दिवस नाही. मग, १० नोव्हेंबरची तारीख का ठरविण्यात आली आहे? नोव्हेंबर महिन्यात संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू होते. या पुस्तकात काही वादाचे मुद्दे असल्यास त्याचे पडसाद अधिवेशनात उमटणार हे ठरले आहे. ■

## कानोसा

**अमोल पुसदकर**

# कृष्णं वंदे जगद्गुरुम्

अर्जुनाचे नव्हे, तर केवळ संपूर्ण विश्वाचे मार्गदर्शक असलेल्या भगवान श्रीकृष्णांना सादर नमन, अभिवादन! ज्या ज्या वेळेला जन्माष्टमी येते, त्या त्या वेळेला संपूर्ण देश युगपुरुषाचा जन्मोत्सव साजरा करण्यासाठी अतिशय उत्साहित असतो; आणि त्याचे कारण सुद्धा स्वाभाविक आहे. भगवान श्रीकृष्ण हे सर्व समाजजीवनाचे आदर्श आहेत. आज व्यक्तीच्या जीवनामध्ये अनेक संकटे, हालअपेष्टा, अपमान असे प्रसंग आपल्याला दिसतात. काही लोक त्या प्रसंगाने खचून जातात, काही लोक आत्महत्येसारखा अतिशय निकृष्ट मार्ग सुद्धा स्वीकारतात. परंतु भगवान श्रीकृष्णाचे जीवन जर अशा लोकांनी बघितले, तर त्यांना असे लक्षात येईल की, भगवान श्रीकृष्णाच्या जीवनामध्ये सुद्धा त्यांना आपल्या आई-वडिलांसोबत सुद्धा राहता आले नाही. एका सामान्य बालकाचा आपल्या आईच्या कुशीत निजण्याचा, दूध पिण्याचा जो अधिकार आहे, तो सुद्धा त्यांना मिळाला नाही. लहानपणापासूनच त्यांनी कोणाचे काहीही वाईट केलेले नसताना सुद्धा त्यांना सातत्याने आपल्या जीवाचे रक्षण करण्यासाठी संकटांचा सामना करावा लागला. परंतु हे सर्व घडत असताना त्यांची चाणाक्ष वृत्ती कायम होती. अगदी बालपणी सुद्धा प्रेमाच्या गोष्टी करणाऱ्या आणि त्यांना ममतेने दूध पाजायला आलेल्या पूतनेला सुद्धा त्यांनी ठार मारले. यावरून आपल्या असे लक्षात येते की, भगवान श्रीकृष्ण हे कपट-कारस्थान यांना लगेच ओळखणारे होते. पूतनेच्या खोट्या प्रेमाला ते बळी पडले नाहीत; या उलट, खोटं प्रेम प्रदर्शित करणाऱ्या पूतनेचा अंत त्यांनीच केला. कर्तव्य मार्गावर चालण्यासाठी त्यांनी गोप-गोपिकांचे प्रेमाचे पाश सुद्धा अलगद तोडून टाकले.

आपल्या शक्तीच्या जोरावर जनतेला भयभीत करणारा कालिया नाग यमुनेमध्ये राहत होता. त्या कालिया नागाचे सुद्धा मर्दन हे भगवान श्रीकृष्णांनी केलेले होते. आज समाजामध्ये सुद्धा असे अनेक कालिया आहेत, की जे आपल्या शक्ती, पैसा, सत्ता याच्या जोरावर जनतेला भयभीत करण्याचे काम करीत असतात. परंतु कालियाचे मर्दन हे समाजपुरुषाने करायला पाहिजे, हीच कृष्णनीती आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुद्धा कृष्णनीती त्यांच्या जीवनामध्ये अंगीकारलेली होती. ज्या अफजल खानाने अनेक हिंदू राजांना बंदी बनवले होते, अनेकांना ठार मारले होते, तो अफजल खान पुन्हा एकदा ज्या वेळेला छत्रपती शिवाजी महाराजांना भेटीच्या बहाण्याने बोलावून ठार मारण्याचा विचार करीत होता; तो स्वतःला मोठा शिकारी समजत होता, परंतु प्रतापगडाच्या पायथ्याशी त्याची शिकार झाली. प्रतापगडाच्या पायथ्याशी याची साक्ष आजही उपस्थित आहे.

भगवान श्रीकृष्णांनी त्यांच्या जीवनामध्ये अनेकांना मार्गदर्शन केलेले आहे. आज अनेक विद्यार्थी हे समाजमाध्यमांच्या म्हणजे इन्स्टाग्राम, फेसबुक आणि रील्स याच्यामध्ये अडकलेले दिसून येतात. आज विद्यार्थ्यांच्या जीवनामध्ये अभ्यास आणि करीअर यापेक्षाही मोठे अनेक मोहपाश दिसून येतात. त्या मोहपाशांनी बद्ध झालेला विद्यार्थी अनेक वेळा आपला मार्ग विसरतो. अशा ध्येयहीन युवकांना मार्गदर्शन करण्याचे काम कृष्णनीती आणि भगवान श्रीकृष्ण करू शकतात.

मोहग्रस्त झालेल्या अर्जुनाला सुद्धा त्यांनी गीतेचे अमृत दिलेले आहे. आज वळणावळणावर अनेक अर्जुन उभे आहेत, त्यांना मार्गदर्शनाची आवश्यकता आहे. भगवान श्रीकृष्णांचे जीवन, त्यांनी दिलेला संदेश हा विद्यार्थ्यांना आजही मार्गदर्शक आहे. भगवान श्रीकृष्ण हे उत्तम शिक्षक होते; त्यांनी धर्म-अधर्माचे शिक्षण दिले, कर्तव्याचे शिक्षण दिले आणि म्हणूनच अर्जुन महाभारतात चांगला पराक्रम गाजवू शकला. म्हणजे केवळ ज्ञान असणे हेच पुरेसे नाही, तर त्या ज्ञानाचा योग्य उपयोग योग्य वेळेस करणे हे सुद्धा फार महत्त्वाचे आहे.

आता नुकताच शिक्षक दिवस सुद्धा साजरा करण्यात आलेला आहे. शिक्षकांनी सुद्धा भगवान श्रीकृष्णांच्या जीवनापासून प्रेरणा आणि संदेश घेण्याची आवश्यकता आहे. आपल्या जीवनाचे ध्येय काय असले पाहिजे? आपल्या जीवनाची सार्थकता कशाकरिता आहे? याचाही प्रत्येक शिक्षकाने विचार करणे आवश्यक आहे. शिक्षक हा जर केवळ पोटार्थी असला, तर त्याच्या जीवनाचे सार्थक होणार नाही. कारण ईश्वराच्या कृपेमुळे त्यांना असे काम मिळालेले आहे, की त्या कामातून उत्तम विद्यार्थी घडू शकतात आणि उत्तम विद्यार्थी देशाचे भविष्य घडवू शकतात. म्हणून शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या भविष्याकडे लक्ष देऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्याची आवश्यकता आहे. शिक्षक दिवस हा ज्यांनी आमच्या जीवनामध्ये कुठल्या ना कुठल्या प्रकारे शिक्षा, दीक्षा, ज्ञान दिलेले आहे, अशा सर्व शिक्षकांचा स्मरण करण्याचा दिवस आहे. हे स्मरण या निमित्ताने सर्व विद्यार्थी करतात. ज्या वेळेला डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना विचारले गेले की, तुम्हाला 'मिसाईल मॅन' म्हणून लक्षात ठेवलेले आवडेल की शिक्षक म्हणून? तर त्या वेळेला त्यांनी सांगितले की, मला शिक्षक म्हणून लक्षात ठेवलेले आवडेल. भारतात निर्माण झालेल्या अनेक महापुरुषांनी विद्यादानाचे पवित्र कार्य केलेले होते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन ज्यांनी सुद्धा इतर सर्वच त्यांच्या जबाबदारीपेक्षा शिक्षक या जबाबदारीला श्रेष्ठ स्थान दिलेले आहे.

आज देशाला चांगल्या हुशार विद्यार्थ्यांची आवश्यकता आहे, पण त्याहीपेक्षा देशभक्त हुशार विद्यार्थ्यांची आवश्यकता अधिक आहे. शिक्षकांनी आपल्या ज्ञानदानाच्या कामामध्ये विद्यार्थ्यांना सामाजिक आणि राष्ट्रीय दृष्टिकोन देणे आवश्यक आहे. केवळ पुस्तकी ज्ञान घेतलेले विद्यार्थी हे त्यांच्या व्यक्तिगत जीवनामध्ये सुद्धा फारसे यशस्वी होऊ शकणार नाही; परंतु कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांचा विचार करणारा विद्यार्थी हा अधिक प्रगल्भ आणि समंजस बनेल. शिक्षकांनी देशासाठी कार्य करू शकणारे विद्यार्थी बनविणे हेच त्यांचे जीवितकार्य असायला हवे. भगवान श्रीकृष्णांकडून कर्ममार्गाचा, जीवनाला सार्थकता देण्याचा हा संदेश सर्वांनीच ग्रहण करणे आवश्यक आहे. ■

९५५२५३५८१३

(लेखक प्रसिद्ध वक्ते, सामाजिक व राजकीय विचारक आहेत.)

## वेध

**सोनाली पवन ठेंगडी**

# 'जेन-झी'चा देवधर्म

सणांच्या भाऊगर्दीत नेहमीच तरुणवर्ग उत्साहाने सहभागी होत राहिला आहे. घरगुती सण असो किंवा सार्वजनिक, तरुणाचा उल्हास काही वेगळाच असतो. किंबहुना त्यांच्या भरवशावरच घरीदारी सणावारांची मदार असते. अजूनही चित्र फारसे बदललेले नाही, पण नवी पिढी मात्र जरा वेगळी आहे. विशीत असणारे तरुण-तरुणी आपल्याच विश्वात रमलेले असतात. फोन आणि टॅबमध्ये गुंतलेली ही पिढी घरात आणि बाहेरही सणांच्या जल्लोषात झोकून देत सहभागी होत नाही. असे असले तरी त्यांचा देवावर विश्वास नाही, हे म्हणताच येणार नाही. नवीन पिढीने आपले श्रद्धास्थान ठरवले आहे. फक्त त्यांची भक्तीची पद्धत वेगळी आहे. ते जास्तीत जास्त वेळ ऑनलाईन असतात. त्यामुळे त्यांच्या भक्तीची वाट ते समाज माध्यमांद्वारे ठरवतात आणि त्याद्वारेच त्यांची भक्ती चालते. एका सर्वेक्षणानुसार, ६८ टक्के तरुणांचे म्हणणे आहे की, त्यांचा विश्वास, धर्म किंवा आध्यात्मिक प्रवास त्यांना पटणाऱ्या गोष्टींशी निगडित असतो. त्यांना जे दैवत पटेल त्याचीच ते आराधना करतात. ज्यांना आपण अधार्मिक म्हणू अशा युवावर्गातील एक तृतीयांश मुले-मुली कोणत्या तरी सुपर पॉवरवर विश्वास ठेवतात. प्रत्येक चारपैकी एका जेन-अल्फाचे म्हणणे आहे की, ऑनलाईन शिकलेल्या गोष्टींमुळे किंवा ऑनलाईन भेटलेल्या लोकांमुळे त्यांची श्रद्धा बदलली आहे. समोरासमोरच्या संवादापेक्षा ऑनलाईन विश्वास किंवा आध्यात्मिक विषयांबद्दल अधिक शिकतात. आजची तरुणाई करीअर, शिक्षण, नातेसंबंध आणि भविष्याच्या चिंतांमध्ये सतत धावत असते. अशा वेळी काही क्षण स्वतःसाठी देणे, शांत बसणे, ध्यान करणे किंवा आवडते संगीत ऐकत मन एकाग्र करणे, यामधून त्यांना मानसिक समाधान मिळतं. अनेक तरुण योग, मेडिटेशन, माईंडफुलनेस आणि निसर्गाच्या सान्निध्याकडे आकर्षित होत आहेत. त्यांच्यासाठी अध्यात्म म्हणजे जगापासून दूर जाणे नव्हे, तर गोंधळलेल्या जगात स्वतःचा समतोल शोधणे आहे.

घरात होत असलेले सोहळे आणि सोवळे कदाचित त्यांना आवडत नाहीत, पण त्यांचा देवाला अजिबात विरोध नाही. जिथे त्यांची श्रद्धा असेल तिथे ते आवर्जून झुकतात आणि एकदा झुकले की ते कायम त्या दैवताची आराधना करतात. मात्र, संघर्ष तेव्हा होतो जेव्हा ते घरातील कुळाचारावर प्रश्न उपस्थित करतात किंवा त्यांच्या दृष्टीने बरेच कर्मकांड हे अवाजवी असतात. त्यांच्या 'प्रॅक्टिकल ॲप्रोच'मध्ये न बसणाऱ्या गोष्टी दिसल्या की त्यांना अविश्वास जाणवतो. तशा कोणत्याही गोष्टींना ते जुमानत नाही आणि मानतही नाहीत. घरच्यांना त्यांचे हे वागणे विक्षिप्त वाटत असल्याने संघर्षाची ठिणगी पडते. या ठिकाणी घरच्या मोठ्या मंडळींनी हे समजून घेतले पाहिजे की ही पिढी नेमकी कशी आहे. जेन-झी प्रश्न विचारणारी पिढी आहे. त्यामुळे कोणतीही गोष्ट केवळ परंपरा आहे म्हणून स्वीकारण्यापेक्षा 'यामागचा अर्थ काय?' हे जाणून घेण्याची त्यांची वृत्ती आहे. धर्म आणि अध्यात्म यांच्यातील फरकही त्यांना जाणवतो. श्रद्धा असावी, पण त्यासोबत विवेकही असावा, असा त्यांचा दृष्टिकोन आहे. त्यामुळे मंदिरात जाण्याबरोबरच ध्यानधारणा, सामाजिक कार्य, गरजू व्यक्तीला मदत करणे किंवा पर्यावरणाची काळजी घेणे यामध्येही त्यांना अध्यात्म जाणवते.

जेन-झी आणि जेन-अल्फा धार्मिक माहितीसाठी युट्युब, इन्स्टाग्राम, चॅटबॉट यांसारख्या साधनांवर सर्वाधिक अवलंबून आहेत. व्हिज्युअल ॲनिमेशन, थ्रीडी पौराणिक कथा आणि छोटे आध्यात्मिक उपदेश त्यांना आकर्षित करतात. तरुण आणि किशोर फक्त कथा ऐकत नाहीत, तर रोब्लॉक्ससारख्या आभासी प्लॅटफॉर्मवर डिजिटल पद्धतीने तयार केलेल्या मंदिरे आणि धार्मिक उत्सवांचा भाग बनत आहेत. ॲप-आधारित आरती, थेट मंदिर दर्शन आणि एआय चालीसा, मंत्र ॲप्सने देवाशी त्यांचे नाते सुलभ आणि वैयक्तिक बनवले आहे. मुळात, डिजिटल युगातील जेन-झी आणि जेन-अल्फा यांची श्रद्धा त्यांच्या आधीच्या पिढ्यांपेक्षा वेगळी आहे. ते प्रत्येक गोष्टीला स्वतःच्या कसोटीवर पारखून पाहतात आणि मगच विश्वास ठेवतात. या पिढ्यांसाठी श्रद्धा महत्त्वाची आहे, कारण त्यातून त्यांना शांती आणि आनंद मिळतो. आजच्या धावपळीच्या काळात बाहेरच्या जगाशी जोडलेले राहणे जितके आवश्यक आहे, तितकेच स्वतःशी जोडलेले राहणेही महत्त्वाचे आहे. हे जेन-झी हळूहळू ओळखत आहे. म्हणूनच त्यांच्या अध्यात्मात भीतीपेक्षा आशा, बंधनांपेक्षा स्वातंत्र्य आणि नकारात्मकतेपेक्षा सकारात्मकतेला अधिक महत्त्व आहे. तंत्रज्ञानाच्या युगात जगाशी कनेक्ट असलेली ही पिढी आता स्वतःच्या मनाशी 'कनेक्ट' होण्याचा प्रयत्न करत आहे. कदाचित हाच जेन-झीच्या अध्यात्माचा सर्वांत सुंदर पैलू आहे. ■

७७५५९३८८२२

## वाचक पत्रे

### पर्यावरणपूरक उत्सवाचा संकल्प करूया

आठवडाभरात आपल्या लाडक्या गणरायाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सव म्हटला की आनंद, उत्साह आणि भक्तीचे वातावरण निर्माण होते. घराघरांत बाप्पाच्या स्वागताची तयारी सुरू झाली आहे. बाजारपेठाही गणेशमूर्ती आणि सजावटीच्या साहित्याने सजल्या आहेत. पण या आनंदासोबत पर्यावरणाची जबाबदारीही आपलीच आहे. गणरायाची पूजा करताना निसर्गाची पूजा विसरता कामा नये. यंदा शक्य असेल तर शाडू मातीची मूर्ती घ्यावी. मूर्तीचा आकारही गरजेपुरताच ठेवावा. प्लॅस्टिक आणि थर्माकोलचा वापर शक्य तितका टाळावा. सजावटीसाठी कागद, कापड, बांबू आणि नैसर्गिक वस्तू वापराव्या. फुलांची सजावट केली तर नंतर ती फुले वेगळी जमा करावी. नदी, नाला किंवा तलावात टाकू नये. गणेश विसर्जनामुळे पाणी प्रदूषित होणार नाही, याची काळजी घेणे गरजेचे आहे. शक्य असल्यास घरच्या घरी किंवा कृत्रिम विसर्जनस्थळी विसर्जन करावे. गणेशोत्सवात ध्वनिप्रदूषणाचाही विचार करणे गरजेचे आहे. सार्वजनिक मंडळांनीही स्वच्छतेला प्राधान्य द्यावे. मंडप उभारताना रस्ते आणि वाहतुकीची अडचण होणार नाही याची काळजी घ्यावी. उत्सव संपल्यानंतर परिसरात कचरा राहता कामा नये. गणराया आपल्याला चांगले विचार करण्याची शिकवण देतो. म्हणून उत्सवातून समाजालाही चांगला संदेश मिळाला पाहिजे. प्रत्येक मंडळाने एक झाड लावण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रत्येक घराने प्लॅस्टिक कमी करण्याचा निर्णय घेतला तर? प्रत्येक नागरिकाने आपला परिसर स्वच्छ ठेवला तर? तर गणेशोत्सवाचा आनंद आणखी मोठा होईल. भव्य सजावट करण्यापेक्षा सुंदर विचारांची सजावट महत्त्वाची आहे. मोठा आवाज करण्यापेक्षा चांगला संदेश मोठा झाला पाहिजे. नदीत कचरा टाकण्यापेक्षा एखादे झाड जगवणे मोठे काम आहे. बाप्पाच्या स्वागताबरोबर निसर्गाचे रक्षण करण्याची शपथ घेऊया. कारण हीच धरती आपल्या पुढच्या पिढीलाही मिळणार आहे. म्हणून भक्तीही हवी आणि पर्यावरणाची काळजीही हवी. उत्सवही हवा आणि स्वच्छताही हवी. जलस्त्रोतही हवेत आणि निसर्गही हवा. यंदा गणरायाला एकच सुंदर भेट देऊया स्वच्छ आणि निरोगी पर्यावरण!

**सचिन नागरे**/९६०४३२१४३२

### 'तडजोड' एक सुवर्णमध्य...

'तडजोड' म्हणजे स्वतःला कमी लेखणे किंवा हार मानणे नव्हे, तर तो एक उच्च दर्जाचा समजूतदारपणा आहे. आजच्या धावपळीच्या आणि तंत्रज्ञानाच्या युगात हाच मध्यम मार्ग उपयुक्त ठरतो. तडजोड अशी असावी जिथे दुःखाचा तडा दोघांनाही जाता कामा नये आणि सुखाची जोड दोघांनाही मिळाली पाहिजे. कुठल्याही परिस्थितीत सुवर्णमध्य काढता येणे हाच तडजोडीचा आत्मा आहे, कारण यामुळे दोघांनाही समसमान फायदा होतो.

संसारात आणि समाजात सलोखा राखण्यासाठी परिस्थितीनुसार स्वतःमध्ये बदल करून जुळवून घेणे गरजेचे असते, तर व्यावहारिक दृष्टिकोनातून स्वतःचे नुकसान न करता परिस्थितीला अनुकूल बनवणे हे प्रगतीचे एक प्रभावी साधन ठरते. तडजोड करताना आपण नक्की काय गमावत आहोत आणि काय मिळवत आहोत याचा विचार केला पाहिजे. नात्यात किंवा करारात तात्पुरती माघार घेतल्याने भविष्यात मोठा फायदा होणार असेल, तर ती तडजोड नक्कीच व्यवहार्य ठरते. उत्कृष्ट तडजोड तीच, जिथे दोन्ही पक्षांना आपला विजय झाल्यासारखे वाटते आणि सामंजस्याने सुवर्णमध्य गाठला जातो.

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०

■■■

### जन्माष्टमी-एक धार्मिक आणि सामाजिक सण

श्रीकृष्ण जन्माष्टमी म्हणजे केवळ धार्मिक उत्सव नाही, तर तो मानवी नात्यांचा, एकतेचा आणि आनंदाचा सोहळा आहे. श्रावण महिन्यात मध्यरात्री अंधारलेल्या कारागृहात झालेला कृष्णजन्म आपल्याला हेच शिकवतो, की परिस्थिती कितीही कठीण असली तरी सत्याचा विजय निश्चित असतो. आजच्या धावपळीच्या आणि तणावाच्या युगात श्रीकृष्णाचे विचार प्रत्येक पिढीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी सुदाम्यासोबत निभावलेली मैत्री आपल्याला गरीब-श्रीमंतीच्या पलीकडचे निखळ प्रेम शिकवते, तर कुरुक्षेत्रावर अर्जुनाला दिलेला गीतेचा उपदेश आपल्याला आपले कर्तव्य बजावण्याची जाणीव करू देतो. 'फळाची अपेक्षा न ठेवता कर्म करत राहा.' हा त्यांचा सिद्धांत आजही व्यवस्थापन क्षेत्रापासून ते वैयक्तिक जीवनापर्यंत सर्वांना प्रेरणा देतो.



जन्माष्टमीच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा 'गोपाळकाला' म्हणजेच दहीहंडी, आपल्याला जात-पाच विसरून एकत्र येण्याचा आणि संघभावनेचा संदेश देतो. उंचावर टांगलेली दहीहंडी फोडण्यासाठी रचले जाणारे मानवी मनोरे हे दाखवून देतात, की सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केले, तर कोणतेही कठीण ध्येय गाठता येते. थोडक्यात सांगायचे तर, संकटातही हसतमुख राहून आणि बासरीच्या सुरांप्रमाणे जीवनात गोडवा टिकवून मार्ग कसा काढावा, हेच कृष्णचरित्र आपल्याला शिकवते. हाच या उत्सवाचा खरा संदेश आहे. ■

**अपर्णा अग्निहोत्री**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# दाटेगावच्या विकास कामांचे पंचायत राज अभियानांतर्गत पथकाकडून मूल्यमापन

## प्रधान सचिव डॉ चंद्रकांत पुलकुंडवार यांनी केले गावाचे कौतुक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ सप्टेंबर**



मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत हिंगोली जिल्ह्यातील दाटेगाव ग्रामपंचायतीचे राज्यस्तरीय मूल्यमापन उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या नेतृत्वाखालील राज्यस्तरीय मूल्यमापन समितीने गावाला भेट देऊन विविध विकासकामे, शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि ग्रामविकासाच्या उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली.

राज्यस्तरीय मूल्यमापन समितीत आदर्श गाव संकल्प समितीचे कार्याध्यक्ष पोपटराव पवार, यशदा, पुणे येथील राज्य ग्रामीण विकास संस्थेचे संचालक डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, पंचायत राज विभागाचे संचालक गिरीश भालेराव, भंडारा जिल्ह्यातील बेला ग्रामपंचायत सरपंच शारदा गायधने आदींचा समावेश होता.

राज्यस्तरीय पथकाच्या भेटीपूर्वी हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी मागील महिनाभर दाटेगाव येथे वेळोवेळी बैठका घेऊन ग्रामस्थांना अभियानाच्या विविध निकषांबाबत मार्गदर्शन केले होते. ग्रामपंचायत, विविध विभागांचे अधिकारी आणि ग्रामस्थांनी मूल्यमापनासाठी नियोजनबद्ध तयारी केली होती. दाटेगाव येथे आगमनानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गायकवाड यांनी प्रधान सचिव डॉ. पुलकुंडवार व राज्यस्तरीय पथकाचे स्वागत केले. याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी केशव गडापोड, गटविकास अधिकारी विष्णू भोजे, दाटेगावच्या सरपंच कन्याकुमारी माने, उपसरपंच गिताबाई माने आदींसह जिल्हा परिषद, पंचायत समिती तसेच ग्रामविकास विभागातील अधिकारी व कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

समितीने ग्रामपंचायतीच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची प्रत्यक्ष पाहणी केली. गावातील विकासकामे, शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि ग्रामस्थांचा सहभाग याबाबत सविस्तर माहिती घेण्यात आली. ग्रामस्वच्छता, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण आणि सामाजिक सहभागावर विशेष भर देण्यात आला. यावेळी मान्यवरांनी ग्रामस्थांना मार्गदर्शनही केले.

मूल्यमापन कार्यक्रमात दाटेगावसह परिसरातील महिला बचत गटांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. युवक-युवती आणि ग्रामस्थही उत्साहाने सहभागी झाले. महिला बचत गटांच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती समितीसमोर सादर करण्यात आली. महिला सक्षमीकरण, आर्थिक स्वावलंबन, बचत गटांच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती, ग्रामस्वच्छता आणि सामाजिक उपक्रमांबाबतही समितीने माहिती घेतली.

ग्रामपंचायत दाटेगावने लोकसहभागातून राबविलेल्या विविध विकासकामांची समितीने प्रत्यक्ष पाहणी केली. ग्रामस्थांनी विकासकामांसाठी घेतलेला पुढाकार, महिला बचत गटांची सक्रिय भूमिका आणि प्रशासनाचा समन्वय यामुळे गावात सकारात्मक वातावरण निर्माण झाल्याचे यावेळी दिसून आले.

राज्यस्तरीय मान्यवरांच्या उपस्थितीत झालेला हा कार्यक्रम केवळ मूल्यमापनापुरता मर्यादित राहिला नाही. ग्रामस्थांची एकजूट, महिलांचा सक्रिय सहभाग आणि लोकसहभागातून विकास साधण्याची सामूहिक इच्छाशक्ती यावेळी प्रकर्षाने दिसून आली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायतींमध्ये विकासाभिमुख स्पर्धा, लोकसहभाग आणि विविध शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीला चालना मिळत असून, दाटेगावचा हा प्रयत्न इतर ग्रामपंचायतींसाठीही प्रेरणादायी ठरणार आहे.

# संभाव्य दुष्काळजन्य परिस्थितीवर उपाययोजना करा- आ. मुटकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ सप्टेंबर**

जिल्ह्यात मोठा खंड पडला आहे. महिनाभरापासून पाऊस न झाल्यामुळे पीके वाळू लागली आहेत. त्यामुळे खरीप हंगामातील उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घटन होण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांच्या विहीरी, बोअर तसेच नदी नाल्यांना अद्याप पाणी आले नाही. त्यामुळे माणसे तसेच जनावरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणि गंभीर होणार आहे. अशा संभाव्य दुष्काळजन्य सदृश्य परिस्थितीवर तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी पत्राद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेकडे केली आहे.

पावसाने खंड दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील सोयीबीन, कापूस व इतर पीके वाळून जात आहेत. पाऊस नसल्यामुळे नद्या, धरणे तसेच ओढे, तलाव, नाले यांच्यामध्ये पाण्याचा साठा नाही. जिल्ह्यात यावर्षी पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे विदारक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. हिंगोली जिल्ह्यातील खरीप हंगाम २०२६ मध्ये जिल्ह्यात दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून पीके वाळण्यासोबतच ६० ते ७० टक्के पीकावर रोग-किडीचा प्रादुर्भाव झाला आहे. सध्या परिस्थितीच्या अनुषंगाने पिकांची अवस्था, पावसाचा परिणाम, व संभाव्य उत्पादनातील घट याबाबत वस्तुनिष्ठ अहवाल तयार करण्यासाठी कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ व महसूल, कृषी विभागांची संयुक्त पथके नियुक्त करून जिल्ह्यातील प्रत्यक्ष पीक पाहणी करण्याचे आदेश द्यावेत, तालुका मंडळनिहाय अहवाल शासनास सादर करून बाधित शेतकऱ्यांना आवश्यक तातडीची मदत द्यावी व उपाययोजना कराव्यात अशी मागणीही आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी केली आहे.

# पोलिस उपमहानिरीक्षकाच्या पथकाकडून जुगार अड्ड्यावर धाड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ सप्टेंबर**



नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस पथक हिंगोली जिल्ह्यात पाठविले होते.

सदर पथकाने, दिनांक ०५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ५.३० वाजता, हिंगोली शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत अजिंक्य सुदामराव नागरे याचे कॉम्प्लेक्समधील पत्र्याचे गाळ्यात छापा टाकला असता सदर ठिकाणी उपस्थित असणारे लोक, पैसे लावून झन्ना-मन्ना नावाचा जुगार खेळत असल्याचे निदर्शनास आले. त्यांच्याकडील उपलब्ध कागदपत्रांची पडताळणी केली असता, सदर ठिकाणी दोस्ती मित्र मंडळ चॅरिटेबल ट्रस्ट, जिल्हा ठाणे यांचे लायसेन्सचे नावाखाली झन्ना-मन्ना नावाचा जुगार खेळला जात असल्याचे व तो अजिंक्य सुदामराव नागरे यांचे मार्फत खेळविला जात असल्याचे पथकास आढळून आले. सदर कारवाईत पोलिसांनी, संबंधितांकडून २,१६,०२० रुपयांची रोकड, (१५) मोबाईल, (१)चारचाकी वाहन व (८) मोटार सायकली असा एकूण १८,४७,०२० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

याबाबत, हिंगोली शहर पोलीस ठाणे येथे गु. र.न. ६९१/२०२६ कलम ४, ५ मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून, त्याचा तपास हिंगोली शहर पोलीस ठाण्यातील सपोनि बनसोडे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह जमादार प्रदिप खानसोळे, गणेश राठोड व गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.



**हिंगोली- येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात सोमवारी शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पोलिस अधीक्षक डॉ श्रेणीक लोढा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवाड, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना यांच्यासह शांतता समितीचे पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### नगर पालिकेत राजे उमाजी नाईक जयंती



हिंगोली- मुख्याधिकारी प्रांजली मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हिंगोली नगरपरिषद कार्यालयात राजे उमाजी नाईक यांची जयंत साजरी करण्यात आली. यावेळी राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास उपमुख्यधिकारी प्रकाश साबळे, सचिन पवार, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर, वरिष्ठ लिपिक संदीप घुगे, रोखपाल गणेश धनगर, स्थापत्य अभियंता स्नेहल आवटे, वरिष्ठ लिपिक एस के दोडल, कर निर्धारक किशोर खंडेलवाल, कर निर्धारक गोविंद चव्हाण, वरिष्ठ लिपिक एजाज पठाण, मनोज बुरसे, नवनाथ ठोंबरे, प्रताप भुजवणे, गणेश मोरे, सुमन बनसोडे व इतर अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

### शिक्षक भारत शिंदे यांचा सेवापूर्ती सोहळा



हिंगोली- भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय, हिंगोली येथील ज्येष्ठ शिक्षक तथा पर्यवेक्षक भारत बहिर्जी शिंदे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय शैक्षणिक सेवेचा गौरव करण्यासाठी विद्यालयात ५ सप्टेंबर २०२६ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून सेवापूर्ती गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे होते. मंचावर उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार व श्रीमती मस्कले यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यालयाच्या वतीने भारत शिंदे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. तसेच भारतीय विद्या मंदिर सेवकांची सहकारी पत संस्था सचिव तुकाराम खिल्लारे व संचालकांनी सत्कार केला.या सत्काराला उत्तर देताना शिंदे यांनी आपल्या प्रदीर्घ सेवाकाळातील विविध आठवणींना उजाळा दिला. सुत्रांचालन एस पी कुलकर्णी यांनी तर आभार पी के राऊत यांनी मानले. कार्यक्रमास विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# लेखी आश्वासनानंतर डिग्रस कऱ्हाळे येथील शेतकऱ्यांची उपोषण स्थगीत

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ सप्टेंबर**



तालुक्यातील डिग्रस कऱ्हाळे येथे शासनाच्यावतीने साठवण तलावाला मंजूरी मिळाली होती परंतु या तलावामुळे डिग्रस कऱ्हाळेसह परिसरातील गोर-गरीब शेतकऱ्यांची सुपीक जमीन संपादीत करण्यात येणार असल्यामुळे शेतकऱ्यांनी मागील आठवडाभरापासून पाटबंधारे कार्यालयाच्या परिसरात कुटुंबियांसह आमरण उपोषण सुरू केले होते. दि ७ सप्टेंबर रोजी पाटबंधारे विभागाने शेतकऱ्यांना लेखी आश्वासन दिल्यानंतर तूर्त हे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे.

डिग्रस कऱ्हाळे येथे साठवण तलाव मंजूर करण्यात आला होता. यासाठी पाटबंधारे विभागाच्यावतीने जमिनीचे भूसंपादन करण्यात येणार होते. परंतु या परिसरातील शेतकऱ्यांची सुपीक जमीन साठवण तलावाल जाणार असल्यामुळे त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणार होता. त्यामुळे शेतकऱ्यांनी पाटबंधारे कार्यालयावर बैलगाडी मोर्चा आणला त्यानंतर जिल्हा प्रशासनाला निवेदन सादर केले. आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या निवासस्थानासमोर आंदोलन करीत सदरील साठवण तलाव रद्द करण्याची जोरदार मागणी केली होती. त्यानंतर मागील आठवडाभरापासून पाटबंधारे विभागासमोर कुटुंबियांसह शेतकऱ्यांनी आमरण उपोषण सुरू केले होते. या आंदोलनाची दखल घेत पाटबंधारे विभागाचे उपअभियंता कांबळे, ग्रामीण पोलिस ठाण्याचे पोनि विष्णुकांत गुट्ठे, शहर पोलिस ठाण्याचे पोनि देवेंद्रसिंह ठाकूर यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी शासनाला शेतकऱ्यांच्या भावना कळविण्यात आल्या असून अहवाल सादर करण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण तूर्त मागे घेण्यात आले आहे.

# हिंगोलीत कृषी विभागासमोर वाळलेल्या वाळलेल्या सोयाबीनची होळी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ सप्टेंबर**



हिंगोली जिल्ह्यात यावर्षी पावसाने मोठी दडी मारल्याने सोयाबीन, हळद, उडीद, मूग व इतर खरीप पिके मोठ्या संकटात सापडली आहेत. अनेक भागांत पिके वाळून करपण्याची परिस्थिती निर्माण झाली असून संतप्त झालेल्या क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व शेतकऱ्यांनी वाळलेले सोयाबीन कृषी विभागाच्या कार्यालयासमोर आणून त्याची होळी केली.

यावेळी हिंगोली जिल्ह्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करून दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत देण्याची प्रमुख मागणी करण्यात आली. तसेच शासनाने तातडीने दखल न घेतल्यास वेळप्रसंगी मंत्रालयाबाहेर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

हिंगोली जिल्ह्यामध्ये यावर्षी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सोयाबीनचा पेरा केला असून त्यासोबत हळद, उडीद, मूग व इतर खरीप पिकांची लागवड करण्यात आली आहे. जून महिन्यात सुरुवातीला काही प्रमाणात पाऊस झाल्याने पिकांना चांगली सुरुवात झाली होती. मात्र त्यानंतर पावसाने दडी मारल्याने अनेक भागांमध्ये पिकांना आवश्यक पाणी मिळाले नाही.

पावसाअभावी अनेक ठिकाणी सोयाबीनसह इतर खरीप पिकांची वाढ खुंटली असून पिके वाळण्यास सुरुवात झाली आहे. शेतकऱ्यांनी पेरणी, बियाणे, खते, औषधे व मशागतीसाठी मोठा खर्च केला आहे. मात्र आता पिके हातातून जाण्याची परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे.

यासह पीकविमा देण्यात यावा, बांधावर प्रत्यक्ष जावून पाहणी करावी. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्यांची तातडीने दखल घेतली नाही तर येत्या काळात आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

# धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्याची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ सप्टेंबर**

धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण देण्यासाठी राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात भक्कम बाजू मांडावी तसेच राज्य शासनाने दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी करावी या व इतर मागण्यांसाठी धनगर समाजाच्यावतीने जिल्हाधिकारी यांचेमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर करण्यात आले आहे.

मागील अनेक वर्षापासून धनगर समाजाला एसटी प्रवर्गातून आरक्षण मिळावे यासाठी आंदोलने सुरू आहेत. राज्य शासनाने यासंदर्भात गांभीर्याने घेवून सर्वोच्च न्यायालयात धनगर समाजाची बाजू भक्कमपणे मांडून आश्वासनाची पूर्तता करावी तसेच एसटी प्रवर्गातून आरक्षणाची अंमलबजावणी करावी, श्री संत बाळूमामा देवस्थानसाठी विशेष शासकीय कायदा करण्यात यावा, मुंबई ते पुणे एक्सप्रेसवेला स्वातंत्र्यवीर शिंग्रोबा धनगर नाव द्यावे, मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकाला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव द्यावे आदी मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. निवेदनावर अशोक दिंडे, शंकर ढाले, गोपाल सातपुते, शिवाजी पातळे, गणेश गडदे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# सांदीपनी पब्लीक स्कूलमध्ये गोकळाष्टमी, शिक्षक दिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ७ सप्टेंबर**



सांदीपनीपब्लिक स्कूल सुनील नगर तरोडा बुद्रुक नांदेड येथील शाळेत शिक्षक दिन व गोकुळाष्टमी उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेचे संचालक सुनील राठोड, सहसंचालक मुकुल राठोड, सौ. माहेश्वरी मुकुल राठोड, सौ.रेश्मा विपुल राठोड शाळेच्या मुख्याध्यापिका क्रांती कुलकर्णी उपमुख्याध्यापिका सौ हरप्रीत कौर यांच्याहस्ते डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर विष्णुप्रिया पवार कार्तिका डोईबोळे या लहान चिमुकल्यांनी भाषणाच्या माध्यमातून सर्वांचे लक्ष वेधून घेतले त्यानंतर शाळेतील सहशिक्षक संग्राम पवार व अरविंद काळेवार यांनी भाषणे केली. त्यानंतर अध्यक्षीय भाषणाचा समारोप करत असताना सौ. माहेश्वरी मुकुल राठोड यांनी बोलत असताना डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे जीवन व कार्य व आधुनिक काळात विद्यार्थी व शिक्षकांची भूमिका यावरती सखोल मार्गदर्शन केले व शिक्षकच हा विद्यार्थ्यांचे संपूर्ण व्यक्तिमत्व घडवत असतो. त्यानंतर सर्व शिक्षकांचे पुष्पगुच्छ देऊन कौतुक करण्यात आले. त्यानंतर इयत्ता दहावीच्या मुलांनी दहीहंडी फोडण्यात आली.



# झेड कट्टा तरुणाईचा प्लॅनेट

## एव्हरGreen...नव्या पिढीच्या ओठांवरील जुनी गाणी...

लग जा गले कि फिर ये हसीं रात हो न हो
शायद फिर इस जनम में मुलाक़ात हो न हो
लग जा गले से ...

हमको मिली हैं आज, ये घड़ियाँ नसीब से
जी भर के देख लीजिये हमको क़रीब से
फिर आपके नसीब में ये बात हो न हो
फिर इस जनम में मुलाक़ात हो न हो
लग जा गले कि फिर ये हसीं रात हो न हो



पास आइये कि हम नहीं आएंगे बार-बार
बाहें गले में डाल के हम रो लें ज़ार-ज़ार
आँखों से फिर ये प्यार कि बरसात हो न हो
शायद फिर इस जनम में मुलाक़ात हो न हो

लग जा गले कि फिर ये हस्सीं रात हो न हो
शायद फिर इस जनम में मुलाक़ात हो न हो
लग जा गले कि फिर ये हस्सीं रात हो न हो

# क्रांतीची गाथा की डिप्रेशनची व्यथा?



## कव्हर Story

**संदीप दा. नंदनवार**

स्मार्टफोनच्या स्क्रीनवर बोट फिरवत, सेकंदाला रील बदलणारी आणि जगातील प्रत्येक घडामोडीवर अवघ्या काही शब्दांत 'मीम' बनवून व्यक्त होणारी पिढी म्हणजे 'जेन झी'. १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली ही पिढी आज २१ व्या शतकाची सर्वात मोठी चालक शक्ती बनली आहे. वरवर पाहता ही पिढी अत्यंत बिनधास्त, प्रगत आणि सुखासीन वाटते. पण या चंदेरी दुनियेच्या मागे त्यांची एक स्वतःची 'गाथा' आहे आणि तितकीच भयंकर 'व्यथा' देखील आहे.जेन झीची गाथा ही खऱ्या अर्थाने क्रांतीची गाथा आहे. ही पिढी जन्मालाच आली ती हातात इंटरनेट घेऊन. त्यामुळे त्यांना तंत्रज्ञान शिकवावे लागत नाही, तर ते तंत्रज्ञान घडवतात. पारंपरिक नोकऱ्यांच्या मागे न धावता स्वतःचा मार्ग स्वतः निवडण्याचे धाडस या पिढीमध्ये आहे. वयाच्या विसाव्या वर्षी युट्युब, इंस्टाग्राम किंवा एआयच्या मदतीने करोडोंचे स्टार्टअप्स उभे करण्याची ताकद या पिढीने दाखवून दिली आहे. या पिढीची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांची स्पष्टता. ते कालबाह्य रूढी-परंपरांना थेट प्रश्न विचारतात. त्यांच्या याच उघड्या डोळ्यांनी जगण्याच्या वृत्तीवर प्रसिध्द शायर वसीम बरेलवींचा हा शेर अगदी योग्य ठरतो.

**आँखों में रहा दिल में उतर कर नहीं देखा,**
**कश्ती के मुसाफ़िर ने समंदर नहीं देखा...**

त्यांच्यासाठी जग एका क्लिकवर उपलब्ध असल्यामुळे त्यांची विचारसरणी जागतिक दर्जाची आहे. ते कुणाचेही गुलाम बनून राहू शकत नाहीत; मग ती नोकरी असो वा नातेसंबंध. पण या झगमगाटी गाथेच्या मागे एक गडद अंधार आहे. जेन झी ही इतिहासातील सर्वात जास्त 'कनेक्टेड' पण सर्वात जास्त 'एकटी' पिढी आहे. सोशल मीडियावरील 'लाईक्स' आणि 'फॉलोअर्स'च्या संख्येवर त्यांचे सुख-दुःख ठरते. बाहेरून सर्वकाही आलबेल दिसणाऱ्या या पिढीच्या अंतर्मनातील अस्वस्थतेचे वर्णन वसीम बरेलवी अतिशय सुंदर शब्दांत करतात.

**अपने चेहरे से जो ज़ाहिर है छुपाएँ कैसे,**
**तेरी मर्ज़ी के मुताबिक़ नज़र आएँ कैसे...**

खरं सांगायचे म्हणजे 'फोमो' म्हणजेच 'आपण मागे तर पडत नाही ना?' या भीतीने या पिढीला ग्रासले आहे. या पिढीची मुख्य व्यथा मानसिक तणाव, अस्थिरता आणि बेरोजगारीची नवी भीती व नात्यांमधील दुरावा या मुद्द्यांमधून ठळकपणे समोर येते. व्हर्च्युअल जगात हजारो 'फ्रेंड्स' असूनही प्रत्यक्ष आयुष्यात मन मोकळे करायला हक्काचा माणूस नाही. या आभासी मुखवट्यांच्या गर्दीबद्दल कवी म्हणतात,

**अब किस से कहें और कौन सुने,**
**जो हाल हुआ दिल-ए-नादाँ का,सब एक से चेहरे रखते हैं,**
**पहचान करें तो किसकी करें...**

वास्तविका जेन झी वाईट नाही, तर ती एका अत्यंत वेगवान आणि अस्थिर काळाची शिकार आहे. जुन्या पिढीने त्यांना केवळ 'मोबाईलमध्ये डोकं घालणारी पिढी' म्हणून हिणवण्यापेक्षा त्यांच्या व्यथा समजून घ्यायला हव्यात. दुसऱ्यांच्या अपेक्षांचे ओझे वाहणाऱ्या या पिढीने स्वतःची खरी ओळख ओळखणे गरजेचे आहे. या संदर्भात वसीम बरेलवींचा हा विचार जेन झीने लक्षात ठेवण्यासारखा आहेः

**उस की उम्मीद न रख जिस से मिला हो धोखा,अपने साए पे भी अब लोग यक़ीं कम करते हैं...**

जेन झीने आभासी जगाच्या बाहेर पडून खऱ्या आयुष्यातील नातेसंबंध, संयम आणि मानसिक शांतता या गोष्टींना महत्त्व द्यायला हवे. जर या पिढीने आपल्या तंत्रज्ञानाच्या ताकदीला संयमाची जोड दिली, तर ते जगाचा इतिहास बदलू शकतात. अन्यथा, आभासी दुनियेच्या चक्रव्यूहात ही पिढी स्वतःची ओळख हरवून बसेल, हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

**(संपर्क : ९३०९९९८९९७ )**

> **जेन झीने आभासी जगाच्या बाहेर पडून खऱ्या आयुष्यातील नातेसंबंध, संयम आणि मानसिक शांतता या गोष्टींना महत्त्व द्यायला हवे. जर या पिढीने आपल्या तंत्रज्ञानाच्या ताकदीला संयमाची जोड दिली, तर ते जगाचा इतिहास बदलू शकतात. अन्यथा, आभासी दुनियेच्या चक्रव्यूहात ही पिढी स्वतःची ओळख हरवून बसेल, हे त्रिकालाबाधित सत्य आहे.**

## होप Full

**अनिल फेकरीकर**

# नवीन पिढी हुशार; जुन्यांनी करावा विचार!



जुने ते सोने असते अशी म्हण आपल्याकडे प्रसिद्ध आहे. ते शाश्वत सत्य असले तरी नवीन गोष्टी कुचकामी आहेत, असा त्यातून कुणीही अर्थ काढू नये. वर्तमानात नवीन पिढीविषयी जुनी जाणकार मंडळी नाराजी व्यक्त करतात. मान्य आहे की, ही पिढी सतत मोबाईलमध्ये गुंतली आहे. पण त्यात त्यांचा काय दोष, कारण परिस्थिती तशीच बनविण्यात आली आहे. जी मुले पूर्वी मैदानावर खेळण्यासाठी आईवडिलांचा राग ओढवून घ्यायची, ती आज आग्रह सोडा सुविधा देऊनही मैदानावर जाणे टाळतात. कारण कुणालाही घाम गाळायचा नाही. मग आतील ऊर्जा तर संपवायची आहे ना म्हणून त्यांनी मोबाईलवर रिल स्टार होण्यावरच भर दिला. यातून त्यांना प्रसिद्धी मिळते शिवाय काही अटी पूर्ण झाल्या तर पैसाही मिळत असतो. पण याकरिता जबाबदार ती मुले नाहीत. त्याकरिता आपणच जबाबदार आहोत. समाजाने आपले कर्तव्य पूर्ण केले असते तर ती मुले रिल नव्हे रिअल स्टार होण्यासाठी धडपडले असते. पण यासर्व गोष्टी जुन्या पिढीसाठी कर्दनकाळ का ठरतात तर याचेही कारण फार महत्त्वपूर्ण आहे. जुन्या पिढीला आजच्या सारखी भौतिक सुविधा मिळाली नाही. ते वैज्ञानिक सुखापासून वंचित राहिले. पण हेच सुख नवीन पिढीला सहजतेने भोगायला मिळत आहे, कदाचित याच कारणाने नवीन पिढीवर जुनी मंडळी आगपाखड करीत आहेत. उदाहरण द्यायचे झाल्यास 'तारक मेहता का उलटा चष्मा' या मालिकेत आपले गोकुळधाम सोसायटीचे एकमेव सेक्रेटरी आत्माराम तुकाराम भिडे नेहमीच भूतकाळात जातात अन् आमच्या जमान्यात असे होते याप्रकारचे वक्तव्य ते वारंवार करतात. त्यांच्या बोलण्यातून नेहमी युवा पिढीच्या संदर्भात नकारात्मक भाव स्पष्टपणे जाणवतो. हीच भावना आज जुन्या पिढीतील लोकांना खलनायक ठरवित आहे. म्हणूनच जुन्या पिढीने एक बाब समजून घ्यावी की, नवीन मुले हुशारच आहेत. त्यांना कमी लेखू नका तर त्यांच्यातील चांगले गुण हेरून त्यांना प्रोत्साहित करा. आपण देवीदेवतांची पूजा करतो आणि ते प्रसन्न व्हावे म्हणून आरतीही ओवाळतो. मग तशीच भावना युवकांच्या संदर्भात ठेवायला हवी. तेही खुश आणि आनंदी राहायला हवेत या हेतूने त्यांच्यातील उणीवा न सांगता ते कसे टेक्नोसेव्ही झाले त्याचा अभ्यास करून काही तरी गुण घेण्याचा प्रयत्न करा.

संसार करताना सुनांचा इगो नेहमीच वरचढ असतो. त्या सासूपेक्षा वरचढ ठरण्याचा प्रयत्न करतात. वस्तुतः सासूने काबाडकष्ट करून आपली एक इमारत उभी केलेली असते. त्या इमारतीवर आयतोबा बनून सून ताबा घेते. यामुळे सासू व्यथित होत असते. अशावेळी सुनेने व्यापक विचार करून सासूचे कौतुक करावे. समजा सुनबाईने हा मूलमंत्र जपला तर सासुसोबत तिचे संबंध मधुर राहतील अन् कटुता संपुष्टात येईल. आता हेच पहा ना, आपण मुलांकडून खूप अपेक्षा करतो. त्याअनुषंगाने त्याला त्रिकोण, चौकोन, लघुकोन, काटकोन शिकवितो. मात्र प्रत्यक्षात आपला कोण हे शिकवतो का, याचे उत्तर नाही असे द्यावे लागेल. मग युवा पिढी रिल स्टार नाही बनणार तर काय, यावर चिंतनाची वेळ आलेली आहे.

सर्वांनाच वाटते की, आपला मुलगा छत्रपती शिवरायांसारखा व्हावा. याकरिता घरोघरी जीजाबाई जन्माला घालावी लागेल. इतिहास शिकविताना पराभूत मानसिकतेचे धडे न सांगता पराक्रम केलेला भाग त्यांना वारंवार पटवून द्यावा लागेल. बाजीराव पेशवे शूरवीर पराक्रमी होते. त्यांनी आयुष्यात एकही लढाई हारली नाही. त्यांनी ४२ लढाया जिंकल्या. तो पराक्रम न सांगता केवळ मस्तानीवर भर देण्याचे काम अभ्यासक्रमातून झाले. इंग्रजांनी भारतीयांना गुलाम बनवून १५० वर्षे राज्य केले. तेव्हा आपण नेमके गुलाम का आणि कसे झालो, हे सांगायला हवे. भविष्यात असा प्रकार आपल्या देशासोबत घडू नये म्हणून कशी वाटचाल करावी यावर मार्गदर्शन करायला हवे. पण तसा अभ्यासक्रमच आपल्याकडे नाही. म्हणूनच आजची युवा पिढी चुकीचे वागत आहे. यावर रामबाण तोडगा काढायचा असेल तर नक्कीच काही बदल स्वतःपासून करावे लागतील. जेव्हा हे बदल सकारात्मकतेने होतील, तेव्हा घरोघरी रिअल स्टार बनतील.

**(संपर्क : ९८८१७१७८५९)**



# उठा... जागे व्हा...

## स्वामी विवेकानंदांचे तरुणांना आवाहन

## वॉइस over

**अभिजित वर्तक**

स्वामी विवेकानंदांनी तरुणांना दिलेला संदेश आजही तितकाच धगधगता आहे. ते म्हणत, 'मला लोखंडी स्नायू आणि पोलादी मज्जातंतू असलेले तरुण हवे आहेत. पण ही शक्ती कशासाठी? कोणावर अन्याय करण्यासाठी नाही, तर अन्यायाविरुद्ध आणि अज्ञानाविरुद्ध उभे राहण्यासाठी'. आजच्या डिजिटल युगात, जिथे तरुण नैराश्याला आणि मानसिक ताणाला बळी पडत आहेत, तिथे स्वामीजींचे विचार 'सकारात्मकतेचा' जोरदार प्रवाह आहे. त्यांनी धर्माला विज्ञानाशी जोडले. त्यांनी कधीही अंधश्रद्धेचे समर्थन केले नाही, उलट, त्यांनी प्रत्येक गोष्ट तर्काच्या कसोटीवर घासून पाहण्याचे आवाहन केले. 'तुमचा स्वतःवर विश्वास नसेल, तर तुमचा देवावरही विश्वास बसणार नाही,' हा त्यांचा सिद्धांत आजही तितकाच प्रभावी आहे.स्वामीजींच्या विचारांचा मुख्य गाभा म्हणजे 'प्रत्यक्ष कृती' किंवा 'कर्तव्य' होय. ते म्हणत, 'आम्ही जे काही आहोत, त्यासाठी आम्ही स्वतःच जबाबदार आहोत.' आपल्या परिस्थितीचे खापर नशिबावर किंवा दुसऱ्यावर फोडण्यापेक्षा, स्वतःचे भविष्य स्वतः घडवण्याची ताकद प्रत्येकात असते, हा त्यांचा विश्वास होता. आजचा भारतीय युवक कसा असायला हवा याची स्वामी विवेकानंदांनी केलेली मांडणी आजच्या युवकापर्यंत पोहोचायला हवी. त्यांचे विचार हेच उद्याच्या प्रगत व विकसित भारताचे खरे आधारस्तंभ ठरणार आहेत. 'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त झाल्याशिवाय थांबू नका,' हा त्यांचा प्रभावी संदेश आजही प्रत्येक तरुणाला आत्मविकासाची प्रेरणा देतो. तेव्हा तरुणांनो, स्वामीजींच्या विचारांवर सातत्याने चिंतन करून सतत पुढे जाण्याचा संकल्प करा.

**(संपर्क : ९४२२९२३२०१ )**

## रील ते real

**प्रणव सातोकर**

# रील्सच्या गर्दीतला वेगळा तरुण



आजच्या डिजिटल युगात सोशल मीडिया म्हणजे मनोरंजन, प्रसिद्धी आणि फॉलोअर्स मिळवण्याचे माध्यम, अशी सर्वसाधारण धारणा आहे. मात्र, याच सोशल मीडियाचा उपयोग सामाजिक समस्या प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी, गरजू रुग्णांना रक्तदाता मिळवून देण्यासाठी तसेच महाराष्ट्राचा सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लोकांसमोर आणण्यासाठी करणारा तुषार घारपेंडे हा जेन झी मधील वेगळा तरुण म्हणून समोर आला आहे.

नागरिकांची समस्या समोर आणणे, त्याचा व्हिडिओ तयार करणे, तो सोशल मीडियावर पोहोचवणे, नागरिकांचा प्रतिसाद मिळवणे आणि त्यानंतर प्रशासनाचे लक्ष वेधून घेणे, अशी तुषारची कार्यपद्धती आहे. समस्या → व्हिडिओ → सोशल मीडिया → नागरिकांचा प्रतिसाद → प्रशासनाचे लक्ष → प्रत्यक्ष बदल, या सूत्रातून तो विविध सामाजिक प्रश्न मांडत आहे.

**खेतापूरच्या विद्यार्थिनींसाठी सहाव्या दिवशी सुरू झाली बससेवा**

खेतापूर येथील सहा विद्यार्थिनींना दररोज शाळेत जाण्यासाठी सुमारे सात किलोमीटर पायी प्रवास करावा लागत होता. ये-जा मिळून त्यांचा दररोजचा प्रवास जवळपास १४ किलोमीटरचा होता. खराब रस्ते, सायकलची अडचण तसेच परिसरातील वन्यप्राण्यांचा धोका अशा अनेक अडचणींचा सामना करत या विद्यार्थिनी शिक्षण घेत होत्या. गावात एसटी बससेवा सुरू करण्याची त्यांची मागणी होती. तुषारने हा प्रश्न व्हिडिओच्या माध्यमातून सोशल मीडियावर मांडला. या व्हिडिओला अल्पावधीत मोठा प्रतिसाद मिळाला. भाजपच्या युवा कार्यकर्त्यांनी हा प्रश्न पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या निदर्शनास आणून दिला. त्यामुळे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाचेही या प्रश्नाकडे लक्ष वेधले गेले. अखेर काही दिवसांतच प्रशासनाने या प्रश्नाची दखल घेतली आणि सहाव्या दिवशी खेतापूरमध्ये एसटी बससेवा सुरू झाली. जिल्हाधिकारी, तहसीलदार, आमदार तसेच संबंधित अधिकारी गावात पोहोचले आणि विद्यार्थिनींची समस्या प्रत्यक्ष जाणून घेतली.

**रक्तदात्यांचा शोध घेण्यासाठी सोशल मीडियाचा वापर**

तुषारच्या सामाजिक कामाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे रक्तदान आणि गरजू रुग्णांसाठी रक्तदात्यांचा शोध. एखाद्या रुग्णाला रक्ताची गरज असल्याची माहिती मिळाल्यानंतर रक्तगट आणि आवश्यक माहिती सोशल मीडियावर प्रसारित करून संभाव्य रक्तदात्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला जातो. एखाद्यासाठी हा केवळ सोशल मीडिया स्टेटस असू शकतो; मात्र रुग्णाच्या कुटुंबासाठी तो जीवनाची आशा ठरू शकतो. गुढीपाडवा आणि रामनवमीसारख्या सणांच्या निमित्ताने रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्याचा उपक्रमही राबवण्यात आला. कोरोनाच्या काळात रक्ताचा तुटवडा जाणवत असताना रामनवमीचा महाप्रसाद न ठेवता रक्तदानाचे आवाहन करण्यात आले. वाठोडा येथील हनुमान मंदिरात झालेल्या या उपक्रमात ६२ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

**कॅमेऱ्यातून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वारशाचे दस्तावेजीकरण**

सामाजिक प्रश्नांसोबतच तुषारचा कॅमेरा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाकडेही वळला आहे. प्राचीन मंदिरे, ग्रामीण भागातील परंपरा, धार्मिक स्थळे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि बैलगाडा शर्यती यांसारख्या विषयांवर व्हिडिओ आणि डॉक्युमेंटरी तयार करून तो ही माहिती डिजिटल माध्यमातून लोकांपर्यंत पोहोचवत आहे. अनेक ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांची माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर लोकांपर्यंत पोहोचू शकते. त्यातून स्थानिक पर्यटनाला चालना मिळण्याबरोबरच स्थानिक रोजगाराच्या संधीही निर्माण होऊ शकतात.

तुषारच्या सामाजिक कार्यामागे त्याचा वैयक्तिक संघर्षही महत्त्वाचा आहे. लहानपणी आई-वडिलांच्या चहा-नाश्त्याच्या दुकानात मदत करताना त्याने सामान्य कुटुंबांचे जीवन जवळून अनुभवले. आर्थिक परिस्थितीमुळे त्याच्या शिक्षणात खंड पडला. वयाच्या १६व्या वर्षी त्याला दुकानाची जबाबदारी घ्यावी लागली. त्यानंतर वडिलांचे निधन झाले. सोशल मीडियावर काम सुरू केल्यानंतर सुरुवातीला 'यातून काय मिळणार?' असा प्रश्नही त्याला विचारला गेला. मात्र, टीका आणि अडचणींना न जुमानता त्याने आपला प्रवास सुरू ठेवला. स्वतःच्या संघर्षामुळेच सामान्य नागरिकांच्या समस्या समजून घेण्याची संवेदनशीलता अधिक विकसित झाल्याचे त्याच्या कामातून जाणवते.

तुषारचा पुढील फोकस शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या प्रश्नांवर आहे. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण आणि विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा मिळाव्यात, आरोग्य क्षेत्रातील समस्या समोर याव्यात तसेच तरुणांनी केवळ नोकरीच्या मागे न लागता स्वयंरोजगार आणि उद्योगाकडे वळावे, यासाठी काम करण्याचा त्याचा मानस आहे.

त्याच्या मते, समाजपरिवर्तन म्हणजे केवळ एखादी समस्या सोडवणे नव्हे, तर पुढच्या पिढीला सक्षम करणे हा त्याहून मोठा बदल आहे.

**'व्ह्यूज किती पेक्षा, बदल काय झाला?'**

डिजिटल पिढीकडे माहिती, तंत्रज्ञान, कॅमेरा आणि मोठा प्रेक्षकवर्ग उपलब्ध आहे. या शक्तीचा सकारात्मक वापर करण्याची गरज असल्याचे तुषारचे मत आहे. तरुणांनी अमली पदार्थांपासून दूर राहावे, सोशल मीडियाचा सकारात्मक वापर करावा, स्वयंरोजगार आणि उद्योगाचा विचार करावा, परिसरातील चांगल्या गोष्टी जगासमोर आणाव्यात आणि चुकीच्या गोष्टी प्रशासनापर्यंत पोहोचवाव्यात, असा त्याचा संदेश आहे.

आज सोशल मीडियावर लाखो तरुण सक्रिय आहेत. मात्र, 'माझ्या व्हिडिओला किती व्ह्यूज मिळाले?' यापेक्षा 'माझ्या व्हिडिओमुळे काय बदल झाला?' हा प्रश्न महत्त्वाचा मानणारा तुषारचा प्रवास वेगळा ठरतो. रील्सच्या गर्दीत स्वतःची प्रसिद्धी शोधण्याऐवजी समाजाच्या प्रश्नांना व्यासपीठ देणारा हा Gen-Z तरुण डिजिटल युगातील 'जागरूक नागरिक' म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण करत आहे.

**(संपर्क : ९५६१४४२६०५)**

www.tarunbharat.net
तरुण भारत
# धर्म अध्यात्म
७ | मंगळवार, दि. ०८ सप्टेंबर २०२६
संयोजक : शिल्पा विवेक कवठेकर/९८२३२६४६२६

# बाळकृष्ण ते योगेश्वर

**कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने ।**
**प्रणतक्लेशनाशाय गोविंदाय नमो नमः ।।**

कृष्णाला नेमके केणत्या रूपात पाहावे? यशोदेच्या मांडीवर खेळणारा बाळकृष्ण, गायी-गोपाळांसोबत रानावनात रमणारा गोपालकृष्ण, प्रेमाला लौकिकाच्या पलीकडचा अर्थ देणारा राधाकृष्ण, अधर्माच्या विरोधात उभा राहून धर्मसंस्थापनेची ग्वाही देणारा भगवान श्रीकृष्ण? की कुरुक्षेत्रावर संभ्रमित अर्जुनाला कर्तव्य आणि जीवनाचा अर्थ सांगणारा योगेश्वर श्रीकृष्ण? कदाचित कृष्णाचे वैशिष्ट्यच हे आहे की, यापैकी कोणतेही एक रूप म्हणजे संपूर्ण कृष्ण नाही; तरीही प्रत्येक रूपात संपूर्ण कृष्णच आहे! कृष्ण कधी वात्सल्य बनतो, कधी सखा, कधी प्रेम, कधी आधार, कधी मार्गदर्शक, तर कधी जीवनाच्या रणांगणावर विवेक जागवणारा योगेश्वर. या कृष्णाशी नाते जुळू लागले की नकळत म्हणावेसे वाटते, मनाला झाली कृष्णसख्याची बाधा.

आधी लागते ती चाहूल... कृष्णाचा आपल्या जीवनातील प्रवेश चमत्काराने न होता कधी बासरीच्या सुरातून, कधी संकटातील अनपेक्षित आधारातून, कधी मनाच्या नीरव शांततेत त्याची चाहूल लागते. ती चाहूल पुढे ओढ बनते.

**श्रीकांत भास्कर तिजारे/**
९४२३३८३९६६



कदाचित म्हणूनच भक्ताचे मन म्हणते, 'नमामि मेघसुन्दरम्'. सावळ्या मेघासारखा तो दिसतो. हळूहळू लक्षात येते की मनाला ओढ त्याच्या रूपाची नसून अस्तित्वाची आहे. या ओढीचे सर्वांत उत्कट प्रतीक म्हणजे राधाकृष्ण. राधेची कृष्णाकडे असलेली अनिवार ओढ म्हणजे जीवाची परमात्म्याकडे धाव. येथे मिळविण्यापेक्षा विरघळणे महत्त्वाचे ठरते. प्रेमाच्या सर्वोच्च अवस्थेत 'मी' किती उरलो आणि 'तू' किती मिळालास, याची मोजदादच संपते आणि मग ओठांवर सहज येते, 'श्रीकृष्णः शरणं मम.'

देव खाली उतरतो आणि सखा होतो. कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वातील सर्वांत लोभस पैलू म्हणजे त्याचे सख्य. तो केवळ देव्हाऱ्यात बसून भक्ताने आपल्यापर्यंत पोहोचण्याची वाट पाहणारा देव नाही. तो स्वतः खाली उतरतो. गोपाळांच्या खांद्यावर हात टाकतो. त्यांच्यासोबत खेळतो, हसतो, रुसतो. 'नमामि गोपनायकम् । नमामि नन्दबालकम् ।।' या भावात कृष्णाचे दोन विलक्षण पैलू एकत्र येतात. तो गोपांचा नायक आहे आणि त्याच वेळी नंदाचा लाडका बालकही आहे. हा गोपालकृष्ण समतेचा विलक्षण धडा देतो. गोपालकाल्यात प्रत्येकाची शिदोरी वेगळी असते. कुणाचे दही, कुणाचे पोहे, कुणाचे लोणी, कुणाची भाकरी; परंतु सारे एका काल्यात मिसळले की 'माझे' आणि 'तुझे' उरत नाही. 'माझं' वेगळं राहिलं, तर ती शिदोरी; 'आपलं' झालं, की तो गोपालकाला!

जात, भाषा, प्रांत, आर्थिक स्तर आणि प्रतिष्ठा यांच्या असंख्य कप्प्यांत विभागल्या जाणाऱ्या समाजाला गोपालकृष्ण सांगतो, आपली स्वतंत्र ओळख नष्ट करण्याची गरज नाही; पण त्या ओळखीपेक्षा मोठे 'आपण' निर्माण करता आले पाहिजे. नंदाचा बाळ, अन् विश्वाचा परमात्मा. कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वातील विलक्षण विरोधाभास येथेच अनुभवाला येतो. ज्याच्यासाठी भक्त म्हणतो, 'कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने.' तोच परमात्मा यशोदेच्या अंगणात रांगतो, ज्याला विश्वाचा स्वामी म्हणायचे, त्याच्यावर लोणी चोरल्याचा आरोप होतो. ज्याच्या मुखात यशोदेला विश्वाचे दर्शन घडते, त्याच बालकाला ती उखळाला बांधण्याचा प्रयत्न करते. 'नमामि नन्दबालकम् !'

या बाळकृष्णाकडे पाहताना अध्यात्मातील एक सुंदर सत्य उमगते.परमात्म्याला केवळ भयाने किंवा कर्मकांडाने जवळ करता येत नाही; प्रेमाने त्याला मांडीवरही घेता येते. बाळकृष्ण म्हणजे निरागसता, सहजता, आनंद आणि वात्सल्य. म्हणून जन्माष्टमीचा पाळणा बाहेर सजवताना मनातही एक पाळणा सजायला हवा. शब्द संपतात तेव्हा संवाद सुरू होतो. सख्य मनात खोलवर रुजले की सतत बोलावे लागत नाही. एक दिवस वाटते, आज कृष्णाशी बोललो. शब्दांनी नाही, मनाने. मनातील प्रश्न त्याला कळतात आणि त्याच्या शांततेतील उत्तर आपल्याला जाणवू लागते. कधी कृष्ण बासरीतून बोलतो. कधी एखाद्या प्रसंगातून. कधी आपल्या अंतःकरणात जाग्या होणाऱ्या विवेकातून. आजचा माणूस बाहेरच्या जगाशी पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक 'कनेक्टेड' आहे; पण स्वतःच्या अंतरंगाशी त्याचा संवाद कमी होत चालला आहे. अशा वेळी कृष्णाची बासरी जणू सांगते, थोडा थांब. मनातील कोलाहल शांत कर. स्वतःला ऐक. कदाचित तेथेच कृष्ण भेटेल.

जीवनात असे प्रसंग येतात, की प्रार्थना करूनही प्रश्न सुटत नाहीत, वाट दिसत नाही, अपेक्षित उत्तर मिळत नाही. तेव्हा कृष्णाचे आणखी एक रूप उलगडते ते आधार देणाऱ्या सख्याचे. आपण त्याला सगळे प्रश्न सांगतो आणि उत्तराऐवजी तो आपला हात धरतो तेव्हा समर्पणाचा खरा अर्थ कळतो. समर्पण म्हणजे निष्क्रियता नव्हे, प्रयत्न सोडणे नव्हे. समर्पण म्हणजे सर्व प्रयत्न करूनही जे आपल्या हातात नाही, त्याबद्दलचा अहंकारी आग्रह सोडणे. उत्तर माझ्या हातात नाही; पण माझा हात त्याच्या हातात आहे. इतका विश्वास निर्माण झाला की प्रार्थना बदलते. 'माझ्या इच्छेप्रमाणे घडू दे' या आग्रहाऐवजी ती म्हणू लागते, 'ॐ नमो भगवते वासुदेवाय..' आणि अखेरीस, श्रीकृष्णः शरणं मम. ही शरणागती पराभवाची नाही; ती विश्वासाची आहे. समर्पणानंतर एक विलक्षण शांतता येते. बासरीही शांत होते. यमुनाही शांत भासते. मनाचे गोकुळ जणू स्तब्ध होते. कारण आता स्वरांसोबत, स्वर जन्माला घालणायाची प्रतीक्षा असते! मनात श्रद्धेचे दिवे लागतात. प्रेमाची रांगोळी उमटते. भक्तीची फुले दरवळतात. फक्त एक जागा रिकामी असते, हृदयाच्या पाळण्याची! मन जाणते, कुणीतरी येणार आहे. कृष्ण मथुरेत नव्हे... माझ्या अंतरी जन्मावा.

जन्माष्टमीच्या मध्यरात्री आपण पाळणा सजवतो, आरती करतो आणि कृष्णजन्माचा आनंद साजरा करतो. पण त्या आनंदाच्या क्षणी स्वतःला एक प्रश्न विचारायला हवा, कृष्ण मथुरेत जन्मला; पण माझ्या अंतरी कधी जन्मणार? मनातील अंधारात प्रकाश जन्माला येणे म्हणजे कृष्णजन्म. निराशेत आशा जन्माला येणे म्हणजे कृष्णजन्म. द्वेषात प्रेम जन्माला येणे म्हणजे कृष्णजन्म. अहंकारात नम्रता जन्माला येणे म्हणजे कृष्णजन्म. अस्वस्थतेत शांतता जन्माला येणे म्हणजे कृष्णजन्म. संभ्रमात विवेक जन्माला येणे म्हणजे कृष्णजन्म. आणि 'मी'च्या जागी हळूहळू 'तू' जन्माला येणे, हाच अंतरीचा कृष्णजन्म! मग मन पुन्हा नतमस्तक होते, नमामि नन्दसम्भवम्.

कृष्णाला केवळ बासरी, मोरपीस आणि रासलीलेपुरते मर्यादित केले तर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा मोठा भाग आपल्या नजरेआड राहतो. कंसाचा अंत करणारा, अन्यायासमोर न झुकणारा, धर्माच्या रक्षणासाठी प्रसंगी कठोर निर्णय घेणारा भगवान श्रीकृष्ण आपल्याला सांगतो, प्रेम करा पण अन्याय सहन करू नका. करुणा ठेवा पण दुर्बल होऊ नका. शांतता जपा पण अधर्मासमोर मौन राहू नका. कृष्णाच्या हातातील बासरी जितकी महत्त्वाची, तितकाच धर्मसंस्थापनेचा त्याचा संकल्पही महत्त्वाचा आहे. म्हणूनच कृष्णाचे स्मरण हे कर्तव्याची जागृती आहे. आणि मग भेटतो योगेश्वर. बाळकृष्ण प्रेम शिकवतो. गोपालकृष्ण एकत्र जगायला शिकवतो. राधाकृष्ण प्रेमात 'मी' विरघळवायला शिकवतो. भगवान श्रीकृष्ण धर्मासाठी उभे राहायला शिकवतो आणि जीवनाच्या कुरुक्षेत्रावर भेटतो तो योगेश्वर श्रीकृष्ण!

अर्जुनासमोर प्रश्न केवळ युद्धाचा नव्हता. तो प्रत्येक माणसाच्या जीवनातील सनातन प्रश्न होता, मी काय करू? योग्य काय? माझे कर्तव्य कोणते? भावना आणि कर्तव्य यांच्या संघर्षात निर्णय कसा घ्यावा? कृष्णाने अर्जुनाचे युद्ध स्वतः लढले नाही. त्याने अर्जुनाच्या हातातील गांडीव स्वतः घेतले नाही. त्याने अर्जुनाला दृष्टी दिली, विवेक दिला, कर्तव्य समजावले आणि लढायचे सामर्थ्य जागवले. हीच योगेश्वराची भूमिका आजही आवश्यक आहे. आपली संकटे तो प्रत्येक वेळी नाहीशी करेलच असे नाही; पण संकटांतून जाण्याचे सामर्थ्य देईल. आपले निर्णय तो घेणार नाही पण निर्णय घेण्याचा विवेक जागवेल. जीवनाचे कुरुक्षेत्र नाहीसे होणार नाही पण त्या कुरुक्षेत्राच्या मध्यभागी स्थिर राहण्याची बुद्धी देईल आणि म्हणूनच पुन्हा वंदना उमटते,

'प्रणतक्लेशनाशाय गोविन्दाय नमो नमः ।।'

'माझा कृष्ण' ते 'आपला कृष्ण.' कृष्णसख्याचा हा प्रवास विलक्षण आहे, चाहूल लागते. चाहुलीतून ओढ निर्माण होते. ओढ सख्यात बदलते. सख्यातून संवाद जन्मतो. संवाद समर्पण शिकवतो. समर्पण प्रतीक्षेला शांत करते. प्रतीक्षेतून अंतरी कृष्ण जन्मतो. आणि अंतरी जन्मलेला कृष्ण आनंद वाटायला शिकवतो. इथेच सप्तपदीचा प्रवास गोपालकाल्यातील आनंदोत्सवात पूर्णत्वाला जातो. कारण कृष्ण केवळ 'माझा' झाला, तर साधना अजून अपूर्ण आहे. समोरच्या माणसातही कृष्ण दिसू लागला, त्याचे सुख-दुःख आपले वाटू लागले, स्वतःची शिदोरी दुसऱ्यासोबत वाटावीशी वाटली, 'मी'च्या भोवती आखलेले वर्तुळ मोठे होऊन 'आपण' निर्माण झाले, तेव्हा कृष्णसख्य सामाजिक होते. बाळकृष्णाचे वात्सल्य, गोपालकृष्णाचा बंधुभाव, राधाकृष्णाचे समर्पित प्रेम, भगवान श्रीकृष्णाची धर्मनिष्ठा आणि योगेश्वर श्रीकृष्णाचा विवेक.

ही पाचही रूपे आपल्या जीवनात थोडी थोडी उतरली तर कृष्णजन्म साजरा करण्याला खरा अर्थ प्राप्त होईल. मग कृष्णाला केवळ मंदिरात शोधावे लागणार नाही. तो आईच्या वात्सल्यात दिसेल. मित्राच्या खांद्यावर जाणवेल. निरपेक्ष प्रेमात भेटेल. अन्यायाविरुद्ध उभ्या राहिलेल्या धैर्यात दिसेल आणि कठीण निर्णयाच्या क्षणी जागा झालेल्या विवेकातही तोच असेल. मग मनाला झालेली ही 'कृष्णसख्याची बाधा' दूर करण्यासाठी औषध कशाला? उलट ती अधिकाधिक वाढू दे, कारण ही बाधा माणसाला जगापासून दूर नेत नाही; ती त्याला अधिक प्रेमाने, अधिक विवेकाने, अधिक कर्तव्यभावनेने आणि अधिक समरसतेने जगाशी जोडते. बाळकृष्ण ते योगेश्वर.. असा हा जीवनाला कृष्णमय करणारा भावप्रवास अनुभवताना कृष्ण अंतरी जन्मावा. अवघे जीवन कृष्णमय व्हावे!

**।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।**


# समर्पण भक्तांचे

## कथा गजाननाच्या

**तारा प्रद्युम्न देशपांडे/८४५९०७२८४९**

एके दिवशी समर्थ अकोला येथे बच्चुलालच्या घरी आले व ओट्यावर बसले. बच्चुलाल खूप आनंदित झाला. तो समर्थांना म्हणाला, 'गुरुराया, आज तुमची पूजा करावी, असं माझ्या मनाला वाटले.' ते समर्थांनी ऐकले व मान हलवली. ती संमती दिल्याची साक्ष होती. बच्चूलालने पूजेची पूर्ण तयारी केली. प्रथम नाना उटणे लावून मंगल स्नान घातले. नंतर भरजरी पीतांबर नेसविले. अंगावर शाल पांघरली. डोक्याला एक जरीचा रुमाल बांधला. सोन्याचा गोफ गळ्यात घातला. हातात साखळी घातली. दाही बोटांत अंगठ्या घातल्या. जिलेबी, पेढे नैवेद्य म्हणून दाखविले. तबकात विडा ठेवला. अष्टगंधात अत्तर टाकून ते कपाळाला लावले. अंगावर गुलाबपाणी शिंपडले. एका सोन्याच्या ताटात दहा हजार किमतीच्या मोहरा आणि नारळ ठेवले. महाराजांना विनयाने बोलू लागले. 'महाराज, माझ्या मनात राम मंदिर बांधायचा विचार आहे. या ओट्यावर मंडप घातला तरी पण उत्सवात अडचण होते. ही माझी इच्छा पूर्ण करा,' असे म्हणून नमस्कार केला.

महाराजांनी, 'तो परमेश्वर तुझा हेतू पूर्ण करीन' असा आशीर्वाद दिला व पुढे म्हणाले, 'तू मला एवढं का सजवलं? मी काही पोळ्याचा बैल नाही की दसऱ्याचा घोडा नाही. मला या दागदागिन्यांचा काय उपयोग आहे? अरे हे सगळं माझ्यासाठी विष आहे. त्याचा मला स्पर्शपण चालत नाही किंवा तू खूप मोठा आहे, हे दाखवण्यास असे कृत्य केले काय? जे ज्याला आवडते ते त्याला द्यावे. मी वेडापिसा साधू आहे. हे सगळे तुलाच लखलाभ असो. तुमच्यासारख्या प्रापंचिकाला याची गरज आहे. माझा ईश्वर पांडुरग पंढरपुरात उभा आहे, हे वैभव देण्याकरिता.' असं म्हणून महाराजांनी अंगावरचे दागदागिने काढून चारही बाजूस फेकून दिले आणि कपडेही काढलेत. दोन पेढे खाऊन तेथून निघून गेले.



हा प्रकार पाहून लोकांना वाईट वाटले. त्यात कारंजाचे लोक उपस्थित होते. ते म्हणू लागले. आमच्या गावाचा लक्ष्मण अभागी ठरला. त्यानेही बच्चुलालसारखी पूजा केली आणि धनाच्या लोभाने मनोमन बेचैन झाला. दांभिकतेची पूजा वर्ज्य असते. ती पूजा समर्थांना आवडत नाही. शुद्ध अंतःकरणाने केलेल्या पूजेचे चांगले फळ मिळते. पण ते लक्ष्मणाच्या भाग्यात नव्हते. शर्करा खंड खाद्यांनी असे म्हणून कुजका भुईमुगाचा दाणा आणून ठेवला तर चालेल का? या दांभिकपणाचे फळ तसेच मिळते पण बच्चुलाल जसे बोलला तसेच त्याने आपले वागणे ठेवले व त्यावर संतकृपा झाली. ज्यावर संतकृपा झाली, तो जीवनात सुखी होतो. बच्चुलालने समर्थांना शोधण्याचा खूप प्रयत्न केला, पण ते त्यांना कोठेच दिसले नाही.

# देह आशंका शोधन

## समर्थवाणी

**वृषाली मानेकर/८६०५१७७४७८**

### दशक १० वा : समास ३ रा

या समासामध्ये श्री समर्थांनी विश्वनिर्मितीचा क्रम सांगितला. आपल्या देहात ज्याप्रमाणे अंतःकरण वास करते, त्याचप्रमाणे विश्वदेखील जाणीवरूप, शक्तीरूप आहे. सांगायचे झाले तर, सचेतनात अंतःकरण प्रगटपणे आढळते तर अचेतनामध्ये तसे आढळत नाही. माणसाच्या अंतःकरणातील जाणीव 'मी' पणाने वावरते. 'मी' पण हा वासनामय असतो. बृहदारण्याकात मंत्रानुसार जीव वासनामय आहे, असे म्हणतात. विश्वात वायूला फार महत्त्व आहे. वायू म्हणजेच वारा. त्याचेच दुसरे रूप म्हणजे अदृश्यात वावरणारी वासना.

श्री समर्थांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, एका आत्मस्वरूपाखेरीज सर्व देवता, भुते हे वायुरूप असतात, कारण वायू हा सर्व देवतांचा आत्मा आहे, त्याच्या ठिकाणी जाणीव व वासना दोन्ही असते. जगात निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या शक्ती वावरतात. नाना प्रकारच्या मंत्र तंत्रांनी त्या वश करून घेता येतात. वायूची जशी दोन रूपे आहेत, तशीच अग्नीची, पाण्याची आणि पृथ्वीचीदेखील आहेत. श्रेष्ठ रूपांमध्ये शक्तीचा व सामर्थ्याचा अविष्कार मोठा असतो तसेच प्रभावीदेखील असतो. कनिष्ठ रुपामध्ये सामर्थ मर्यादित असते. आकाशाला मर्यादा असल्यामुळे त्याचा वेगळेपणा भासतो. अशा अमर्याद आणि भासरहित ब्रह्मामध्ये मूळ मायेचा जन्म झाला.



पंचमहाभूते आणि त्रिगुण वायूमध्ये अंतर्भूत असतात. वायू म्हणजे शक्ती असा अर्थ आहे. आकाशापासून वायू अर्थात् वायूदेव, वायूपासून अग्नी म्हणजे अग्निदेव, अग्नीपासून आप, जे नारायणस्वरूप समजले जाते. आपपासून पृथ्वी निर्माण झाली, तिचे रूप बीजाकार आहे. ज्याप्रमाणे बीजामध्ये सबंध वृक्ष सामावलेला असतो, त्याचप्रमाणे पृथ्वीमध्ये शक्ती वास करते. ज्या जडद्रव्याने पृथ्वी बनलेली आहे, मुळात ती शक्तीरूप आहे. पृथ्वीच्या पोटात अनंत पाषाण आहेत. त्यापैकी काही पाषाणांमध्ये देव वास्तव्य करतो, याची प्रचिती येते. अनेक वृक्षांमध्ये आणि मातीच्या मूर्तीमध्ये देव आहेत, असा रोकडा अनुभव जगातील अनेकांना येतो. या सर्व देवांना वायूचा आधार असतो.

सर्व देव म्हणजे शक्तीची विविध रूपे आहेत. सर्व देवता नेहमी वायुरूपाने राहतात. देवीदेवता विविध प्रकारचे देह धारण करतात. गुप्त असलेले प्रकट व्हायचे व प्रकट असलेले गुप्त व्हायचे अशा रीतीने सगळ्या देवता वागतात. वायूमध्ये जगत ज्योती आहे आणि ती जाणीव रूप आहे. तिच्यामध्ये वासनेमुळे अनेक भेद निर्माण होतात. वासना शुभ असेल तर देवता श्रेष्ठ आणि वासना अशुभ असेल तर देवता कनिष्ठ असते. भूताखेतांची वासना अत्यंत हीन दर्जाची असते. आपण ज्याला वारा म्हणतो, तो वायूचाच एक प्रकार आहे. वासना जाणिवेची लहान-मोठी केंद्रे तयार करते. जगात जो माणूस मनापासून उपासना करतो, त्याला या शक्तिकेंद्राची म्हणजेच श्रेष्ठ देवदेवतांची मोठी मदत असते. त्या देवीदेवता उपासकाला अनेक अडचणींमधून सुरक्षितपणे पार पाडतात. उपासकाला सांभाळून नेण्यास त्या नेहमी तत्पर व जागृत असतात.

ज्या मंदिरांमध्ये उत्तम व निष्काम उपासना चालते तेथे अनेक शुभ श्रेष्ठ देवीदेवतांचा वास असतो. जो तामसी उपासना करतो किंवा ज्या ठिकाणी तामसी मंत्र व तंत्र याचा पाठ चालतो, तेथे हीन शक्ती वास करतात. त्यांच्या मदतीने तात्पुरती वासना तृप्ती घडून येते हे खरे, पण त्या उपासनांचा शेवट चांगला नसतो. त्यामुळे माणसाची बुद्धी भ्रष्ट होते. वायूपासून तेज निर्माण झाले. उष्ण व थंड अशा दोन प्रकारांनी ते अनुभवास येते. प्रकाशरूप आणि अत्यंत तेजोमय असा सूर्य उष्णापासून निर्माण झाला. तेजाचे प्रकार बरेच असले तरी, त्याचे मुख्य दोन प्रकार आहेत, उष्ण व थंड. पृथ्वीचे प्रकारात दगड माती हा नेहमीच्या अनुभवांचा एक प्रकार आणि सोने, परीस, रत्ने हा दुसरा प्रकार. सोने, रत्न यातील खरेखोटेपणा समजून घ्यावा लागतो. माणूस विचारांवर स्वार झाला की सगळेच समजणे सोपे होते. हे सगळे विवरण झाले तरी माणूस कुठून आला ही शंका शिल्लक उरते. तेज, आप व पृथ्वी याचे दोन प्रकार सांगण्याचा उद्देश असा की पहिला प्रकार अधिक गुणसंपन्न शक्तीमय तर दुसरा हीनगुण व हीनशक्ती असतो पण दोन्ही प्रकारांमध्ये सामर्थ्य आहे यात शंका नाही.

**जय जय रघुवीर समर्थ!**

# आध्यात्मिक प्रेम हेच परमध्येय!

## ज्ञानेशकन्या

**डॉ. अलका इंदापवार/८४५९१२३६६९**

मानवी जीवनात प्रेम ही अशी एक दिव्य भावना आहे की, त्यामुळे जीवनात आनंद निर्माण होतो. संपूर्ण विश्व प्रेममय बनून जाते. श्री महाराजांनी प्रेमाचे अनेक आयाम, लक्षण, प्रकार, विविध पैलू, प्रेमवृद्धीचे उपाय विविध उदाहरणांद्वारे वर्णिले आहेत. प्रेमाची उन्नत दशा कशी येते त्याचे उत्कृष्ट विवेचन केले आहे. व्यक्तिगत प्रेमापासून एकेक पायरी पुढे गेल्यास ते कसे उन्नत होते, हे दाखविले आहे. प्रेमाची सर्वोत्कृष्ट दशा म्हणजे आध्यात्मिक प्रेम होय. तेच मानवाच्या जीवनातील परमध्येय आहे, असे श्री महाराज सांगतात. लोकांचे स्वभाव पाहून मैत्री, करुणा, मुदिता आणि उपेक्षा या चार उपायांनी वागणूक ठेवली तर प्रेम कायम राहते. आपल्या स्वतःच्या मनाची प्रेमावस्था वाढवीत व्यापक प्रेम कसे निर्माण करता येते, त्यासाठी श्री महाराजांनी प्रेमोन्नती या व्याख्यानात प्रेमाचे प्रकार सांगितलेले आहेत.

पृथ्वीमध्ये गुरुत्वाकर्षण आहे, हे दगड खाली पडल्याशिवाय आपल्याला समजत नाही. म्हणजेच दगडाची उपाधी घेतल्याशिवाय गुरुत्वाकर्षण शक्ती व्यक्त होत नाही. किंवा एखाद्या पदार्थाची चव जिभेने घेतल्याशिवाय त्याचा स्वाद कळत नाही. त्याप्रमाणे मनात असणारे अव्यक्त प्रेम व्यक्त झाल्यावाचून कळू शकत नाही. हे प्रेम देह, इंद्रिये, मन, बुद्धी आणि वाणी यांनी व्यक्त होते. हे व्यक्त होणारे प्रेम विविध प्रकारचे आहे. श्री महाराजांनी या प्रेमाचे विविध प्रकार सांगून त्याला एक क्रम दिलेला आहे.



'नैसर्गिक प्रेम' हे केवळ देहापुरतेच असते आणि केवळ देहापुरतेच व्यक्त होते. पहिले प्रेम नैसर्गिक आहे. यापुढची पायरी म्हणजे कौटुंबिक प्रेम. यात देहापेक्षा थोडी उंच भावना करून आपल्या कुटुंबातील लोकांवर प्रेम करतात. आपण कुटुंबाला चांगले वागवले तरच आपणाला कुटुंब चांगले वागवेल या विचाराने म्हातारपणी पोसण्याकरिता पुत्र, बालपण जोपासण्याकरिता आईबाप, काम घेण्याकरिता नोकर, बंधू-भगिनी अशी नाती जोपासली जातात. हे कौटुंबिक प्रेम बायको, मुलगा, नोकर, अतिथी यांच्याद्वारे व्यक्त होते. घरात कोणी उपाशी असून जर जेवण केले, तर तो अधर्म होतो, असेही एकनाथ महाराजांनी सांगून ठेवले आहे. कौटुंबिक प्रेमाच्या पुढची पायरी म्हणजे, माणसामाणसात अधिक प्रेम व्यक्त होऊ लागले की, आपल्या कुटुंबालाच पोसणे योग्य नाही, असा शुद्ध मनाचा संदेश स्वीकारला जातो. मग आचरणाद्वारे कुटुंबाच्या पुढे जाऊन त्याला समाजाबद्दल आस्था वाटू लागते. हे सामाजिक प्रेम. कौटुंबिक प्रेमापेक्षा यात परोपकारी आचरण असल्यामुळे ते आणखी उच्च प्रतीचे मानले जाते. पुष्कळ लोकांचे कल्याण होत असेल, तर एखाद्या मनुष्यावर अन्याय झाला, त्याला कष्ट झाले तरी ते स्वीकारण्याची तयारी असते. सामाजिक प्रेमापुढे कौटुंबिक प्रेमाला दुय्यम मानले जाते.

विचारात्मक शुद्ध मनाच्या बाजूने जे प्रेम व्यक्त होते, यालाच नैतिक प्रेम असे म्हणतात. एका चांगल्या गोष्टीसाठी निकृष्ट असणाऱ्या अनेकांचा नाश झाला तरी चालेल अशी भूमिका नैतिक प्रेम करणाऱ्यांमध्ये निर्माण होते. नैतिक प्रेम कसे असते, हे व्यक्त करण्यासाठी श्री महाराजांनी रामायण, महाभारतातील उदाहरणे दिली आहेत. महाभारतात विदुर धृतराष्ट्राला म्हणतो की, तुझी शंभर मुले पाच (पांडव) सिंहांपुढे कोल्हे, कुत्री होत, तर रामायणाच्या प्रसंगात, एक विभीषण असला म्हणजे मग सर्व राक्षस खुशाल मरोत. अशा उदाहरणांतून नैतिक प्रेम दिसून येते.

समाज सुव्यवस्थित चालावा म्हणून किंवा नीती व्यवस्थित राहावी म्हणून एकजुटीने विचारात्मक बाजूतून जे प्रेम उत्पन्न होते ते राष्ट्रीय प्रेम गणले जाते. या प्रेमात श्री महाराजांनी दोन्ही प्रकारच्या राज्यव्यवस्थेचे वर्णन केले आहे. व्यक्तिस्वातंत्र्य देणारे प्रजासत्ताक राज्य असेल तर बहुपयोगितेची भरभराट होते, परंतु अशावेळी सत्याचा चोहोकडून लोप होऊ लागतो. एक व्यक्ती जर नीतिमान असेल आणि त्याच्याच स्वाधीन सर्व राष्ट्र असेल तर देश सुरक्षित राहतो. ही राजसत्ता जर धर्माधिष्ठित असेल तर त्या राज्याचा विकास होतो. धर्माशिवाय राष्ट्र उन्नती होत नाही, असे महाराजांचे स्पष्ट मत आहे. जेथे धर्म नाही त्या ठिकाणी राज्याची भरभराट झालेली दिसत नाही. जे राष्ट्र आपल्याला दिसते तेथे धर्माचे बंधन आहेच. श्री महाराज असे विधान करतात की, जगाच्या इतिहासात धर्मावाचून एखाद्या राष्ट्राची भरभराट झालेली आजतागायत ऐकू येत नाही. म्हणून राष्ट्र हे धर्माधिष्ठित असावे.

चित्त जेव्हा अधिक सात्विक होऊ लागते, तेव्हा ते अधिक शुद्ध होऊन त्यातून दैवी प्रेम उत्पन्न होते. यात भगवंत आणि मनुष्य यांच्यात परस्पर प्रेम निर्माण होते. धार्मिक प्रेमाचे प्रगटीकरण हे नियमित शुद्ध आचरण, प्राणायाम करणे, तीर्थक्षेत्री जाऊन द्रव्याचा उपयोग करणे, यामुळे व्यक्त होते. अदृश्य अव्यक्त वाटणाऱ्या भगवंताशी प्रीती निर्माण होते.

अशाप्रकारे श्री महाराज म्हणतात की, प्रेम वृद्धिंगत होऊन प्रेमाची उन्नती केली पाहिजे. यामुळे सर्वांमध्ये परस्पर प्रेम निर्माण होऊन सर्वांचे कल्याण होईल. प्रेम हाच आपला खरा स्वभाव आहे, असे श्री महाराज सांगतात. प्रेमाची अतिशय वृद्धी होता होता स्वार्थबुद्धी कमी होते. समाधान वाढून सुख प्राप्त होते. अहंकार नाहीसा होऊन प्रेम व प्रेमाला जाणणारा साक्षी परमेश्वर हा एकच होऊन राहतो. संपूर्ण दुजेपणा नाहीसा होऊन जीवन प्रेममय होऊन राहते, यालाच आध्यात्मिक प्रेम म्हणतात. याप्रमाणे हळूहळू आपण प्रेमाच्या शिखरावर पोहोचलो की, संपूर्ण जग प्रेममय होऊन जाते. श्री महाराज येथे एक सावधगिरी सांगतात की, एकेका पायरीवरून वृत्ती वर नेल्याशिवाय एकाएकी त्या प्रेमसागरात मग्न होण्याला कोणीच समर्थ नाही. परंतु वरच्या पायरीवर गेल्यानंतर खालच्या पायरीकडे दुर्लक्ष करावे. धार्मिक प्रेमापर्यंत पुरुष आला म्हणजे तो केव्हा ना केव्हातरी आध्यात्मिक प्रेमसागरात मग्न होणार हे नक्की. या प्रेमाचे रक्षण करण्याकरिता मात्र इंद्रियांचे संयमन केले पाहिजे. जसजसे प्रेम अधिक वाढते तशा तशा कठोरवृत्ती नाहीशा होऊन नम्रता वाढते. प्रेमाच्या भरात मग्न होत असताना देहाला सोडून मनुष्य हळूहळू त्या दिव्य शाश्वत सूक्ष्म तत्त्वात प्रवेश करतो. ज्ञानेश्वर महाराज या दिव्य सुखाचे, शाश्वत आनंदाचे वर्णन करतात. 'हे विश्वची माझे घर । ऐसी मती जयाची स्थिर । किंबहुना चराचर । आपण जाहला ।।'


सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हाधिकारी कार्यालय परीसरात 'गर्दभानां मुक्तसंचार:'

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ सप्टेंबर -**

नांदेड जिल्ह्याचे प्रमुख कार्यालय असलेल्या जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात जनावरांचा मुक्त संचार वाढला आहे. एकीकडे सुरक्षेच्या नावाखाली सर्वसामान्यांची अडवणूक करण्यात येते परंतु परिसरात फिरणाऱ्या जनावराकडे लक्ष देण्यात येत नसल्याने जिल्हाधिकारी परिसर आहे की गायरान अशी चर्चा सध्या सुरू आहे.





जिल्हाधिकारी कार्यालय हे शहरातील अत्यंत महत्त्वाचे ठिकाण आहे. परंतु मागील काही दिवसापासून कार्यालय परिसरात जनावरांचा मुक्त संचार वाढला आहे. गायी, कुत्रे, गाढव अशी मोकाट जनावरे परिसरात ठिय्या मांडून बसत आहेत. यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होत आहे. अनेकदा ही जनावरे वाहन पार्किंग जागेत बसलेली दिसतात किंवा परिसरात फिरताना दिसतात. जिल्हाधिकारी कार्यालय अत्यंत महत्त्वाचे ठिकाण असल्याने दररोज या ठिकाणी उपोषण, आंदोलन, मोर्चे तसेच नागरिकांची ये- जा असते परंतु मोकाट फिरणाऱ्या जनावरांमुळे अपघाताचाही धोका वाढला आहे, वाहतुकीची कोंडी घेण्याची देखील शक्यता आहे. त्यातच या जनावरांमुळे घाणीचा प्रश्न देखील निर्माण होत आहे.

शहरातील मोकाट जनावरांची जबाबदारी ही मनपाची असताना मनपाचा कोंडवाडा विभाग करतो काय असा प्रश्न देखील उपस्थित होत आहे. जिल्ह्याचा कारभार पाहणाऱ्या कार्यालय परिसराची ही अवस्था असेल तर अन्य कार्यालयाची काय असेल अशी देखील चर्चा सुरू आहे.

एकीकडे 'विद्यानंद बापटांची' मराठी ट्रेडींगवर वर असताना जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मुक्त संचार करत असलेल्या गाढवाला पाहून 'गर्दभाना मुक्तसंचार:' असे वाक्य अनेकांच्या तोंडी दिसून आले.

त्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात मुक्त संचार करणाऱ्या या जनावरांचा बंदोबस्त करून संबंधित पशु पालकावर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# अंतरवाली सराटीत मनोज जरांगेंची आ. चिखलीकरांनी घेतली भेट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ सप्टेंबर -**

मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी अंतरवाली सराटी येथे संघर्ष सुरू असतानाच, लोहा-कंधार मतदारसंघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आंदोलक मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली. या वेळी चिखलीकर यांनी मराठा आरक्षणाच्या लढ्याला आपला जाहीर पाठिंबा घोषित केला.



अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतल्यानंतर पत्रकारांशी बोलताना आमदार चिखलीकर म्हणाले, मी आधी मराठा समाजाचा एक घटक आहे. समाजाच्या न्याय्य हक्कासाठी मनोज जरांगे पाटील लढा देत आहेत. त्यांच्या या संघर्षाला माझा पूर्ण पाठिंबा असून, समाजहितार्थ सुरू असलेल्या या लढ्यात आपण शेवटपर्यंत समाजासोबत ठाम उभे राहू.

या प्रसंगी आमदार चिखलीकर यांनीही उपस्थित राहून जरांगे पाटील यांची भेट घेतली. जरांगे यांच्या तब्येतीबद्दल चिंता व्यक्त करताना आ.चिखलीकर म्हणाले, मनोजदादांची प्रकृती अत्यंत नाजूक बनली आहे. आम्ही त्यांना पाणी घेण्याचा आग्रह केला, मात्र प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांच्याकडून प्रतिसाद मिळू शकला नाही.

यावेळी माजी आमदार मोहनराव हंबर्डे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर, लोहा नगरपालिकेचे नगराध्यक्ष शरद पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर कार्याध्यक्ष माधव पावडे, माजी सभापती आनंदराव पाटील शिंदे ढाकणीकर, लोहा नगरपालिकेचे नगरसेवक हरिभाऊ चव्हाण, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष कन्हैया कदम, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे उत्तर जिल्हाध्यक्ष स्वप्नील पाटील इंगळे, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे दक्षिण जिल्हाध्यक्ष बालाजी शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहर जिल्हाध्यक्ष नेताजीराव भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे विधानसभा अध्यक्ष संतोष क्षीरसागर, माजी सभापती शंकरराव ढगे, पंचायत समितीचे माजी सदस्य गुलाब पाटील उबाळे, गुलाब पाटील कदम, भानुदास पाटील पवार, ज्ञानेश्वर उबाळे, बंडू पाटील काळे, भास्कर पाटील उबाळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मरवाळी तांडा आश्रमशाळेत डॉ. राधाकृष्णन जयंती उत्साहात

**नायगांव-** तालुक्यातील मरवाळी तांडा येथील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक आश्रम शाळेच्या भव्य प्रांगणात शनिवारी, ५ सप्टेंबर रोजी प्रार्थनेनंतर भारताचे माजी राष्ट्रपती व थोर शिक्षणतज्ज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य देविदास किशन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात शिक्षकांच्या ज्ञानदान कार्याला अभिवादन करण्यात आले.



यावेळी पोस्ट बेसिक ज्युनिअर कॉलेजचे प्रा. पांडुरंग येवले, गणेश मारताळेकर आणि प्राथमिकच्या सौ. कुसुम राठोड यांच्या हस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शाळेतील सर्व प्राध्यापक, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी ही प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी प्रा. अवचित शेजूळ यांनी शिक्षकदिनाचे महत्त्व विशद करताना, शिक्षक हे केवळ ज्ञानदान करणारे नसून विद्यार्थ्यांना सुसंस्कारी,चारित्र्यसंपन्न व अष्टपैलू व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य करणारे शिल्पकार आहेत,असे सांगितले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जीवनकार्याचे विविध दाखले देत त्यांनी शिक्षकांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानावर प्रकाश टाकला. त्यांच्या विचारांनी उपस्थित विद्यार्थ्यांची मने जिंकली. कार्यक्रमास प्राथमिक चे शिक्षक नागोराव चव्हाण, एकनाथ मुनगिलवार, साहेबराव येवरे, सतीश हनमंते, फेरोज शेख, तसेच माध्यमिकचे शिक्षकवृंद धोंडीबा तेलंग, नागनाथ येल्लूरे, संभाजी महेत्रे, सूर्यकांत जाधव, आनंदराव सूर्यवंशी, व्यंकट रेकुळवाड, सुभाष राठोड, पांडुरंग जाधव, अजय राठोड, मुजमील शेख, प्रा. पांडुरंग येवले, हेमंत बावणे, आकाश सूर्यवंशी, बालाजी माळगे,माधव वाघमारे, यादव कोरनुळे, शिवशंकर कोरे, दिलीप माने, प्रदीप लाभसेटवार, शंकर राठोड, सुशील नामवाड,सुभाष कदम, वस्तीगृह अधीक्षक राजू कांबळे मरवाळीकर, व्यंकट पवळे, रघुनाथ कल्याण, सौ.भारती बन,सौ.सुनीता कोटूलवार, सौ.कीर्ती दहिफळे यांच्यासह चतुर्थ श्रेणी कर्मचारी शिवाजी नारे, हनमंत सिंगवाड, शरद पवार आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थी ,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोस्ट बेसिक ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक हेमंत बावणे यांनी केले. आभार प्रदर्शनही त्यांनीच केले.

## पत्रकार शहा उस्मान कासराळीकर यांची बिलोली तालुकाध्यक्षपदी नियुक्ती

**आदमपूर** -बिलोली तालुक्यातील ग्राम कासराळी येथील सामाजिक कार्यकर्ते तथा युवा पत्रकार शहा उस्मान शहा अहेमद टेलर कासराळीकर यांची पत्रकार एकता महासंघ भारत या राष्ट्रीय संघटनेच्या नांदेड जिल्हा अंतर्गत बिलोली तालुका अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली.संवाद,



सामाजिक जाणीव,प्रामाणिकता व संघटनात्मक कौशल्य आदि कामकाजातील सक्रिय अनुभव पाहता संघटना पदाधिकाऱ्यांकडून सन्मानाने ही निवड जाहीर केली. शुक्रवार दि.४ सप्टेंबर रोजी रीतसर नियुक्तीपत्र बहाल करण्यात आले.संपूर्ण भारतातील पत्रकारांचा राष्ट्रीय संघटनात्मक मंच उपलब्ध झाल्याने संघटनेच्या ध्येय-धोरणांनुसार पत्रकारांच्या हक्कांसाठी,पत्रकार सुरक्षा, सामाजिक न्याय,लोकशाही मूल्ये व जनहितांच्या प्रश्नांसाठी सदरील संघटनेच्या माध्यमातून योग्य न्याय देण्याचा प्रयत्न असेल.याने मजबूत पत्रकार,मजबूत समाज,मजबूत भारत हे ध्येय साध्य करता येईल.या निवडीबद्दल पत्रकार एकता महासंघ संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिनेश गंगाराम भालेराव,महाराष्ट्र अध्यक्ष विजय गाळे,मराठवाडा अध्यक्ष रामराव चव्हाण,नांदेड जिल्हा अध्यक्ष दौलताबादी आदि पदाधिकारी व कासराळी, बिलोली,आदमपूर,नरसी, नायगांव,मुखेड,नांदेड परिसरातील राजकीय,शैक्षणिक, पत्रकारिता क्षेत्रातील विविध स्नेही मान्यवर, प्रतिष्ठित नागरिक, कुटुंबीय,मित्र मंडळींकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

## वद्यार्थिनींच्या प्रेमाने शिक्षक दिन फुलला; दहीहंडीने प्रशालेत अवतरले गोकुळ!

**हिमायतनगर**-हुतात्मा जयवंतराव पाटील कन्याशाळा व उच्च माध्यमिक विद्यालय, हिमायतनगर येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन तसेच श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी उत्सव उत्साहपूर्ण व भावस्पर्शी वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गजानन रणखांब होते, तर प्रमुख पाहुणे प्रा.कमलाकर कमठे, उपमुख्याध्यापक सुभाष यशवंते व वरिष्ठ लिपीक राघवेंद्र इनामदार होते. शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थिनींनी प्रशालेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे मुख्य प्रवेशद्वारावर आगळ्या पद्धतीने स्वागत केले. पुष्पवृष्टी, पुष्पगुच्छ व लाल शाईच्या पेनाने शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. विद्यार्थिनींचे सूत्रसंचालन, फोटोग्राफी तसेच शिक्षकांसाठी आयोजित संगीत खुर्ची, पिलो पासिंग व प्रश्नमंजुषा या उपक्रमांनी कार्यक्रमात उत्साह निर्माण केला. या कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभागप्रमुख भायकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली शेख मॅडम व खरोडे यांनी केले. विविध स्पर्धांमध्ये संगीत खुर्चीमध्ये भायकाटे, पिलो पासिंगमध्ये इनामदार आणि प्रश्नमंजुषेत सय्यद सर यांनी प्रथम क्रमांक मिळविला. श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त आयोजित दहीहंडी उत्सवात प्रशालेच्या प्रांगणात जणू गोकुळ अवतरले. राधा-कृष्णाच्या वेशातील विद्यार्थिनी, गोपिकांची वेशभूषा, गरबा नृत्य आणि मानवी मनोऱ्याने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले.

# मुदखेड नगरपरिषदेतील कंत्राटी नगर अभियंत्याच्या मालमत्तेची चौकशी करा : चौधरी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ७ सप्टेंबर -**

मुदखेड नगरपरिषदेत कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेले ज्येष्ठ नगर अभियंता अनंत गुणवंत कुलकर्णी यांच्या कथित मालमत्तेची व आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यात यावी, अशी मागणी नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा ज्येष्ठ नागरिक रामराव चौधरी यांनी केली आहे.

कुलकर्णी हे मागील २५ ते २७ वर्षांपासून एकाच नगरपरिषदेत कार्यरत असल्याचा दावा चौधरी यांनी केला आहे. त्यांच्या उत्पन्नाच्या तुलनेत मोठ्या प्रमाणावर मालमत्ता जमा झाल्याचा आरोपही त्यांनी माध्यमांशी बोलताना केला. संबंधित मालमत्ता व आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी झाल्यास वस्तुस्थिती समोर येईल, असा दावा चौधरी यांनी केला आहे.



या प्रकरणी चौधरी यांनी मागील एक वर्षापासून सातत्याने विविध शासकीय कार्यालयांकडे तक्रारी व चौकशीसाठी अर्ज सादर केल्याचे सांगितले. मुंबई येथील संबंधित वरिष्ठ कार्यालयांसह अंमलबजावणी संचालनालय (एऊ), आयकर विभाग तसेच इतर संबंधित यंत्रणांकडेही तक्रारी दिल्याचा दावा त्यांनी केला आहे.

मात्र, तक्रारी करून सुमारे एक वर्षाचा कालावधी उलटूनही अद्याप या प्रकरणाची ठोस चौकशी झालेली दिसून येत नसल्याचा आरोप रामराव चौधरी यांनी केला. त्यामुळे संबंधित विभागांनी या तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन कुलकर्णी यांच्या उत्पन्नाचे स्रोत, मालमत्ता, आर्थिक व्यवहार आणि सेवाकालातील संबंधित बाबींची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, रामराव चौधरी यांनी केलेले आरोप हे त्यांच्या निवेदनावर आधारित असून, त्यांची स्वतंत्र अधिकृत पडताळणी झालेली नाही. या संदर्भात नगर अभियंता अनंत गुणवंत कुलकर्णी किंवा मुदखेड नगरपरिषद प्रशासनाची बाजू समोर आल्यास तीही प्रसिद्ध करण्यात येणे आवश्यक आहे.

चौधरी यांच्या या आरोपांमुळे मुदखेड नगरपरिषद प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत तसेच संबंधित अधिकाऱ्यांच्या दीर्घकाळच्या नियुक्तीबाबत चर्चेला उधाण आले असून, आता संबंधित चौकशी यंत्रणा याप्रकरणी काय भूमिका घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# धनगर समाजाच्या मागण्यांसाठी नांदेडमध्ये राज्यव्यापी आंदोलन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ सप्टेंबर -**

धनगर समाजाच्या अनुसूचित जमाती आरक्षणाच्या घटनात्मक हक्काची तात्काळ अंमलबजावणी करावी यासह समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आमदार गोपीचंद पडळकर यांच्या नेतृत्वाखाली राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले. नांदेड जिल्ह्यातही या आंदोलनाला समाजबांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी जिल्हाधिकारी, नांदेड यांच्यामार्फत मुख्यमंत्री ना. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांना निवेदन देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयातील एस टी आरक्षणाच्या प्रकरणात ८ सप्टेंबरपूर्वी राज्य शासनाने धनगर समाजाच्या बाजूने ठाम भूमिका मांडावी, सक्षम कायदेशीर पथक नियुक्त करावे, ऐतिहासिक व शासकीय पुरावे न्यायालयासमोर सादर करावेत तसेच भविष्यातील कायदेशीर पर्यायांसाठी ठोस झश्ररप-इ तयार ठेवावा अशी मागणी करण्यात आली.

तसेच मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली संबंधित मंत्री, अधिकारी, कायदेतज्ज्ञ व धनगर समाजाच्या प्रतिनिधींची उच्चस्तरीय बैठक घेऊन निश्चित कालमर्यादेसह कृती आराखडा जाहीर करावा अशी मागणीही करण्यात आली.

धनगर समाजाचे श्रद्धास्थान असलेले हुतात्मा वीर शिंग्रोबा धनगर यांच्या नावाने मुंबई-बेंगळुरू राष्ट्रीय महामार्गावरील संबंधित कनेक्टिंग लिंकचे नामकरण करून त्याबाबतची अधिकृत अधिसूचना तातडीने जारी करावी. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा सन्मान म्हणून मुंबईतील चर्चगेट रेल्वे स्थानकास त्यांचे नाव देण्याची प्रक्रिया सुरू करावी अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय श्री संत बाळूमामा देवस्थान ट्रस्टची ड्खढ चौकशी तातडीने पूर्ण करावी, ट्रस्टच्या आर्थिक व्यवहारांचे फॉरेन्सिक ऑडिट करावे आणि कोल्हापूर, पंढरपूर व शिर्डी देवस्थानांच्या धर्तीवर स्वतंत्र व पारदर्शक कायदा करावा अशी मागणी करण्यात आली.

यावेळी माजी जि.प. सदस्य माणिकराव लोहगावे, नगरसेवक प्रतिनिधी महेंद्र देमगुंडे, बबन वाघमारे, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, माजी जि.प. सदस्य भगवान हाके, एकनाथ धमणे, भास्कर तळणे, गोविंद गोरे, बालाजी नारे, ड. जगदीश हाके, ड. सोपान देवकत्ते, ड माणिकराव वाखरडे, ड. शिवकुमार सोलकर, प्रदीप सरोदे, शिवकांत मैलारे, अविनाश कोकणे, नारायण कोपनर, शिवाजी होळकर, शिवकुमार देवकत्ते, साईकिरण सलगरे, श्रीहरी मुंडकर, सखाराम आव्हाड, नागोराव बारसे, बाळासाहेब बारसे, गजानन सरोदे, गंगाधर होळकर आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# असर्जन परीसात माकडांचा उच्छाद; अनेकांना घेतला चावा

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ सप्टेंबर -**

शहरातील असर्जन परीसरात माकडांनी उच्छाद मांडला असून आता पर्यंत अनेक जणांना चावा घेतला आहे. वनविभागाने या माकडांचा बंदोबस्त करावा अशी मागणी होत आहे.

मागील काही दिवसांपासून असर्जन परीसरात माकडांचा ववर वाडला आहे. नागरिकांवर हल्ला करून ही माकडे चावा घेत आहेत. याभागातील अनेक मूले, तरुण, वृद्धांना माकडे चावा घेतला आहे. माकडे थेट धावत जावून नागरीकावर हल्ला चढवत असल्याने या माकडांची दहशत निर्माण झाली आहे.



वनविभागाने पिंजरा लाऊन या माकडांना जेरबंद करावे अशी मागणी परीसरातील नागरीकांतुन होत आहे.

# येरगी येथे जन्माष्टमी निमित्त गोपाळकाला व दहीहंडी उत्सव

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. ७ सप्टेंबर -**

महाराष्ट्र गोल्ला गोलेवार यादव समाज सेवा संघटनेच्या वतीने भगवान श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी गोपाळकाला व दहीहंडी उत्सवाचे आयोजन देगलूर तालुक्यातील येरगी येथे जय श्री कृष्ण यादव मित्रमंडळातर्फे आयोजित करण्यात आले होते. शनिवारी दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात भव्य वृक्षारोपण तसेच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

भगवान श्रीकृष्णाच्या जयघोषात आणि उत्साहपूर्ण वातावरणात दहीहंडी उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी समाजबांधव, ग्रामस्थ तसेच युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग



नोंदविला. धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक बांधिलकी जपत वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष उमाकांत संजय मनेरवार तर उपाध्यक्ष बालाजी गंगाराम बरसमवार हे होते. यावेळी विकास येरपुलवार, गजानन गंगाराम बरसमवार, यादव केरबा बरसमवार, बालाजी मनेरवार, बालाजी बरसमवार, दत्ता बोंडावार, ईरेष बरसमवार, नागनाथ अकमवार, रमेश बरसमवार, शिवाजी बरसमवार, ज्ञानेश्वर बरसमवार, कृष्णा चुटकुलवार, प्रकाश वाघमारे, नागनाथ परीट, प्रभू कांबळे, चंद्रर जानेवा यांच्यासह समाजबांधव व ग्रामस्थ उपस्थित होते.

या दहीहंडी महोत्सवास मार्गदर्शक म्हणून बालाजी मारोती बरसमवार (अध्यक्ष, गोल्ला गोलेववार समाज), विजय गणपत बरसमवार (सामाजिक कार्यकर्ते), गजानन तेजेराव बरसमवार (माजी सरपंच), कार्यक्रमाचे विशेष आयोजक नागनाथ मारोती बरसमवार (संस्थापक अध्यक्ष जय श्री कृष्ण यादव मित्र येरगी) आदींचे सहकार्य लाभले.

## लक्ष्मण गणगोपले यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

**तभा वृतसेवा**
**नरसी, दि. ७ सप्टेंबर -**

बिलोली तालुक्यातील कुंडलवाडी येथील रहिवासी लक्ष्मण गंगाधर गणगोपले (वय ४५) यांचे रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता निधन झाले. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच कुंडलवाडी व परिसरात हळहळ व्यक्त करण्यात आली.

त्यांच्या पार्थिवावर सोमवार, दि. ७ सप्टेंबर रोजी दुपारी १२ वाजता कुंडलवाडी येथे शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई-वडील, दोन मुले, सून असा परिवार आहे. ते ओड समाजाचे सचिव नंदकिशोर नरसीकर यांचे मेहुणे होत. स्व. लक्ष्मण गणगोपले हे मनमिळाऊ, प्रेमळ व आपुलकीच्या स्वभावाचे व्यक्तिमत्त्व म्हणून परिचित होते.

# मुख्याध्यापक मनोहर गायकवाड यांच्या निलंबनासाठी आमरण उपोषण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ७ सप्टेंबर -**

नायगाव तालुक्यातील मुगाव तांडा येथील मुख्याध्यापक मनोहर गायकवाड यांच्या विरोधात गटशिक्षणाधिकारी दर्शनवाड यांनी स्वयं स्पष्ट अहवाल जिल्हा परिषदेला सादर केला आहे तरीही प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे कारवाई करने टाळत आहेत त्यामुळे त्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण करूनकारवाईच्या मागणीसाठी जिल्हा परिषदेसमोर जनार्दन गायकवाड आमरण उपोषण करणार आहेत .

मुगाव तांडा येथील मुख्याध्यापक मनोहर गायकवाड यांच्या विरोधातील विविध तक्रारींच्या अनुषंगाने नायगाव गटशिक्षणाधिकारी दर्शनवाड यांनी चौकशी करून दोषी असल्याचा अहवाल वरिष्ठांकडे सादर केला आहे. हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर देखील प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांनी संबंधित मुख्याध्यापकावर निलंबन अथवा विभागीय चौकशीची कोणतीही कारवाई न केल्याने त्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

सदर प्रकरणात न्यायालयीन बाबी, शासकीय सेवेशी संबंधित नियमांचे कथित उल्लंघन तसेच शाळेतील उपस्थितीबाबत गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. एकाच दिवशी न्यायालयीन कामकाजासाठी उपस्थित राहणे आणि त्याच दिवशी शाळेतील उपस्थिती दाखविणे शक्य आहे का ? प्राणघातक हल्लूयातील दोष सिद्ध मुख्याध्यापकाला पाठीशी घातल्या जात असल्याने त्रस्त होऊन जनार्दन गायकवाड पाटील हे जिल्हा परिषद कार्यालय समोर करणार आहेत.

# लोहा शहरात अवैध धंदे जोमात स्थानिक पोलीसांचे दुर्लक्ष

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ७ सप्टेंबर -**

शहरात गांजा, भांग, स्टीकफास्ट आदी नशेच्या पदार्थांची दिवसाढवळ्या विक्री होताना दिसुन येत आहे. शहराच्या आवती-भवती जुगाराचे अड्डे, मटका बुकी, गुटख्याची उघडपपणे विक्री, रेती, मुरुम वाहतुक तसेच बैल बाजारत गुडगुडी राजरोसपणे सुरु असताना पोलीस दुर्लक्ष करीत असल्याचे दिसुन येत आहे.

झटपट श्रीमंत होण्याचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी पोलीसांना हाताशी धरुन नशेच्या पदार्थांची विक्री होत असल्याने तरुणाई व्यसन विळख्याच्या अहारी गेली आहे. येणा-या काळात गुन्हेगारी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकाराने पालक व नागरिक चिंताग्रस्त झाले आहेत. शहरातील नविन बाय पास रोड, आय टी आय जवळील कपारीचा माळ परिसर, तहसिल कार्यालयाच्या पाठीमागे, नविन कोर्टाचा रोडवर, जुना कोर्टातील मोकळा परिसराची जागा, व्यंकटेश गार्डन मंगलकार्याच्या बाजुचा मोकळा परिसर या जागा नशेखोरांचे अड्डे बनले आहेत. अशा घटनेला स्थानिक गुन्हे शाखेच्या कर्मचा-याचे पाठवळ आहे की काय अशी चर्चा शहरात ऐकायला मिळत आहे .

शहर व परिसरात गांजा,भांग साहित्याची विक्री सुरू असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून होत असून, या अवैध धंद्यामुळे शहरातील कायदा-सुव्यवस्था आणि तरुणांच्या भवितव्याबाबत चिंता व्यक्त केली जात आहे.

शहरातील काही भागांत हे पदार्थ विक्री करणारे सक्रिय असल्याची चर्चा असून, गुटख्याचीही छुप्या पद्धतीने विक्री होत आहे

या प्रकारामुळे नागरिकात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.येणा-या काळात गणपती, दुर्गा सण उत्सव मोठ्या प्रमाणत साजरे होणारे दिवस आहेत, महिला रात्री ,बेरात्री रस्त्याने ये जा करत आसताना अशा टवाळीचा नाहक त्रास सहान करावा लागण्याची शक्यता असुन पोलीसांनी यावर वेळीच आवर घालावा अशी मागणी जोर धरत आहे . या प्रकारांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी संबंधित पोलिस यंत्रणा व स्थानिक गून्हे शाखेची असून, नियमित पोट्रोलिंग आणि आशा ठिकाणी बसणा-यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी होता आहे.

या अवैध धंद्यांकडे स्थानिक पोलीसांचे व स्थानिक गुन्हे शाखचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोपही नागरिकांकडून केला जात आहे.

जिल्हा पोलिस अधिक्षक व उपविभागीय पोलिस अधिकारी कंधार यांनी लक्ष देऊन अशा प्रकारावर वेळीच आळा घालण्याची मागणी होत आहे.